१२०५
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. नं. २७५

# मार्टिन लूथर

REFBK-0000014

... मुद्रणालय ठाणे
नं. १४...

# अभिप्राय.

कूपरेज, जवळ तंबूत,
फोर्ट, मुंबई, १०

॥ श्री ॥

एप्रील १९००.

सा. नमस्कार वि. वि. तुमचेकडून "मार्टिन लूथर" या नांवाचें पुस्तक इकडे अभिप्रायाकरितां आलें तें इकडील सवडीप्रमाणें समग्र वाचून पाहिलें. इंग्रजी पुस्तकांच्या आधारानें तुह्मी हें पुस्तक रचिलें आहे. तथापि, त्यावर भाषांतराची छाया दिसत नसून नवीन रचलेल्या पुस्तकाप्रमाणें ह्या पुस्तकाची रचना झाली आहे. हा यांतील मुख्य गुण समजला पाहिजे. भाषेंत संस्कृत शब्दांची योजना जास्ती आढळण्यांत येते. तथापि, हाही प्रकार नेमस्तपणाच्या मर्यादेचें उल्लंघन करण्यासारखा नसून संस्कृत शब्दांच्या योजनेमुळें भाषेस कठिणता आली आहे असें आढळत नाहीं. विषयाची रचना क्रमवार असून विषयांतराचा प्रकार एकदोन ठिकाणांखेरीज फारसा दिसत नाहीं. मराठी वाचणारांस युरोपांतील धर्मक्रांतीचें स्वरूप थोडक्यांत

स्पष्टपणें कळण्यास हें पुस्तक चांगलें साधन होईल असें वाटतें. अशा धर्मक्रांतीच्या इतिहासापासून हल्लीं-च्या आपल्या लोकसमाजास किती उपयोग आहे हें पुस्तकांत नीटपणें दाखविलें आहे. एकंदरींत तुमचा प्रयत्न चांगल्या प्रकारें सफळ झाला असून मराठी ऐति-हासिक पुस्तकांची उणीव आहे ती या बाबतींत तुमचे उद्योगानें कांहीं अंशानें तरी दूर होईल. पुस्तक सर्वांनीं वाचण्यासारखें असून संग्रहीं ठेवण्यास योग्य आहे, असा इकडील अभिप्राय आहे.

*M. G. Ranade.*

# मार्टिन लूथर.

## शुद्धिपत्र.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| प्रस्तावना | १६ | अडचपा | अडचणी |
| २ | २१ | प्रतिहन्यमाना | प्रतिहन्यमानाः |
| ४ | ११ | परिक्षा | परीक्षा |
| ७ | ११ | उल्हासवृति | उल्हासवृत्ति |
| ८ | ३ | अन्नावस्त्राची | अन्नवस्त्राची |
| १२ | ११ | मृत्युची | मृत्यूची |
| २२ | ६ | स्फुर्ति | स्फूर्ति. |
| २४ | २२ | धर्माध्यक्ष | धर्माध्यक्ष |
| २६ | १८ | सामर्थें | सामर्थ्य |
| २७ | २ | लोकांमध्य | लोकांमध्यें |
| २७ | १८ | धर्मशास्रा | धर्मशास्त्रा |
| ३० | २ | सज्जना | सज्जना |
| ४२ | ४ | व्याख्यानाही | व्याख्यानही |
| ४३ | २१ | बेताबाचेंच | बेताबाताचेंच |
| ५२ | २ | वार्स् | वर्म्स् * |

* पुढें जेथें जेथें हा शब्द आहे, तेथें तेथें वर्म्स असें समजावें.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ५७ | १४ | त्यान | त्यानें |
| ५९ | १७ | यत्किंचिंत् | यत्किंचित् |
| ६८ | १ | पातांडें | पोतांड |
| ६९ | १२ | विघ्रांस | विभ्रांस |
| ६९ | १९ | ललट | उलट |
| ७५ | ९ | समजुत | समजूत |
| ८० | ७ | विचारा | विचारा |
| ८९ | १४ | तीब्रं | तीव्र |
| ९३ | २१ | कला | केली |
| ९४ | १९ | कालक्रमाध्यें | कालक्रमामध्यें |
| ९८ | २ | कांय | कार्य |
| ९८ | १६ | ठेवन | ठेवून |
| ९८ | २४ | दृष्टींच | दृष्टींचा |
| १०३ | २१ | असमथ | असमर्थ |
| १०४ | २ | गालिलिआन | गालिलिओनें |

[ दक्षिणाप्राइझ कमिटीनें बक्षीस दिलेलें पुस्तक. ]

# मार्टिन लूथर

अथवा

# यूरोपांतील धर्मक्रांतीचा संक्षिप्त इतिहास.

हें पुस्तक

शंकर गोपाळ देशमुख

शिक्षक, गरूड हायस्कूल, धुळें,

यांनीं

कांहीं इंग्रजी ग्रंथांच्या आधारानें लिहिलें.

मुंबईत

" गणपत कृष्णाजी "च्या छापखान्यांत छापिलें.

सन १९०१

१८६७ चा आक्ट २५ प्रमाणें सर्व हक्क मालकानें स्वाधीन ठे. आ.

[ All rights reserved. ]

# प्रस्तावना.

मराठी भाषेंत ग्रंथरचना होऊं लागल्यापासून गद्यात्मक पुस्तकें लिहिण्याचा बराच प्रघात सुरू झाला आहे. परंतु नाटकें व कादंबऱ्या यांचा प्रसार जितका झालेला दिसतो, तितका चरित्रांचा झालेला दिसून येत नाहीं; तेव्हां एकादें लहानसें चरित्र लिहून मराठी भाषेची सेवा करितां आली तर पहावी, अशा हेतूनें मार्टिन् लूथरचें अल्प चरित्र लिहिण्याचा मीं यत्न केला आहे.

समाजामध्यें जसजसा ज्ञानाचा प्रसार होत जातो, तसतशी त्याची बाल्यावस्था नाहींशी होत जाते. अशा समयीं पूर्वींच्या वस्तुस्थितीनें त्याचें समाधान होत नाहीं. तींत बदल करून आपल्या विचारांशीं तिचा मेळ पडेल, असें रंगरूप तिला आणण्याचा प्रयत्न त्याजकडून होऊं लागतो. अशा स्थितींत लोकोत्तर सामर्थ्याचीं व अद्वितीय धैर्याचीं कांहीं मानवरत्नें समाजांत निपजलीं तर समाजास योग्य वळण लावण्याचा प्रयत्न त्यांच्या हातून कसा होत जातो, त्यांनीं हातीं घेतलेल्या कामांत त्यांस कसकशा अडचणा व कसकशीं विघ्नें येतात, आणि त्यांतून ते मोठ्या शिताफीनें पार पडून सत्य त्यांच्या बाजूस असल्यामुळें त्यांस कसें यश मिळतें, इत्यादि गोष्टी '**मार्टिन लूथर**'च्या जीवनवृत्तांतावरून बऱ्याच स्पष्ट होण्यासारख्या आहेत. तसेंच, सोळाव्या शतकाच्या पूर्वीं सगळें यूरोपखंड अज्ञानांधकारांत घोरत पडलें होतें; त्यानंतर प्राचीनभाषाध्ययन व मुद्रणकलादि ज्ञानप्रसारास साहाय्य

करणारीं साधनें त्यांत उद्भवून जी चळवळ जारीनें सुरू झाली, तिनें पाश्चात्यांची बुद्धिदेवता जागृत करून **रोम** येथील मुख्य धर्माधिकाऱ्याची गादी समूळ हालवून सोडिली. सोळाव्या शतकांत **यूरोपांत** जी जगत्प्रसिद्ध **धर्मक्रांति** झाली, ती याच धुमाकुळीचें फळ होय. ही धर्मक्रांति घडवून आणण्याच्या कामांत या **चरित्रनायकाचे** प्रयत्न बऱ्याच अंशीं कारणीभूत झाले.

दुसरें असें कीं, ज्या वेळीं ही धर्मक्रांति यूरोपांत घडून आली, त्यावेळची पाश्चिमात्यांची स्थिति व आपल्या समाजाची सध्याची स्थिति यांत बरेंच साम्य आहेसें दिसतें. त्यांचें धर्मसंबंधीं सर्व ज्ञानभांडार जसें **लाटिन** व **ग्रीक** भाषांमध्यें होतें, तसें आपलें ज्ञानभांडार **संस्कृत** भाषेमध्यें आहे. **लाटिन** भाषेचें ज्ञान त्यांच्यांत जसें फक्त **पोप** व इतर धर्मगुरूंस असे, तसें **संस्कृत** भाषेचें ज्ञान इकडे फक्त शास्त्री पुराणिकादि धर्माधिकाऱ्यांस हा कालपावेतों होतें. पुढें त्यांच्यांत प्राचीन भाषांचें अध्ययन सुरू होऊन धर्माचें खरें ज्ञान जसें लोकांत पसरूं लागलें, तसेंच इकडेही **संस्कृत** भाषा शाळांत व कालेजांत शिकवूं लागल्यापासून गृहस्थांस त्या भाषेचें ज्ञान होऊं लागून संस्कृतांतून प्राकृतांत भाषांतरें होऊं लागलीं आहेत. अशा प्रकारचें हें साम्य असल्यामुळें हें चरित्र वाचतांना इकडच्या व तिकडच्या स्थितीची तुलना करावयास वाचकांस अवकाश मिळून खऱ्याखोटयाचा निवाडा आपणाशींच करण्यास सांपडेल.

आणखी असें कीं, आपल्या देशांत समाजसुधारणेसंबंधानें चळवळ सर्वत्र सुरू झालेली दृष्टीस पडते, व ती घडवून आणण्या-

साठीं निरनिराळ्या दिशांनीं निरनिराळे प्रयत्न चालू आहेत असें दिसतें. तेव्हां अशा प्रसंगीं सुधारणेच्छूंनीं व विशेषेंकरून लोकाग्रणींनीं आपणावरची योग्य जबाबदारी ओळखून कसें वर्तन ठेविलें पाहिजे व त्यांच्या अंगीं मुख्यत्वेंकरून कोणकोणते गुण पाहिजेत, याचाही खुलासा या **चरित्रनायकाच्या** चरित्रावरून बराच होण्यासारखा आहे.

तेव्हां एक लोकोत्तर कृति करून सर्व जगाच्या स्तुतीस व कृतज्ञतेस पात्र झालेल्या **लूथरचें** चरित्र लिहिण्याचें मी कां मनांत आणिलें, याचीं कारणें वर सांगितल्याप्रमाणें आहेत. हा माझा अल्प प्रयत्न लोकांस कितपत मान्य होतो हें पहावयाचें आहे.

हें पुस्तक लिहितांना अमुक एका धर्माची निंदा करावी किंवा तमुक एका धर्माची स्तुति करावी असा माझा हेतु बिलकुल नसून, **चरित्रनायकाच्या** जीवनवृत्तांतांतील ठळक ठळक गोष्टी वाचकांपुढें ठेवाव्या व एकंदर चरित्रावरून जे कांहीं बरेवाईट विचार सुचतील ते यथामति प्रदर्शित करून त्यांची रजा घ्यावी इतकाच आहे.

या पुस्तकाचा हस्तलेख प्रथम रा. रा. गणेश जनार्दन आगाशे व रा. रा. रामचंद्र परशुराम गोडबोले या गृहस्थांनीं वाचून उपयुक्त सूचना केल्या, त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

हें पुस्तक विद्यार्थ्यांसही उपयोगी पडण्यासारखें आहे. **मार्ट्रिक्युलेशनच्या** व इतर परीक्षांत **यूरोपांतल्या** ह्या प्रसिद्ध **धर्मक्रांतीच्या** हकीकतीचे प्रश्न विचारले जातात. त्यांचा उलगडा या पुस्तकांत बराच झाला आहे.

**शं. गो. दे.**

## ज्या पुस्तकांच्या आधारानें हा लेख लिहिला त्या पुस्तकांचीं नावें.


(1) Martin Luther (Ward and Lock, Penny Series.)

(2) The History of Modern Europe–by Thomas Henry Dyer. Vol 1.

(3) Modern Europe–by W. Cooke Taylor.

(4) Macaulay's History of England, Vol 1.

(5) Carlyle's Heroes, Heroe-Worship.

(6) Martin Luther (Christian Literature Society, Madras.)

म. ५.७५१
ग्रंथालय
ठी. क्र. ९४
(स्थल

# मार्टिन लूथर.

## भाग पहिला.

वित्ते त्यागः क्षमा शक्तौ दुःखे दैन्यविहीनता।
निर्दंभता सदाचारे स्वभावोऽयं महात्मनाम्* ॥ १ ॥

सुभा. ॥

### जगांतील पराक्रमी पुरुष—लूथरच्या आंगची सरलता व त्याचा प्रामाणिकपणा.

ह्या जगांत केव्हां केव्हां अति महत्त्वाच्या गोष्टी घडून येतात. अशा गोष्टींपासून घडून येणारीं कार्येंही फारच मोठीं असल्यामुळें त्या गोष्टींचें स्मरण लोकांस नेहमीं राहतें. तसेंच या जगतीतलावर केव्हां केव्हां अशीं मानवरत्नें निर्माण होतात, कीं अशा मोठमोठ्या गोष्टी घडवून आणण्याचें विलक्षण सामर्थ्य त्यांच्या अंगीं असतें. त्यांचा उद्योग, त्यांचा दृढनिश्चय, त्यांचा स्वार्थत्याग, स्वीकृत कार्याबद्दलची त्यांची कळकळ, इत्यादि गुणांमुळें ते लोकांस पूज्य वाटतात व त्यांचें नांव अजरामर होतें. त्यांच्या आंगचें धैर्य तर इतकें अनुपम असतें कीं, कसें जरी

* धन असतां औदार्य, अधिकार असतां क्षमा, दुःखामध्यें दैन्य न दाखविणें, सद्वर्तन असूनही डौल न मिरवणें, हा स्वभाव मोठ्या मनाच्या लोकांचा असतो.

संकट त्यांच्यावर येऊन बेतलें किंवा त्यांना कर्तव्यापासून पराङ्मुख करण्याकरितां कोणी कसे जरी प्रयत्न केले, तरी त्यांचें त्यांच्यापुढें कांहींच चालत नाहीं. त्यांच्याशीं द्वेष धरून कोणी त्यांचा अतोनात छल करून त्यांस कसेंही दुःख दिलें तरी ज्या गोष्टी खऱ्या, वाजवी व हितप्रद आहेत ह्मणून त्यांची खात्री झाली असते, त्या करण्यास ते कधींच भीत नाहींत. कारण, त्यांची पक्की खातरी असते कीं, सत्य हें लोकांच्या नजरेसमोर कव्हांना केव्हां तरी येतेंच व त्याचा जयही होतोच.

अशा प्रकारच्या पराक्रमी व धैर्यशाली विभूतींमध्यें जर्मनी देशांतील अति विख्यात धर्मसुधारक–**मार्टिन लूथर**–याची गणना अवश्य केली पाहिजे. हा पराक्रमी पुरुष मूळचा जरी एका यःकश्चित् मजुराचा मुलगा होता, तरी तो आपल्या नैसर्गिक तेजानें अनाथांचा कैवारी बनून धर्मसंबंधीं वाक्कलहामध्यें निर्धास्तपणें झुंजला व मोठमोठ्या बादशहांस, संस्थानिकांस व जबरदस्त उपदेशकांसही दाद न देतां त्यानें **प्राटेस्टन्ट** धर्माचा विजयध्वज उभारिला; तसेंच, कसाही प्रसंग येऊन गुदरला तरी सदसद्विवेकबुद्धीस झुगारून द्यावयाचें नाहीं व हृत्पटलावर जो सत्याचा निर्मल व तेजस्वी ठसा उमटला असेल, त्यास अनुसरूनच सदा सर्वकाल वर्तन ठेवावयाचें, असा त्याचा पक्का निश्चय ठरला व तदनुरूप त्यानें वर्तन केलें. तसेंच,

"विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमाना
प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति।"

या उक्तीप्रमाणें त्याच्या हातून कृति झाली. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां मन आश्चर्यचकित होतें व चित्तवृत्ति गुंग होते. म्हणून, या थोर पुरुषाचें चरित्र कसें काय आहे हें समजण्याची विचारी लोकांस जिज्ञासा वाटावी हें साहजिक आहे.

या पुरुषाच्या अंगचा ध्यानांत ठेवण्यासारखा चांगला एक गुण असा असे कीं, तो जें जें काम हातीं घेई तें तें तो इतक्या उल्हासानें व उत्साहानें करी कीं, त्यास तो आपलें तनमनधन अर्पण करी. अशी त्याची वृत्ति असल्यामुळें जर्मनी देशांत धर्मसुधारणेचें जें स्तुत्य कृत्य त्यानें हातीं घेतलें, त्यांत त्याच्या हयातींतच त्यास यश आलें. त्याच्या उज्वल कीर्तीचा परिमळ सर्वत्र पसरला. त्याच्या ह्या सत्कृत्याबद्दल त्यास आणखी दुसरें बक्षिस कोणतें पाहिजे होतें ? त्या काळच्या व पुढच्या पिढीवर लूथरचें वजन बसलें. त्याच्याबद्दल लोकांच्या मनांत पूज्यभाव उत्पन्न झाला व त्याचें नांव अजरामर होऊन त्याचा यशोदुंदुभि सारखा दुमदुमत राहिला, या सर्व गोष्टींचें इंगित त्याची **सचोटी** व **सरळपणा** होय.

या जगद्विख्यात सुधारकानें जें जें काय केलें, तें तें सर्व उघड रीतीनें, सर्व जगाच्यापुढें येऊन केलें. त्याच्या कामांत कांहीं धरसोड, लपंडाव किंवा पेंचपाच याचा यत्किंचितही अंश नव्हता. एका विद्वानानें या पुरुषाबद्दल असें म्हटलें आहे कीं “ **लूथरचा** चरित्रक्रम, त्याचें अंतःकरण व त्याचें मन जगासमोर जितकें उघडपणें आलें आहे, तितकें इतरांचें क्वचित् आलें असेल. विचारान्तीं जीं काय त्यांचीं मतें ठरत, तीं तो लोकांस न

डगमगतां निर्धास्तपणें सांगे. या कामांत त्यानें कधीं संकोच धरिला नाहीं किंवा आडपडदाही ठेविला नाहीं. त्याच्या मित्रांच्या व श्रोतृसमाजाच्या मनावर त्याच्या संभाषणाचा ठसा असा बसे कीं, त्याच्या तोंडांतून निघालेले शब्द ते आपल्या अंतःकरणांत जणो काय सांठवून ठेवण्यास आतुर झालेले दिसत. आपल्या मनास खरें वाटेल तें निःशंक बोलून दाखविण्याचा त्याचा परिपाठ असल्यामुळें, विरुद्ध पक्षाच्या लोकांनीं त्याचा फार छळ केला; व त्यामुळें त्याच्यावर जसे कठीण प्रसंग गुदरले व जशा अडचणी आल्या तसे प्रसंग व तशा अडचणी फार थोड्यांवर आल्या असतील. असा जरी तो कचाट्यांत सांपडला होता व कसोटीस लावून त्याची परिक्षा पाहण्याचा प्रसंग जरी त्याच्यावर आला तरी त्यांतून न डगमगतां व कोणासही हार न जातां यश घेऊन तो पार पडला, ही गोष्ट लहानसहान आहे काय? त्याला चीत करण्याकरितां चोहोंकडून वादळ उठलें होतें. तरी तो न गडबडतां ठाम उभा राहिला ही गोष्ट मनांत आणिली म्हणजे त्याच्याबद्दलची पूज्यबुद्धि लोकांच्या मनांत जशी आजपर्यंत जागृत आहे तशीच ती निरंतर जागृत राहणार अशी खात्री वाटूं लागते.

## भाग दुसरा.

न स जातो येन जातेन याति वंशः समुन्नतिम् *

भर्तृहरिः ।

### लूथरचें कुल–त्याची बाल्यावस्था–व त्याचा विद्याभ्यास.

**साक्सनी** प्रांतांतील **एसल्बेन** या गांवीं इ. सन १४८३ या सालीं नोवेंबरच्या **११** व्या तारखेस हा पुरुष जन्मला. या गांवास हा मान अवचित मिळाला+. त्याचे आईबाप त्याच प्रांतांतील **मोहरा** या गांवीं रहात असून **एसल्बेन** गांवीं यात्रेकरितां गेले होते. यात्रेच्या गर्दींत त्याच्या आईस प्रसूतिवेदना होऊं लागल्या; तेव्हां शेजारच्या लहान भिकार घराचा आश्रय करून ती प्रसृत झाली. तिला मुलगा झाला. हाच या चरित्राचा नायक होय. त्याचें नांव आईबापांनीं '**मार्टिन**' असें ठेविलें. त्या वेळेस या कुटुंबाची फारच निकृष्टावस्था होती. **मार्टिन**चा बाप **ह्यान्स लूथर** मजुरीचा धंदा करून कसाबसा आपला निर्वाह करीत असे. त्याची आई **फ्राऊ लूथर** ही स्वतः सूत कांतून व तें विकून संसारास मदत करीत असे, व त्या प्रसूतीच्या दिवशीं कांहींतरी गरम कपडा खरेदी करावा ह्मणून या यात्रेस ती गेली होती. सारांश, या पतिपत्नीसारखें दारिद्र्यानें पीडित असें दंपत्य त्यावेळीं या जगांत क्वचित्च असेल. असो. **मार्टिन**ची आई ही

---

* ज्याच्या जन्मामुळें वंश उन्नतीला चढतो, त्याचाच जन्म खरा.

+ Heroes & Heroe-worship: T. *Carlyle*, page 118.

फार धर्मशील व ईश्वरपरायण स्त्री होती. लहानपणापासूनच आपल्या मुलाच्या मनावर नीतितत्त्वें बिंबविण्याचा तिनें यथाशक्ति यत्न केला, व त्याचें संगोपन विचारी व पोक्त आया करितात त्याप्रमाणें तिनें केलें. लूथरचा बाप जरी मजूर होता, तरी त्याला महत्वाकांक्षा नव्हती असें नाहीं. आपल्या मुलास चांगलें शिक्षण मिळून पुढें त्यानें कायदेपण्डित बनावें व मोठ्या नांवालौकिकास चढावें ही त्याची मोठी इच्छा होती. कारण, त्यावेळेस जगांत पुढें यावयास या कायदेपण्डिताच्या धंद्यासारखा दुसरा धंदाच नव्हता. बापानें **मार्टिन** यास **म्यान्सफील्ड** येथें एका शाळेंत घातलें व आपल्या मुलाचा अभ्यास आपल्या देखरेखीखालीं व्हावा म्हणून तीं उभयतां मातापितरें त्याच गांवीं जाऊन राहिलीं. **मार्टिन** मोठा झाल्यावर त्यावेळच्या शाळांस तो नेहमीं दोष देत असे. त्यानें एके प्रसंगीं त्याबद्दल असे उद्गार काढिले: ‘ माझ्या वेळच्या शाळा म्हणजे केवळ तुरुंगांप्रमाणें असत, व त्यांत जाणारीं मुलें केवळ नरकवास भोगीत असत. शिक्षकलोक मुलांचा व्यर्थ छल करीत; व त्यांस शिक्षक म्हणण्यापेक्षां फटके मारणारे हें नांव दिलें असतां तें जास्ती शोभण्यासारखें होतें. विद्यार्थ्यांस चांगलें उपयुक्त शिक्षण देण्याची योग्यता बहुतेक शिक्षकांच्या अांगीं नसे. ’

जर्मनी देशांत गरीब विद्यार्थ्यांस श्रीमंत लोकांपासून बरीच मदत मिळत असे. सणावाराच्या दिवसांत तर गरीब विद्यार्थ्यांच्या टोळ्या बडे लोकांच्या घरोघर भजन करीत व स्तोत्रें म्हणत हिंडत व लोकही त्यांस यथाशक्ति मदत करीत. मोठमोठ्या लोकांनीं तेथल्या विश्वविद्यालयास पैशांच्या मोठ्या रकमा दिल्यामुळें गरीब लोकांतून या देशांत विद्येच्या निरनिराळ्या शाखांत पारंगत असे

विद्वान निपजत; व अझूनही तोच क्रम सुरू असल्यामुळें विद्या-देवीचें साम्राज्य त्या देशांत बरेंच झालें आहे.

**मार्टिन लूथरचा** बाप अति दरिद्री होता ह्मणून वर सांगितलेंच आहे. ह्मणून **मार्टिनच्या** ज्या शिक्षणाचा प्रभाव सगळ्या दुनियेस दिसला, तें शिक्षण अशा उदार गृहस्थांच्या आश्रयानेंच झालें हें सांगावयास *नकोच. तो वारंवार आपल्या कांहीं मित्रमंडळीस ह्मणे,–' जे गरीब विद्यार्थी स्तोत्रें ह्मणत व गाणीं गात भिक्षेसाठीं तुमच्या दरवाजापाशीं येतात, त्यांचा तिरस्कार करूं नका. मीही पूर्वी भिक्षार्थ असाच ओरडत फिरत होतों.'

तो लहान असतांच त्याच्या अंगीं कांहीं विलक्षण उल्हास दिसून येई; व हीच उल्हासवृत्ति पुढें या पुरुषाच्या स्वभावाचें मुख्य लक्षण बनलें. तो ज्या गांवीं विद्याभ्यासाकरितां राहिला होता, त्या गांवीं कोणी " **अरसूला कोटा** " नांवाची पोक्त व उदार स्त्री राहत असे. **मार्टिनची** कविता ह्मणण्याची आवेशयुक्त व जोरदार शैली पाहून व हा अतिविपन्नावस्थेंत असूनही ज्ञाना-

---

* " In his fourteenth year, his parents put him to school at Magdeburg; and so extreme was his poverty, that while imbibing the rudiments of that learning which enabled him to shake the papal throne and deprive it of half of its subjects, he was obliged to eke out a scanty subsistence by singing & begging from door to door." *History of Modern Europe* by T. H. Dyer. Vol. I. Chapter III, page 382.

जनाविषयीं याचा उत्साह जागून तिला याची दया आली. हा गरीब विद्यार्थी ह्मणून तिनें यास आपल्या घरीं ठेविलें व त्याची अन्नावस्त्राची नीट व्यवस्था केली. संगीताकडे त्याच्या मनाचा स्वाभाविक कल आहे असें पाहून ती कला शिकण्याची तिनें आपल्याकडून होईल तितकी खटपट करून त्याची सोय करून दिली. तेणेंकरून संगीतकलेचा अभ्यास करण्यास त्यास बरेंच उत्तेजन आलें; व तो हरतऱ्हेचीं वाद्यें वाजविण्यास व गाणीं गावयास शिकला. या कलेचा अभ्यास करीत असतां, तिजबद्दल त्याच्या मनांत जी अतोनात आवड उत्पन्न झाली ती, त्याच्यावर पुढें नाना तऱ्हेचे बिकट प्रसंग आले तरी, कायम राहिली; इत-केंच नव्हे, तर मनुष्याच्या अंगचा उद्धटपणा घालवून त्यास सभ्य व सुविनीत करण्याच्या कामांत, अनुकंपादि थोर गुणांचा प्रसार त्याच्यांत उत्पन्न करण्याच्या कामांत, तसेंच धर्माचीं व नीतीचीं तत्त्वें संगीतांत बसवून गायिलीं असतां त्यांचा कायमचा ठसा बठविण्याच्या कामांत, या कलेचें किती महत्व आहे हें पूर्ण लक्षांत आणून त्यानें या कलेचा बलवत्तर व्यासंग केला. संगीतकलेबद्दल त्यानें एके ठिकाणीं असें ह्मटलें आहेः 'उदास व खिन्न मनास संगीत हें उत्तम सांत्वन होय. याच्याद्वारें अंतःक-रणास हुषारी येऊन चित्तवृत्ति शांत व प्रसन्न होतात, आणि मनुष्य पुनः कामकाज करण्यास ताजातवाना होतो. संगीत-शिक्षणानें मनुष्य जास्ती सभ्य, विनयी व विचारी होतो. या कलेंत जो प्रवीण होतो त्याचें मन संस्कृत होतें, व चांगल्या

गोष्टी करण्याची पात्रता त्याच्या अंगीं येते; म्हणून शाळांमध्यें तर हा विषय जरूर शिकविला पाहिजे. शाळांतील शिक्षकांचें या कलेंत नैपुण्य पाहिजे. ज्या शिक्षकांस ही कला अवगत नाहीं, त्यांस मी मानार्ह समजत नाहीं. संगीत ही एक ईश्वरदत्त पवित्र देणगी आहे.' असो. याप्रमाणें या कलेचें बरेंच महत्त्व त्यानें दाखविलें आहे.

शाळेंत असतां **लूथरला** जें शिक्षण मिळालें तें बेताबाताचेंच होतें. कायद्याचा अभ्यास करण्याकरितां **अरफर्ट**च्या विश्वविद्यालयांत त्याचा प्रवेश झाल्यापासून मात्र त्याच्यांत चांगलाच फरक पडत चालला. तेथील पुस्तकालयांत **लाटिन** भाषेंत लिहिलेल्या धर्मपुस्तकाच्या—**बायबल**च्या—प्रती होत्या, त्यांपैकीं एक प्रत अकस्मात् त्याच्या हातीं पडली. हें पुस्तक हातीं पडतांच त्यांतील नानाविध विषय व स्तोत्रें वाचून त्यास फारच आश्चर्य वाटलें. आश्चर्य वाटण्याचें कारण इतकेंच कीं, जेव्हां जेव्हां तो देवाच्या प्रार्थनेसाठीं प्रार्थनामंदिरांत जाई, तेव्हां तेव्हां धर्मपुस्तकांतील विषयांपैकीं किंवा स्तोत्रांपैकीं धर्मोपदेशकांकडून कांहीं एक प्रतिपादिलेलें त्याच्या ऐकण्यांत येत नसे. तेव्हां धर्मपुस्तकांत बऱ्याच महत्वाच्या गोष्टी असून त्यांचा यत्किंचित्‌ही लाभ लोकांस होऊं नये, याबद्दल त्याला वारंवार आश्चर्य वाटावें यांत नवल तें कोणतें ? हें पुस्तक हातीं पडल्यावर एकदोन अध्याय तर त्यानें मोठ्या उत्सुकतेनें व आनंदानें वाचिले. तेव्हां त्यास असें वाटूं लागलें कीं या पुस्तकाची एकादी प्रत आपणास मिळाली तर केवढा लाभ होईल ? व तसें झालें असतां आपणास

एक रत्नभाण्डार प्राप्त झालें असें आपण समजूं. त्याचें प्राचीन भाषा व कायदे यांचें अध्ययन सुरू असतां जी फुरसत त्यास सांपडे तींत तो धर्मपुस्तक अगदीं लक्षपूर्वक वाची; व हेंच महत्त्वाचें वाचन, त्याच्या हातून जें महत्कृत्य घडावयाचें होतें, त्यास कारणीभूत झालें. धर्मपुस्तकांत सांगितलेलीं सत्यवचनें व धर्मोपदेशकाकडून होत असलेला धर्मोपदेश यांमधील महदंतर त्याच्या लक्षांत स्पष्टपणें येऊं लागलें; ह्मणून खरा प्रकार काय आहे हें शोधून काढण्याची इच्छा त्याजमध्यें अधिकच जागृत होऊन त्याला त्या बाबतींत सारखी तळमळ लागून राहिली. तेव्हां अर्थातच कायद्याचा अभ्यास त्यास कंटाळवाणा वाटूं लागला. धर्मपुस्तकाच्या अध्ययनाकडे जरी त्याच्या मनाचा जबरदस्त ओढा होता, तरी प्राचीन भाषांचें अध्ययन त्यानें सुरू ठेविलेंच होतें. त्याचा स्नेही **मेलांक्थन** यानें त्याबद्दल असें ह्मटलें आहे कीं ' **अरफर्ड** येथें असतांच **लूथरचें** प्राचीन भाषांचें अध्ययन इतकें झालें होतें कीं **सिसरो व्हर्जिलादि** मोठमोठ्या ग्रंथकारांचे ग्रंथ त्यानें समग्र वाचिले होते. ' कायद्याच्या अध्ययनानें व प्राचीन ग्रंथांच्या व्यासंगानें त्याची लिहिण्याची व बोलण्याची शैली इतकी जोरदार व चटकदार बनली कीं, पुढें सगळा **जर्मनी** देश तिनें विस्मित केला. आपल्या अस्खलित वाणीनें व खुबीदार आणि मुद्देसूद लेखनशैलीनें लोकांस थक्क करण्याचा तर त्याचा बाणा असे. तरी पण, त्याच्या प्रतिपक्ष्यांप्रमाणें त्याच्या बोलण्यांत किंवा लिहिण्यांत ग्राम्य भाषा बहुतकरून आढळून येत नसे व त्यांत अतिशयोक्तिही नसे.

इ. स. १५०५ यावर्षी त्याची एम्. ए. ची परीक्षा उतरली. वयानें लहान असतांच त्याच्या अध्ययनाची मजल येथपर्यंत येऊन पोहोंचली. या गोष्टीवरून त्याच्या बुद्धीची तीव्रता व ग्राहकता या गुणांची चांगली साक्ष पटते.

## भाग तिसरा.

संसारे रे मनुष्या वदत यदि सुखं स्वल्पमप्यस्ति किंचित् ॥ *

' भर्तृहरिः '

### त्याचा मित्र ' अलेक्सिस ' याचा मृत्यु-
### लूथर मठवासी बनतो.

त्यानें अरफर्टचें विश्वविद्यालय सोडल्यानंतर अशी एक गोष्ट घडून आली कीं, तिच्या योगानें त्याच्या आयुष्यक्रमणास एक निराळीच दिशा मिळाली. आपल्या **अलेक्सिस** नांवाच्या मित्राबरोबर **लूथर** प्रवास करीत असतां एक भयंकर वादळ उठलें व त्याच्या मित्राच्या अंगावर वीज पडून तो मृत्युमुखीं पडला. मृत्यूचा भयंकर प्रसंग पाहिल्याबरोबर मनुष्याच्या चित्त-वृत्ति अगदीं गुंग होऊन जातात व ' धिगिमां देहभृतामसारताम् ' या कालीदासाच्या उक्तीचें स्मरण होऊन मन उदास व विरागी होतें. अशीच स्थिति **लूथरच्या** मनाची त्या वेळेस झाली. आपला धट्टाकट्टा मित्र आनंदानें बोलत चालत असतां, त्याजवर अकस्मात् मृत्युची धाड पडून, एकदम तो इहलोक सोडून गेला, असा विचार मनांत येऊन व आपल्या प्रियमित्राच्या शवाचा भयंकर देखावा पाहून त्याच्या मनावर कांहीं चमत्कारिक परिणाम झाला. काय हें आपलें क्षणार्धांत नष्ट होणारें जीवित ! किती हा क्षण-भंगुर संसार ! असें असतांही महत्वाकांक्षादि मनोविकार या जगाच्या रंगभूमीवर नटाप्रमाणें आपणास किती तरी नाचावयास लावितात ! बरें, मरणोत्तर तरी आत्म्याची काय स्थिति होत

---

* ' मनुष्यांनो, संसारांत यत्किंचित् तरी सुख असतें काय ? बोला.

असेल ! अशा नानातऱ्हेच्या कल्पनांनीं त्याच्या मस्तकांत काहूर उठविलें व त्यास कांहींच सुचेनासें झालें. कांहीं वेळानें त्याच्या चित्तवृत्ति शांत झाल्यावर त्याचा असा निश्चय ठरला कीं, संसाराच्या इतर भानगडींत न पडतां सर्व आयुष्य ईश्वरास अर्पण करावयाचें व त्याच्या सेवेशिवाय दुसरें आपणास कांहींच करावयाचें नाहीं. त्यावेळेस त्याच्या तोंडांतून असे उद्गार निघाले कीं, ' परमेश्वराची कृपा झाल्यास, मठवासी होऊन राहिलेले आयुष्याचे दिवस धर्मदीक्षेंत घालविण्याचा माझा ठाम निश्चय झाला आहे. '

त्याचा निश्चय झाला व तो पक्का ठरला. प्रवृत्तिमार्ग व्यर्थ आहे, असें त्यास वाटूं लागलें. निवृत्तिमार्गाकडे त्याच्या मनाचा ओढा लागला. ह्मणून निश्चयाप्रमाणें वर्तन करण्यास योग्य ती तयारी तो मोठ्या उल्हासानें व आनंदानें करूं लागला. सर्व निरवानिरव करावयास त्यास सुमारें पंधरा दिवस लागले. विश्वविद्यालयाच्या अधिकाऱ्याकडे जाऊन त्यानें एम्. ए. ऊर्फ ' मास्टर आफ् आर्टस् 'च्या पदवीचा झगा व मुद्रिका त्याजकडे परत केली. विश्वविद्यालयांतील शेवटची परीक्षा उतरून एकदाची पदवी मिळाली, ह्मणजे आपणापेक्षां आतां वरचढ कोणी नाहीं, व जें कार्य करावयाचें तें आपण जगास करून दाखविलें, असें समजणाऱ्या पदवीधरांपैकीं लूथर नव्हता, ही गोष्ट फार लक्षांत ठेवण्यासारखी आहे. असो; तसाच तो आपल्या बापाकडे गेला. त्याला त्यानें आपला हेतु कळविला. त्याचा निश्चय पाहून बापाची साहजिकच फार निराशा झाली, व त्यास कांहींही

वाटलें. थोड्या दिवसांनीं आपला बुद्धिमान् मुलगा तरतरीत बारिस्टर बनून आपली स्थिति सुधारील व आपल्या कुलाचा लौकिक वाढवील व नांव काढील, अशी त्याला फार फार उमेद होती; ती आतां पार लयास गेली. बापानें मुलास त्याच्या निश्चयापासून परावृत्त करण्याची होईल तितकी खटपट केली, पण व्यर्थ. त्याच वर्षी, ह्मणजे इ. स. १५०५ त, जुलईच्या १७ व्या तारखेस अरफर्ट येथील मठांत त्याचा प्रवेश झाला.

या बाबतींत त्याचा निश्चय एकदम ठरला. तो दीर्घकाल टिकेल, असें मठाधिकाऱ्यांस वाटेना. ह्मणून कडक रीतीनें त्याची कसोटी पहाण्याचा त्यांनीं बराच यत्न केला. मठाच्या कोठड्या झाडणें, मठाकरितां भिक्षा मागणें, इत्यादि हलकीं कामें त्याच्याकडून ते मोठ्या सक्तीनें करून घेत. त्यामुळें तो बराच त्रस्त झाला. पण त्याला सगळ्यांत अति कंटाळवाणें जें काम वाटे तें हें कीं, रोजच्यारोज नियमित वेळीं नियमित धर्मस्तोत्राचें पठन करणें. हें काम त्याला अगदीं घड्याळाप्रमाणें न चुकतां करावें लागत असे. तो जो पाठ करी त्याचा अर्थ त्यास कळत नसल्यामुळें त्यापासून त्याच्या मनास कांहींच बोध होत नसे. तें नेमलेलें काम ह्मणून कसें तरी करणें त्याला भाग पडत असे. +व्रतें उपोषणें करून व कवायतीसारखे धर्मसंस्कार करून आत्म्यास

+ It could not be clear to him how, by fasts & formalities a man's soul could be saved. *Carlyle*, Heroe-worship.

मुक्ति कशी मिळावी, हें त्यास समजेना. अशा जाचाच्या स्थितींत त्यानें सुमारें दोन वर्षें काढिलीं. याप्रमाणें तो कसोटीस उतर- ल्यावर त्यास विधिपूर्वक धर्मोपदेश झाला. आपला मुलगा केवळ हूडपणानें या नादीं लागला, किंवा त्यास कोणी भुलथाप देऊन नादीं लाविलें, किंवा या बाबतींत त्याचा मनःपूर्वक निश्चय झाला,— याजबद्दल बापानें आपली पूर्ण खातरी करून घेतली. तेव्हां त्यास खातरीपूर्वक कळून आलें कीं, त्याचा पक्का निश्चय त्या मार्गाकडे त्याच्या मनाची प्रवृत्ति झाल्यामुळेंच ठरला.

# भाग चवथा.

ये भजन्ति तु मां भक्त्या ।
मयि ते तेषु चाप्यहम् ॥ २९ ॥ *

भगवद्गीता.

## धर्माचे योगानें मनास शान्ति आणण्याचे त्याचे प्रयत्न-भक्तीनेंच त्याच्या मनास शांतता मिळते.

**लूथर**ला या पंथाचा आरंभीं जरी मोठा अभिमान वाटे, तरी कांहीं काळ लोटल्यावर त्याचा हुरूप जाऊन त्याचें मन बरेंच साशंक होऊं लागलें व त्याची बहुतेक निराशा होत चालली; त्याची चित्तवृत्ति उदास होऊं लागली; ईश्वराचा आपणावर कोप आहे, असें त्यास वाटूं लागलें. मनुष्यांच्या पातकांबद्दल तो सर्वांचा सूड उगवीत आहे, असेंही त्याच्या मनानें घेतलें. त्या मठांतील मुख्य अधिकारी कोणी **स्टॉपिट्स** नांवाचा होता. हा गृहस्थ फार थोर मनाचा व उदार बुद्धीचा होता. त्याजपाशीं **लूथर** ह्मणाला कीं, ' ईश्वर आपणाशीं फार निर्दय-पणानें वागतो, तेव्हां त्याच्या ठिकाणीं आपलें लक्ष कसें लागावें ? ' यावर त्या गृहस्थानें उत्तर दिलें कीं, " तुझें बोलणें नास्तिकपणाचें आहे. ईश्वर आपणाशीं क्रूरतेनें कधींच वागत नाहीं. उलट तो आपलें सांत्वन करितो. " आपल्या मनास शांतता वाटावी ह्मणून **लूथर**नें उपोषणें, व्रतें व नेम वगैरे नाना तऱ्हा करून पाहिल्या. त्यामुळें त्याचें शरीरही बरेंच झिजलें, पण

---

* जे भक्तीनें माझी पूजा करितात, त्यांच्यामाझ्यामध्यें तादात्म्य होतें.

त्याच्या मनास शांति ह्मणून वाटेना. तो ह्मणे 'मी कांहींच पाप करीत नाहीं आणि निरुपद्रवी व शुद्ध साधुप्रमाणें कालक्रमणा करितों. असें असूनही जसें मन शांत व प्रसन्न पाहिजे, तसें रहात नाहीं. ईश्वरोपासना करण्याकरितां जी समाधानवृत्ति पाहिजे, ती मला कधींच प्राप्त होत नाहीं. ह्मणून त्यायी ईश्वराबद्दल जें प्रेम उत्पन्न झालें पाहिजे, तें तर होत नाहींच, पण उलट तिरस्कार मात्र उत्पन्न होतो.' याप्रमाणें त्याच्या मनाची एके प्रकारची खेदजनक व उद्विग्न स्थिति झाली होती.

परंतु अंधकार हळूहळू नाहींसा होत जाऊन जसा प्रकाश पडतो, तद्वतच धर्मपुस्तकाच्या निरंतर वाचनानें त्याचा भ्रम जाऊन त्याची खात्री होत चालली कीं, ज्या कोणास मुक्ति खरोखर पाहिजे असेल, त्यानें **परमेश्वरा**च्या कृपेवर पूर्ण निष्ठा ठेविली तरच त्यास ती मिळेल. एरवीं दुसरा मार्गच नाहीं. धर्मपुस्तकाचें वाचन व मनन हींच तरणोपायाचीं साधनें आहेत, अशी त्याची पक्की समजूत झाली. तेव्हांपासून अंतकालपावेतों त्यानें हीं साधनें सारखीं सुरू ठेविलीं. एके प्रसंगीं तो एका धर्मोपदेशकास धीटपणानें असें ह्मणाला—'माझें कोणी शिर कापून नेलें तरी हरकत नाहीं; पण मी पवित्र धर्मपुस्तकाचें अध्ययन कधींच सोडणार नाहीं. ईश्वरभक्ति करण्याचा अधिकार व धर्मपुस्तकाचें अध्ययन करण्याचा अधिकार प्रत्येकास आहे. धर्मपुस्तक वाचून त्यांतील निरूपण अमुक एका व्यक्तीनेंच करावें असे नाहीं.' असें जें जें कांहीं तो प्ररूढ विचारांविरुद्ध प्रतिपादन करी, त्याच्या समर्थनार्थ धर्मपुस्तकांतील प्रमाणें देई. अंधेरांतून रस्ता काढावयास जसा

दिवा, तसेंच धर्मपुस्तक लूथरास होतें. तसेंच हें पुस्तक, त्याजबरोबर कसाही बलाढ्य शत्रु सामना करण्यास आला असता, तरी त्याजपासून स्वरक्षण करण्यास मोठें मजबूत साधन त्याच्या हातीं होतें, असें ह्मटलें तरी चालेल.

# भाग ५ वा.

किं किं न साधयति कल्पलतेव विद्या ।। १ ।। *

## विटेनबर्ग येथील विश्वविद्यालयांत लूथरची नेमणूक; त्याचा धर्मोपदेश.

**अरफर्ट**चा मुख्य मठाधिकारी **स्टापिट्स** या थोर गृहस्थाबद्दल मागें उल्लेख केलाच आहे. या गृहस्थाची व **लूथर**ची चांगलीच मैत्री जमली. या वेळेस **लूथर**चें वय पंचवीस वर्षांचें होतें. ऐन तारुण्याची उमेद, मनाचा स्वाभाविक उल्हास, बुद्धीची तीव्रता, नाना तऱ्हेच्या अडचणी, यातना व कष्ट यांच्या तालमीतून तावून सुलाखून निघाल्यामुळें अंगीं आलेला करारीपणा, प्राचीन भाषांच्या अध्ययनानें प्रगल्भ झालेली बुद्धि, व धर्मपुस्तकाची खडान्खडा माहिती,—या सर्व गोष्टींचा मिलाफ ज्याच्या ठिकाणी झाला होता, असा हा दिलदार मोहरा **स्टॉपिट्स**सारख्या गुणग्राही गृहस्थास प्रिय व्हावा, त्याची याजवर पूर्ण मर्जी बसावी, व याच्याबद्दल त्याच्या मनांत आदर बुद्धि उत्पन्न व्हावी, हें साहजिकच आहे. याच वेळेच्या सुमारास **साक्सनी**चा राजा **फ्रेडरिक** यानें **विटेनबर्ग** येथें नुकतेच एक विश्वविद्यालय स्थापिलें होतें. त्यांत एका उपगुरूच्या जागेसाठीं **स्टापिट्स**नें

---

* कल्पवृक्षाप्रमाणें विद्या काय काय साध्यकरून देत नाहीं.ाणी

**लूथर**ची शिफारस केली. जागेवर लवकर हजर व्हावें ह्मणून राजाचा हुकूम येतांच **लूथर** लागलाच **विटेनबर्ग** येथें निघून गेला. जातेवेळीं त्यानें आपल्याबरोबर जें सामान नेलें तें त्याच्या संन्यासवृत्तीस साजणारें होतें. पण त्या सामानांत त्याच्या समजुतीप्रमाणें दोन अमोल अशीं रत्नें होतीं: एक **लातीन** भाषेंतलें व एक **ग्रीक** भाषेंतलें अशीं दोन धर्मपुस्तकें होतीं. **लूथर** हा **विटेनबर्ग** येथें जाऊन आपल्या जागेवर हजर झाला. या जागेवर असतांना याला **आरिस्टाटला**च्या ग्रंथांचें निरूपण करावें लागे. हें काम त्याच्या अभिरूचीप्रमाणें नसल्यामुळें अर्थातच त्यास फारसें आवडत नसे. परंतु लवकरच त्याची थिऑलजीच्या प्रोफेसरच्या जागीं नेमणुक झाल्यामुळें आवडीप्रमाणें त्यास काम मिळालें. त्याचप्रमाणें त्यास नगरधर्मोपदेशकही नेमिलें होतें. ही त्याची नेमणुक सुद्धां **स्टापिट्स**च्या आग्रहानेंच झाली. **लूथर**ची इच्छा नसतांही **स्टापिट्स** त्यास मोठमोठीं कामें करण्यास पुढें ढकलीत असे. ह्यावेळीं तो **स्टापिट्स**ला ह्मणाला कीं ‘ इतकीं जबाबदारीचीं कामें मजकडून व्हावयाचीं नाहींत. मजवर हीं लादल्यामुळें माझी प्रकृति बिघडण्याचा मात्र संभव आहे. ’ ह्यावर **स्टापिटस्**नें उत्तर दिलें ‘ हरकत नाहीं; मरण आलें तरी ईश्वरासंबंधीं काम करण्यांतच येईल. व असें मरण थोडक्यांच्याच नशिबीं असतें. ’

**लूथर**च्या हुशारीबद्दल **स्टापिट्स**चा जो अजमास झाला होता, तो अगदीं खरा ठरला. तसेंच **लूथर**ला आपण इतकीं मोठीं कामें चांगल्या रीतीनें तडीस नेण्यास असमर्थ आहों

असें वाटलें होतें, तें व्यर्थ होतें, हें आतां स्पष्ट दिसूं लागलें. देवालयांत, कालेजांत, मठांत किंवा इतर ठिकाणीं जेथें जेथें ह्मणून तो धर्मसंबंधीं व्याख्यान देई किंवा संभाषण करी, तेथें तेथें ऐकणारांचीं अंतःकरणें तो गारीगार करून सोडी. विषय-प्रतिपादनाची नवी तऱ्हा, जोरदार आवाज, विषयाशीं तन्मय झालेली वृत्ति व अप्रतिम वक्तृत्व, इत्यादि गोष्टींनीं श्रोत्यांच्या चित्तवृत्ति उचंबळून ते तल्लीन होत. व्याख्यानांतील विचारसरणी श्रोत्यांच्या मनावर चांगली ठसण्याकरितां तो भरपूर दाखले देई, व तेही धर्मपुस्तकांतले असल्यामुळें लोकांच्या मनावर कायमचा ठसा उमटून व्याख्यानाकडे त्यांची सारखी तन्द्री लागून राहत असे. त्याचप्रमाणें विद्यार्थ्यांस शिकविण्याच्या विषयासंबंधीं व्याख्यानें सुद्धां तो फार आस्थेनें व मेहनतीनें तयार करी; ह्मणून तीं उत्तम वठत.

या विद्यालयाच्या मुख्य शिक्षकास **रेक्टर** अशी संज्ञा असे. या-वेळेस डाक्टर **पोलिक** या नांवाचा गृहस्थ **रेक्टर** होता. हा विद्वान गृहस्थ असून फार धूर्त असे. **लूथरची** ज्ञान संपादण्याची उत्कृष्ट इच्छा, त्याचा बलवत्तर व्यासंग व विलक्षण हुरूप पाहून त्यानें प्रथमच भाकित केलें कीं, या तेजस्वी पुरुषाच्या खटपटीचा परिणाम फार लोकोत्तर होईल. तो नेहमीं ह्मणे कीं, **लूथर** हा हल्लींच्या सर्व विद्वान मंडळाची त्रेधा उडवील, धर्मोपदेशाची सर्व तऱ्हा बदलून टाकील व धर्माची सुधारणा करील. कारण धर्मपुस्तकां-तील खरीं तत्वें शोधून काढण्याची जिज्ञासा त्याच्याठिकाणीं

जितकी प्रबल दिसून येते तितकी दुसरी कोणाच्याही ठिकाणीं दिसून येत नाहीं, व तो जें रहस्य मार्मिकतेनें शोधून काढील त्याचा पाडाव कोणी कसें जरी तर्कट लढविलें तरी व्हावयाचा नाहीं. '

लूथरनें जें महत्कार्य करून आपलें नांव अजरामर करून सोडिलें तें कार्य हातीं घेण्यास त्यास स्फुर्ति कशी झाली, व मुख्य धर्माधिकारी व तो यांच्यामध्यें रण कसें माजत गेलें. याबद्दल मनोरंजक हकीकत पुढच्या भागांत येईल.

## भाग ६ वा.

This Rome, this scene of false priests clothed not in the beauty of holiness, but in far other vesture, is ‘False.’

*Carlyle.*

### रोम शहरास प्रस्थान; तेथील धर्माधिकाऱ्यांची स्थिति.

धर्मसुधारणेसारखें जें महत्कार्य त्याच्या हातून घडावयाचें होतें, त्यास त्याचें मन अनेक चमत्कारिक रीतीनें तयार होत गेलें. विद्यालयांत त्याची नेमणूक झाल्यानें सयुक्तिक व पद्धतशीर रीतीनें संभाषण करण्याची हातोटी त्यास बरीच साधली. तसेंच त्याचा विद्याव्यासंग नेहमीं सुरू असल्यामुळें त्याच्या अंगीं बरीच बहुश्रुतता आली व त्याचा अधिकारही आतां मोठा झाला. ह्याच वेळेच्या सुमारास धर्माचें व धर्माधिकाऱ्याचें मुख्य ठिकाण जें **रोम** शहर तें कांहीं कारणामुळें पाहण्याची त्यास संधि मिळाली. या शहरीं गेल्यावर जो प्रत्यक्ष प्रकार त्याच्या दृष्टीस पडला, त्यावरून धर्मसुधारणेबद्दल त्याच्या मनांतील अगोदरच उद्भवलेली इच्छा चांगलीच जागृत होऊन ती बरीच दृढ झाली. इ. स. १५१० यावर्षी **स्टापिट्सनें** कांहीं कामाकरितां त्यास **रोम** शहरीं पाठविलें.

या वेळेस **रोम** येथील धर्माधिकाऱ्यांच्या दरबारचा थाटमाट व डामडौल अगदीं शिखरास जाऊन पोहोंचला होता. त्यांचे

भव्य प्रासाद, त्यांचा ऐष आराम, त्यांची चैन, त्यांचे सुखविलास, व त्यांचा एकंदर राहण्याचा भपका—इत्यादि गोष्टी अशा होत्या कीं त्या पाहून एखादा धनाढ्य—नव्हे एखादा राजासुद्धां—आश्चर्य-चकित होऊन तोंडांत बोट घालील. जीं भव्य इमारतींचीं कामें त्यांनीं केलीं होतीं, त्यांमध्यें एका प्रचंड देवळाचें अवाढव्य काम त्यांनीं आरंभिलें होतें. या कामांत अतोनात खर्च झाला होता, तरी तें पूर्ण झालेंच नव्हतें. तें संपविण्याकरितां बरेंच द्रव्य पाहिजे होतें. धर्माधिकाऱ्यांचें उत्पन्न त्यांच्या एकंदर थाटमाटास शोभेल असेंच अवाढव्य होतें. तरीपण, खर्च त्याहीपेक्षां जास्ती असल्यामुळें पैशाची तूट पडे. ऐषआरामांत कमी पडूं न देतां आरंभिलेल्या देवळाचें अवाढव्य काम शेवटास न्यावयाचें होतें ह्मणून धर्माच्या नांवाखालीं धर्माध्यक्षांनीं उत्पन्नाच्या कांहीं नवीन बाबी शोधून काढिल्या; व लोकांस पुरी भुरळ पाडून आपला भिक्षु-की कावा त्यांनीं पूर्ण अमलांत आणिला. त्यांचा दुराग्रह व दुर-भिमान या वेळेस इतका वाढला होता कीं, ज्या कामांत त्यांचा संबंध नसेल त्या कामांत सुद्धां ढवळाढवळ करून ते आपल्या लहरीप्रमाणें त्या कामाचा निकाल करून घेत. त्यांचें वर्चस्व केवळ साधारण लोकांवरच होतें असें नाहीं; मोठमोठ्या राजांस सुद्धां त्यांचा दरारा वाटे. धर्मगुरूंची सत्ता तर इतकी वाढली होती कीं, अतिशय प्रबल बादशहांससुद्धां ते पदच्युत करीत व त्यांच्या प्रजेस, प्रधानांस व त्यांच्या मुलांस सुद्धां त्यांच्याविरुद्ध उठण्यास सांगून ते तसे प्रसंग घडवून आणीत. लोकांमध्यें जस-जसा धर्मभोळेपणा वाढत चालला, तसतसे धर्माध्यक्ष इतर जनते

पेक्षां जास्ती पवित्र वाटूं लागले. ह्मणून इतर लोकांवर ज्या कायद्यांचा अंमल चाले व त्यांस ज्या शिक्षा होत त्या कायद्यांपेक्षां व, त्या शिक्षांपेक्षां धर्मगुरूंसंबंधीं कायदे व शिक्षा निराळ्या असाव्या असें साहजिक वाटून त्याप्रमाणें प्रचारही पडला. या धर्माध्यक्षांचें अनीतिचें वर्तन व त्यांच्यामध्यें धर्मसंबंधीं माजलेली भ्रष्टता, निरनिराळ्या कामांत त्यांचा अरेरावीपणा वगैरे गोष्टींची माहिती जर्मनी व इतर देशांतील लोकांस हळूहळू बरीच झाली. या सुरू असलेल्या प्रकाराबद्दल लोकांमध्यें बरेंच असमाधान पसरून त्यांस बराच तिरस्कार वाटूं लागला. कारण, लोकांच्या मनाची स्थिति आतां मागल्या काळांत होती तशी राहिली नव्हती. त्यांच्यामध्यें ज्ञानरवीच्या किरणांचा प्रसार हळूहळू होत गेल्यामुळें अज्ञानांधकार नाहींसा होत. चालला होता. अज्ञान जितकें जास्त तितका धर्मभोळेपणा जास्त. अज्ञान स्थितींतील लोकांस खरें खोटें व बरें वाईट यांतील सूक्ष्म भेदाभेद जाणण्याची बुद्धि नसते; ह्मणून त्यांच्यापेक्षां कांहीं जास्ती ज्ञानसंपन्न व विशेषेंकरून स्वार्थसाधु अशा धर्मगुरूंची दीक्षा घेतलेल्या लोकांनीं धर्माचें स्वरूप देऊन वेडगळ गोष्टी त्यांस सांगितल्या तरी त्यांस त्या खऱ्या वाटूं लागतात. याप्रमाणें त्यांची अंधपरंपरा वाढत जाऊन ते आपल्या धर्मगुरूंचे दास बनतात. त्यांच्यांत विचारांकुर कधींच उत्पन्न होत नाहींत. जे धर्मगुरु कावेबाजपणानें भोळसर लोकांस भुरळ पाडितात, ते तर त्यांस इतके पवित्र वाटतात कीं, त्यांस त्यांनीं कितीही दान केलें व कांहींही दिलें तरी तें त्यांस कमीच वाटतें. अखेरीस अशा धर्मगुरूंस अति धनाढ्य करून

पूर्ण सत्ताधीश बनविल्यावांचून त्यांस चैन पडत नाहीं. इतकी धर्मग्लानि झाल्यावर अशा लोकांचा समाज प्रत्येक बाबतींत अवनत स्थितीस येऊन पोहोंचला तर काय आश्चर्य आहे ?.

सोळाव्या शतकाच्या आरंभापासून युरोपांतील बहुतेक राष्ट्रांतल्या लोकांस त्यावेळीं प्ररुढ असलेल्या क्याथलिक धर्माच्या उन्नत स्वरूपाबद्दल बरीच शंका येऊं लागली. धर्माधिकाऱ्यांची नीतिभ्रष्टता व त्यांचा स्वार्थसाधूपणा पाहून धर्मसंबंधीं त्यांचे बनलेले ग्रह डळमळूं लागले. कारण, पूर्वींच्या काळांत लोकांच्या मनाची जशी स्थिति होती तशी इतउत्तर राहिली नाहीं' ह्मणून वर सांगितलेंच आहे.

सोळाव्या शतकाच्या पूर्वीं बहुतेक युरोपची स्थिति फार नादान + होती. जें काय थोडें बहुत ज्ञान होतें, तें फक्त धर्मोपदेशकांस असे. पांचशें लोकांपैकीं एकासमुद्धां धर्मपुस्तकांतील एक अक्षर काढण्याची मारामार असे. पुस्तकें अगदीं थोडीं,—बहुतेक नव्हतीं ह्मटल्यास हरकत नाहीं. तींही हस्तलिखित असल्यामुळें त्यांस अतोनात किंमत पडे. मुद्रण—कला तर त्या वेळीं ठाऊकही नव्हती. जें बायबल आतां अगदीं एकाद्या अति दरिद्री मनुष्यासही सहज मिळण्यासारखें आहे, त्याहीपेक्षां भिकार रीतीनें बांधलेलें बायबल विकत घेण्याचें सामर्थ्यें पुष्कळ धर्मोपदेशकांस सुद्धां नसे. तेव्हां अर्थांतच धर्मपुस्तकांत काय आहे हें गृहस्थाश्रमी मनुष्यास कळण्याची कल्पना मनांत सुद्धां आणावयास नको.

---

+ Macaulay's History of England, Vol. I.

पण तो मनू सुमारें १६ व्या शतकाचे आरंभापासून बहुतेक पालटला. **लाटिन** व **ग्रीक** भाषांचें अध्ययन लोकांमध्य झपाट्यानें सुरू झालें. त्यामुळें धर्मपुस्तक बऱ्याच लोकांस समजूं लागलें होतें. तसेंच मुद्रणकलेचाही प्रसार हळू हळू होत गेल्यामुळें धर्मपुस्तकाच्या प्रती पूर्वीसारख्या महाग न राहतां बऱ्याच स्वस्त झाल्या होत्या. हरतऱ्हेच्या उपयुक्त विषयांचें ज्ञान, पुस्तकें स्वस्त मिळूं लागल्यामुळें, लोकांत वाढत चाललें होतें. ह्मणून ज्ञानभाण्डाराच्या किल्ल्या इतउत्तर पोप मंडळाच्याच स्वाधीन न राहतां तें भांडार गृहस्थांस खुलें होत चाललें होतें. प्राचीन भाषाध्ययनाच्या अंजनानें फार कालपावेतों दृढावत गेलेलें अज्ञानपटल नाहींसें होऊन लोकांची ज्ञानदृष्टि साफ होत चालली होती. पोपमंडळानें लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन व मुक्तीचें आमिष दाखवून मोठ्या युक्तीनें व शिताफीनें ज्या मोहजालांत हजारों-लाखों-लोकांस ओढिलें होतें, तें जाल आतां तटातट तुटत चाललें होतें; व त्यांचा तर्कटी वादविवाद शुष्क आहे अशी लोकांची खात्री होत चालली होती. धर्मपुस्तकांतील ज्ञानशस्त्र हातीं येतांच पोपमंडळाचा मोड करण्यास लोक तयार होत चालले होते. विद्येचें पुनरुज्जीवन व धर्मशास्त्राचा अभ्यास हीं दोन जोरदार शस्त्रें त्यांची खोडकी जिरविण्यास पुरेशीं झालीं. मोठमोठ्या शहरांतील वजनदार अधिकारी वर्गापेक्षांही धर्मोपदेशकांचे अधिकार व हक्क जास्तीच वाढत गेल्यामुळें अधिकारीवर्गासही त्यांचा वीट येत चालला होता. विचारी लोकाचें मत असें बनत चाललें होतें कीं, मठासारख्या पवित्र

स्थलांचा सर्व पवित्रपणा व गांभीर्य चट् सारें जाऊन तीं स्थलें चोर व **डाकेखोरांस** पोसण्याचीं ठाणीं होऊन बसलीं आहेत. याप्रमाणें रावापासून तों रंकापर्यंत सर्व वर्गांतील लोक पोपाविरुद्ध उठत चालले. यावेळेच्या वाङ्मयांतून व विशेषेंकरून जर्मन वाङ्मयांतून पोप व धर्माधिकारीमंडळी यांच्याविरुद्ध कडक लेखांचा व मर्मभेदक टीकांचा सारखा प्रवाह सुरू होता.

याप्रमाणें सभोंवतालची वस्तुस्थिति बदलून **धर्मक्रांतीस** अनुकूल असा काल येऊन ठेपला होता. यावेळेच्या सुमारास "**स्टापिट्सनें**" मठासंबंधीं कांहीं काम देऊन **लूथरास रोम** येथें पाठविलें होतें ह्मणून मागें सांगितलेंच आहे. तो प्रवास करीत करीत **इटली** देशांत आला. तेव्हां धर्मसंबंधी स्थिति पाहून व विशेषें करून मठवासी लोकांचा चारित्रक्रम पाहून तर त्यास सखेद आश्चर्य वाटलें. संगमरवरी दगडांनीं बांधलेलीं त्यांचीं भव्य मंदिरें, राजेरजवाड्यांच्या थाटमाटास साजेशीं अनेक पक्वान्नें, धर्मोपदेशकांची धार्मिक व नैतिक शिथिलता, व्रतनेमाचा अभाव ह्या व अशा इतर पुष्कळ गोष्टी त्याच्या प्रत्यक्ष पाहण्यांत आल्या. खुद्द **रोमशहरीं** तर वस्तुस्थिति इतकी खेदजनक होती कीं, तशी इतर कोणत्याही ठिकाणीं नसेल. **रोम** हें धर्माधिकाऱ्यांचें मुख्य ठिकाण. जो कोणी धर्मविरुद्ध आचरण करी त्यास या पवित्र व पूज्य मानलेल्या स्थळीं वास्तव्य करणाऱ्या **पोपमहाराजांकडून** शासनाचे हुकुम सुटत असत. **उत्तर इटालींतून** येत असतां **लूथरच्या** दृष्टीस जरी धर्मसंबंधी भलतासलता प्रकार पडला

होता, तरी **रोम**शहर पाहण्याची त्याची उत्सुकता यत्किंचित् सुद्धां कमी झाली नव्हती. तें पवित्र स्थळ दृष्टीस पडतांच तो गुडघे टेकून बसला आणि ह्मणाला–' हे पवित्र **रोमा,** मी तुला मनोभावें वंदन करितों. ' परंतु पोपाच्या या पवित्र राजधानींत सुमारें पंधरा दिवस त्यानें घालविले न घालविले तोंच तिच्या पवित्रतेबद्दल त्याचें मत अगदींच बदललें. कोणाएकास तर त्यानें तेथें असें ह्मणतांना ऐकिलें कीं, ' धर्माची स्थिति इतःपर अशीच राहणें असंभवनीय आहे; एक तर धर्माचा मनस्वी ऱ्हास झाला पाहिजे, किंवा त्यांत मोठा बदल तरी घडून, आला पाहिजे. ' धर्मोपदेशक ज्या धर्माचा उपदेश करितात त्या धर्मावर त्यांचा बिलकूल विश्वास नाहीं व बिचाऱ्या लोकांस ते कशा तरी भुलथापी देऊन फसवितात, हें त्याच्या आतां चांगलेंच नजरेस आलें. हा सर्व प्रकार पूर्ण लक्षांत आल्यावर त्यानें असे उद्गार काढिले कीं, " जर कोणी **रोम** शहर जाऊन पाहील तर त्याची निःसंशय खात्री होईल कीं, **रोम** येथील धर्माची स्थिति, कल्पना करितां येत नाहीं किंवा शब्दांनीं वर्णितां येत नाहीं, इतकी वाईट झाली आहे. "

## भाग ७ वा.

सज्जना एव साधूनां प्रथयन्ति गुणोत्करम् । *
पुष्पाणां सौरभं प्रायस्तन्वते दिक्षु मारुताः ॥

### लूथरास डी. डी ( डॉक्टर ऑफ् † डिविनिटि ) ची पदवी मिळते–त्याचे पंचाण्णव सिद्धांत.

स्टापिट्स हा गृहस्थ फार धूर्त होता ह्मणून मागें सांगितलेंच आहे. धर्मासंबंधानें काळ आतां पहिल्याप्रमाणें अगदीं सरळ राहिला नाहीं व या बाबतींत बदल होण्याचा बराच संभव आहे हें त्याच्या अगोदरच लक्षांत येऊन चुकलें होतें. एकदां ही हालचाल जारीनें सुरू झाली ह्मणजे बेंच काम करावें लागेल व हें अवघड काम करण्यास बऱ्याच तरुण व बुद्धिमान लोकांचें साहाय्य लागेल आणि लूथरसारख्या तरतरीत व बहुश्रुत माणसाचा अशा कामीं तर चांगलाच उपयोग होईल असें त्यास वाटलें. लूथरनें उपगुरूचें व धर्मोपदेशकाचें काम इतक्या चातुर्यानें व शिताफीनें केलें कीं, त्याची सर्वत्र वाहवा झाली. स्टापिट्सनें

---

* साधुलोकांचा गुणसमुदाय सज्जनलोकच प्रसिद्ध करितात; जसें–फुलांचा सुवास बहुतकरून वारा चोहींकडे पसरून देतो.

† ईश्वरविषयक शास्त्राचा महामहोपाध्याय.

त्याला डी. डी. ची पदवी देण्याची खटपट सुरू केली. पण नुसते नांवाचे पदवीधर होऊन बसण्यांत विशेष महत्व नाहीं अशी त्याची समजुत असल्यामुळें ती पदवी स्वीकारण्यास तो कांकू करूं लागला. पुढें **स्टापिट्सनें** आग्रह धरून तें काम तडीस नेलें. या गृहस्थाचें **लूथर**बद्दल जें कांहीं मत बनलें होतें, त्यास पुढें लिहिलेल्या गोष्टींमुळें जास्तीच बळकटी आली. कांहीं कामानिमित्त **स्टापिट्स** याला परदेशीं जावें लागलें. तो गेल्यावर मुख्य धर्मोपदेशकाचें काम सुद्धां **लूथर**कडे आलें. हेंही काम त्यानें आपल्या नेहमींच्या उल्हासवृत्तीनेंच केलें. हे नवीन काम पाहत असतां त्याला निरनिराळे मठ जाऊन पहावे लागत, मठवासी लोकांस सद्वर्तनाचा उपदेश करावा लागे, धर्मपुस्तक वाचण्याकडे त्यांचें लक्ष लागेल अशा रीतीनें त्यांच्याशीं संभाषण करावें लागे, व अशींच इतर पुष्कळ कामें करावीं लागत. त्यामुळें धर्मोपदेशकांच्या आयुष्यक्रमांतल्या निरनिराळ्या बाजू त्याच्या पूर्ण नजरेस येऊन त्यांत वाकबगार होण्याची संधि त्यास चांगलीच मिळाली. **लूथर**च्या आयुष्यांत व ख्रिस्तीधर्माच्या इतिहासांत इ. स. १५१७ हें वर्ष फार ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. कारण, धर्मसंबंधीं अनाचार व भ्रष्टता यांचा जो सारखा प्रवाह सुरू होता, त्यास जो पूर आला होता, व धर्माच्या नांवानें लोकांस हव्या तशा थापा देऊन भुरळ घालण्याचे जे सारखे प्रयत्न सुरू होते, त्यांस या वर्षी **लूथरनें** प्रथम प्रतिबंध केला. धर्माध्यक्ष—लिओ—यास यावेळीं पै-

शासंबंधानें अति टंचाई पडूं लागली होती. कारण, त्याच्या तिजोरींतला बहुतेक पैसा वर निर्दिष्ट केलेलें **सेंट पीटरचें** देऊळ बांधण्याकडे खर्ची पडला होता. ह्मणून **पोपमहाराजांस** पूर्वी अनेकदा प्रचारांत आणलेल्या युक्तीचा अवलंब या वेळींही करावा लागला. ही अजब युक्ति अमलांत आणि-त्याबरोबर **पोपाचे** रिकामे खजिने ताबडतोब भरून येत. तेव्हां या युक्तीबद्दल येथें खुलासा करणें भाग आहे.

जेव्हां जेव्हां पोपमहाराजांचे खजिने रिकामे पडत, तेव्हां तेव्हां ते भरून काढण्यासाठीं ते विक्रीकरितां कांहीं चिट्ट्या काढीत; या चिठ्यांस 'मुक्तिलेख' ( Indulgences ) असें नांव असे. प्राचीनकाळीं **क्याथोलिक** धर्मांतली अशी एक वहिवाट होती कीं, जो कोणी धर्माविरुद्ध वर्तन करी, त्यास धर्माध्यक्ष शिक्षा करीत; पण त्यास अनुताप होऊन तो सुधारतो आहे असें दिसल्यास त्यास क्षमेचें पत्र मिळे. अशा क्षमापत्रास **मुक्तिलेख** ( Indulgences ) असें नांव असे. पण पुढें पोपांनीं त्यास भलतेंच स्वरूप आणलें. या बदललेल्या नवीन मुक्तिलेखांत पोपांचीं कांहीं वचनें नमूद केलेलीं असत, तीं अशीं; 'हा लेख विकत घेणारा सर्व पातकांपासून मुक्त होईल; यास त्यानें केलेल्या पातकांबद्दल क्षमा मिळेल; आत्म्याच्या शुद्धीकरितां पापविमोचनार्थ नरकवासांत यातना भोगाव्या न लागतां त्यास मुक्ति मिळेल.' 'इ. इ' हे लेख विकणाराची माल खपण्याबद्दल इच्छा जितकी अधिक, तितकीं हीं वचनें जास्त. ह्या तऱ्हेचे

हे **मुक्तिलेख** काढून पोपमहाराजांनीं वेळोवेळीं प्रसंग पडेल त्याप्रमाणें आपली तुंबडी पूर्ण भरून घ्यावी.

**साक्सनी** प्रांतांत १५१७ या वर्षी **मुक्तिलेख** खरेदी करण्याबद्दल उपदेश होऊं लागला. **मुक्तिलेखांबद्दल** लोकांची समजूत घालण्याकरितां ज्या कित्येकांची नेमणूक देशोदेशीं झाली होती, त्यांत '**टट्झेल**' या नांवाचा एक धर्मोपदेशक होता. त्यानें **साक्सनी** प्रांतांत हे लेख खपविण्याचें काम इतक्या झपाट्यानें, इतक्या नीचतेनें व इतक्या लज्जास्पद रीतीनें चालविलें * कीं, त्याचें वर्णन सुद्धां करवत नाहीं. 'आमच्या पवित्र पेटींत **मुक्तिलेखांचा** पैसा येऊन त्याचा खुळखुळाट होऊं लागतांच आत्मा स्वर्गाची वाट धरितो व तो पैसा पेटींत पडतांच आत्मा स्वर्गांत अधिष्ठित होतो.' अशा प्रकारच्या थापा लोकांस देऊन या निर्लज्ज धर्मोपदेशकानें आपलें काम मोठ्या जारीनें चालू ठेविलें. त्याच्या या कृतीची बातमी **लूथरच्या** कानावर आली होती; तेव्हां त्याचा क्रोधाग्नि एकदम भडकून तो ह्मणाला, "थोडक्याच दिवसांत त्याचें दुष्कृत्य बाहेर आणून याची फजीती केल्यावांचून मी राहावयाचा नाहीं व ईश्वरसुद्धां मला या कामांत खात्रीनें मदत करील."

---

* Tetzel was a Dominican friar, of licentious morals, but...remarkable for his noisy and popular eloquence.

*Dyer.*

याप्रमाणें टेट्झेलचा मुक्तिलेख खपविण्याचा क्रम झपाट्यानें सुरू असतां लूथरही तितक्याच झपाट्यानें व मोठ्या आवेशानें लोकांची समजूत घालूं लागला कीं–" हे मुक्तिलेख केवळ भूल पाडून लोकांपासून पैसे उपटण्याची युक्ति आहे. लेख खरेदी करणें धर्माविरुद्ध आहे. " आपल्या प्रतिपादनाचा ठसा लोकांच्या मनावर चांगला बठावा व आपल्या प्रयत्नास जास्ती यश यावें ह्मणून लूथरनें १५१७ च्या आक्टोबर महिन्याच्या ३१ साव्या तारखेस आपल्या मताच्या प्रसारार्थ पंचाण्णव सिद्धांत लिहून त्यांच्या प्रती विटेनबर्ग शहराच्या प्रसिद्ध ठिकाणीं डकविल्या. पुढें धर्मांत जी सुधारणा होऊन लूथरच्या मनीं-मानसीं नसतां धर्मक्रांति झाली, तीस आरंभ या सिद्धांतांपासूनच झाला असें ह्मणावयास हरकत नाहीं.+

त्यानें असें प्रसिद्ध केलें कीं ज्याची इच्छा या सिद्धांतांपैकीं कोणत्याही सिद्धांताचें खंडन करावयाची असेल त्यानें मजकडे यावें, मी रास्त वादविवाद करून माझ्या सिद्धांताचें मंडन करण्यास तयार आहें. या मुक्तिलेखांच्या निंद्य व्यापारानें व ज्या लज्जास्पद रीतीनें टेट्झेलनें तो चालविला होता त्या रीतीनें धर्माची

---

+ On the 31 st of October 1517 he posted on the door of the Castle Church of Wittenburg, those memorable thesis, which, though even Luther himself had then no conception of it, were in fact the commencement of the *Reformation*. Page 386-87.

*Dyer's Modern Europe V* 1s..

थट्टा होऊन त्यास ग्लानि येण्याचा कसा संभव आहे, हें त्यानें कांहीं धर्मोपदेशकांस पत्रें लिहून स्पष्ट कळविलें. एकानें त्याच्या पत्रास जबाब दिला. त्याचा मतलब इतकाच कीं ' आपण पोपाच्या विरुद्ध वर्तन ठेवितां हें अगदीं बरें नव्हे; आपण हें सर्व सोडून देऊन स्वस्थ बसावें. ' **स्टापिट्स** हा गृहस्थ जरी फार समजूतदार व शहाणा होता, तरी त्याच्या अंगीं धैर्य कमी होतें; त्यानें सुद्धां **लूथरची** कानउघाडणी केली कीं, आपण चालविलेली खटपट बरी नव्हे; ती आपणास लवकरच सोडून द्यावी लागेल. यावर त्या निर्धास्त पुरुषानें उत्तर दिलें कीं ' माझी खटपट रास्त आहे असें माझ्या प्रतिपक्ष्यांस कबूल करावें लागलें तर मग ' ? या सिद्धांतांतील कांहीं मुद्दे फार जोरदाररीतीनें लिहिलेले आहेत. त्यांचा थोडासा मासला खालीं लिहिल्याप्रमाणें आहे.

' धर्मपुस्तकानें सद्गुणी व योग्य माणसास मुक्ति मिळते; पण ह्या मुक्तिलेखांनीं तर मनुष्यांच्या सद्गुणाचा व योग्यायोग्यतेचा सुद्धां विचार न होतां केवळ श्रीमंतीच्या जोरावर ते मुक्त होतात. '

'पोपांच्या अंगीं मुक्ति देण्याचें जर खरोखर सामर्थ्य आहे, तर मग स्वतःच्या पुण्यप्रभावानेंच हजारों माणसांस नरकवासांतून काढून ते स्वर्गास कां पाठवीत नाहींत ? '

पोपाच्या पेटींत पैशाचा खुळखुळाट झाल्याबरोबर नरकवास भोगीत पडलेला आत्मा वर येऊन स्वर्गगामी होतो असें जे प्रतिपादितात, ते अज्ञान लोकांना फसविण्याच्या कामांतलें आपलें नैपुण्य दाखवितात. '

'मुक्ति मिळविण्याकरितां पापाबद्दल पश्चात्तापाची मुळींच जरूरी नसून फक्त **मुक्तिलेख** खरेदी केल्यानें इष्ट हेतु सिद्धीस जातो, असें सांगणारे **परमेश्वराचे** भक्त नाहींत–ते त्याचे वैरी होत.'

अशा तऱ्हेनें खडखडीत वादविवाद चालवून हा स्पष्टवक्ता सत्याच्या बाजूचें समर्थन करण्यासाठीं समरांगणांत उभा राहिला; व "युद्ध करण्यास मी तयार आहें व ज्या कोणास दोन हात करावयाचे असतील त्यानें पुढें यावें" म्हणून तो निर्धास्तपणें लोकांस सांगू लागला. अशी ही तुतारी त्यानें फुंकतांच तिचा ध्वनि कर्णोपकर्णी जाऊन धडकला. अशा प्रसंगासाठीं बऱ्याच लोकांच्या मनाची तयारी कशी झाली होती, हें मागें सांगितलेंच आहे. म्हणून **लूथरासारखा** बाणेदार मोहरा त्यांस वाटाड्या मिळतांच त्यांनीं त्यास मदत करण्याची उत्सुकता मोठया आनंदानें दाखविली, व तेही त्याजबरोबर समरांगणांत झुंजण्यास तयार झाले. **लूथरचे** सिद्धांत ताबडतोब छापले जाऊन त्यांच्या प्रती **जर्मन** देशांत सर्वत्र वांटण्यांत आल्या. चोहोंकडे मोठया कळकळीनें त्यांचा स्वीकार झाला. या मतींचा इतका प्रसार होऊन आपले सिद्धांत इतके लोकप्रिय कसे झाले, याबद्दल **लूथरालाच** स्वतः फार आश्चर्य वाटलें, व तो म्हणाला कीं 'लोकांस हे सिद्धांत इतके आवडतील असें मला वाटलें असतें, तर ते मी जास्तीं काळजीनें तयार केले असते. या सिद्धांतांचें जोरदार व स्पष्ट प्रतिपादन, व त्यांच्या द्वारें **पोपमहाराजांची**, त्यांच्या दूतांची व एकंदर लोकांची कानउघाडणी करून मोठ्या गौरवानें

व पोक्तपणानें त्यांची समजूत घालण्यासाठीं योजलेली भाषाशैली, व लेखकाच्या अंगच्या धर्मसंबंधीं कळकळीचें यथार्थ स्वरूप,– इत्यादि गोष्टींनीं जर्मनींतील लोकांच्या मनावर व विशेषेंकरून सुशिक्षित तरुण लोकांच्या मनावर कांहीं विलक्षण ठसा उमटला. या कामाकडे जास्ती उत्साहबुद्धीनें ते आपलें मन घालूं लागले. त्यांची जिज्ञासा खूपच जागृत झाली. त्यामुळें **विटेन्बर्ग** शहरीं **पोपमहाराजांच्याविरुद्ध** सत्याकरितां समरांगणीं दंड ठोकून न डगमगतां उभा ठाकलेल्या या **वीराचीं** आवेशयुक्त व सुश्राव्य व्याख्यानें ऐकण्यास सुशिक्षित तरुण लोकांच्या झुंडीच्या झुंडी जमूं लागल्या.

इकडे टेट्झेल यानें या सिद्धांतांस प्रत्युत्तरादाखल एक विलक्षण जोराचें छोटेखानी पुस्तक तयार केलें. या पुस्तकांत प्ररूढ मतांच्या विरुद्ध जाणाऱ्या लोकांवर केवळ शिव्यांची वृष्टि केली होती व 'पोपाच्या हातून चुकी होणें शक्यच नाहीं आणि पापाबद्दल क्षमा करण्याचा त्यास पूर्ण अधिकार आहे–' अशा मताचें खूपच जोरदाररीतीनें समर्थन केलें होतें. वृथाजल्पनेनें व त्वेषानें पूर्ण भरलेल्या या पोकळ पुस्तकाचा त्यास योग्य असाच धिःकार झाला. **फ्रांक्फर्ट** येथें टेट्झेलनें **लूथरच्या** सिद्धांतांच्या प्रती भर रस्त्यांत जाळून टाकिल्या. त्यानंतर **विटनबर्ग** येथें एका चव्हाट्याच्या ठिकाणीं कांहीं विद्यार्थी व इतर लोक जमून त्यांनीं एक होळी पेटविली व तींत त्यांनीं टेट्झेलच्या पुस्तकांची आहुति दिली. **इंगलस्टड्** येथील विद्यालयाचे उपाध्यक्ष डॉक्टर '**जॉन एक**' यांनीं **लूथरवर** त्याच्या नवीन मतांबद्दल हल्ला करून

बराच ताशेरा झाडला. त्याजबद्दल **लूथरनें** असें ह्मटलें कीं–' या गृहस्थाच्या ताशेरा झाडण्यानें त्याचा तसा हेतु नसतांही मला मदत झाली व असें करून त्यानें आपल्या पक्षास मात्र कमीपणा आणिला.' अशा प्रकारची धुमाळी सुरू असतां **लूथरचा** धर्मोपदेश करण्याचा क्रम सुरूच होता. तो निर्भीडपणें लोकांस सांगे कीं, "माझी इच्छा, माझी प्रार्थना, माझा उपदेश तुह्मांस असा आहे कीं हे **मुक्तिलेख** तुह्मी खरेदी करूं नका. मूर्ख, अविचारी, अजागळ अशा भोळवटांना ते विकत घेऊं द्या. तुह्मी त्याच्या नादीं लागूं नका. हे लेख विकत घेण्याबद्दल जे तुह्मांस उपदेश करीत असतील, ते खचीत तुह्मांस वेड लाविताहेत. त्यांची खटपट तुमच्या मुक्तीबद्दल नसून तुमच्या पैशानें आपली तुंबडी भरण्याची आहे." असो. अधिकाऱ्यापुढें उभें राहून जाबजबाब देण्याचा प्रसंग आला तरी अधिकाराच्या तेजानें दिपून न जातां, चित्ताची समता कायम ठेवून, **लूथर** सत्यापासून पराङ्मुख कसा होत नसे हें पुढील हकीकतीवरून स्पष्ट दिसून येईल.

## भाग आठवा.

का खलेन सह स्पर्धा सज्जनस्याभिमानिनः ।
भाषणं भीषण साधुदूषणं यस्य भूषणम् * ॥—सुभा०

### कार्डिनल काजेटनासमोर लूथरास हजर व्हावें लागतें—तडजोडीचा प्रयत्न—लूथर व मेलांक्थन.

**विटेनबर्ग** येथें घडलेल्या गोष्टींमुळें लोकांच्या मनाची अतिशय चलबिचल उडाली. हा सर्व प्रकार **रोम** येथें कळला. पोप मंडळांत धास्ती उत्पन्न झाली. **रोम** शहरीं येऊन हजर होण्याबद्दल पोपाकडून **लूथरास** हुकूम सुटला. परंतु **साक्सनीचा** राजा **फ्रेडरिक लूथरास** अनुकूल असल्यामुळें त्यानें या बाबतींत निराळीच व्यवस्था घडवून आणिली. या व्यवस्थेमुळें असें झालें कीं, कोणी **काजेटन** नांवाचा धर्माधिकारी **पोपाचा** प्रतिनिधि ह्मणून **आग्सबर्ग** शहरीं आला. स्वमतसमर्थनार्थ संभाषण करण्याकरितां **लूथरनें रोम** शहरीं न जातां त्याच्यापुढें हजर व्हावें, असे **फ्रेडरिक** राजाच्या मध्यस्तीनें ठरलें. **लूथरासारख्या** यःकश्चित् धर्मोपदेशकास आपल्या विद्वत्तेच्या आविर्भावानें व वाक्पाण्डित्यानें दिपवून टाकून तेव्हांच हां हां ह्मणतां चीत् करूं,

---

* आपल्या मताचा योग्य अभिमान बाळगणाऱ्या चांगल्या मनुष्यानें दुष्टाबरोबर स्पर्धा करून काय उपयोगी? कारण, भयंकर भाषण करून साधूंना दोष देणें हेंच दुष्टाचें भूषण होय.

असें या गर्विष्ट व दुरभिमानी धर्माधिकाऱ्यास वाटलें. परंतु या बाबतींत त्याची सर्वस्वी निराशा झाली. कारण अनुभवान्तीं यास लवकरच कळून आलें कीं, **लूथर** हा साधारण लेचापेचा धर्मोपदेशक नसून, आपल्या स्वतःच्याच पेक्षां काय पण बहुतेक धर्मोपदेशकांपेक्षां देखील जास्ती बहुश्रुत व विचार केलेला माणूस आहे. या संबंधानें **लूथरनें** असें ह्मटलें आहेः " **पोपमहाराजांचा** हा प्रतिनिधि ह्मणून यानें जें जें ह्मणावें तें तें सर्व कबूल करून मी त्यास मान डोलवावी असा त्याचा आग्रह होता. मी त्यास जें जें सांगें, त्या सगळ्यास मी धर्मपुस्तकांतील आधार दाखवीं; तरी माझ्या बोलण्याचा तो धिःकार करून मला हांसे. सारांश, ' तूं आपलें बोलणें परत घे, नाहींतर तुला फार हाल व छल सोसावे लागतील ' अशी धमकी देण्यापर्यंत त्याच्या औदार्याची मजल येऊन पोहोंचली; व सरते शेवटीं त्यानें मला साफ सांगितलें कीं, ' तुझ्याबरोबर वाद करण्याची आतां माझी खुषी नाहीं, तूं येथून चालता हो. ' याप्रमाणें **काजेटननें लूथरास** आपल्या समोरून घालवून दिलें व तो जात असतां त्यास खडखडीत रीतीनें बजावून सांगितलें कीं, ' तूं आपली चुकी कबूल करण्यास तयार होईपर्यंत मला तोंड दाखवूं नकोस. '

वाचकहो, **लूथर** ह्मणजे यःकश्चित् धर्मोपदेशक; **काजेटन** हा मोठ्या अधिकाराचा धर्माध्यक्ष, खुद्द **पोपमहाराजांकडून** प्रतिनिधि ह्मणून आलेला. तेव्हां बिचारा **लूथर** कोठें व **काजेटन** कोठें ! उभयतांच्या स्थितींत केवढें महदंतर ! अशी स्थिति असतां **लूथरनें** त्याच्या समोर उभें राहून कशासही न भितां

आपलें मत खुशाल समर्थन करावें, ही गोष्ट लहानसहान आहे काय ? **पोप** महाराजांचा दरारा असा होता कीं एकाद्यावर मर्जी खप्पा झाली कीं त्यास शिक्षा करण्याचा–नव्हे त्यास छिन्नाभिन्न करून टाकण्याचा सुद्धां–हुकुम ते फर्मावित असत.

सर्व स्थिति मनांत आणितां **लूथरची** त्या वेळीं पक्की खातरी झाली कीं, **आग्झबर्ग** येथें राहणें फारच धोक्याचें काम आहे, व कोणते वेळेस येथें कसा प्रसंग गुदरेल याचाही नेम नाहीं. अशाच तऱ्हेचे प्रयत्न मागें **बोहिमियांतील** एका '**हस**' नांवाच्या सुधारणाप्रिय गृहस्थानें चालविले होते. तो नास्तिक ह्मणून लोकांनीं त्याला अति छळून जिवंत जाळून टाकिलें होतें. त्याच्या भयंकर परिणामाची **लूथर** यास आठवण होऊन त्याचें चित्रही याच्या डोळ्यांसमोर उभें राहिलें. ह्मणून तो त्या गांवाहून गुप्तपणें निघून **विटेनबर्ग** येथें पळून गेला. त्याचा जिवलग मित्र **स्टापिस्टझ** यानें त्यास घोडा आणून दिला. त्यानें व **आग्झबर्ग** येथील **माजिस्ट्रेटानें** या वेळीं **लूथरास** चांगलीच मदत केली. उजाडण्याचे पूर्वींच त्यास बरेंच लांब निघून जातां येईल अशी त्यांनीं तजवीज केली. मात्र निघण्याचे पूर्वीं **पोपास लूथरनें** एक पत्र लिहिलें. त्यांत **आग्झबर्ग** येथें घडलेली साग्र हकीकत त्यानें लिहिली होती. **लूथर** हा **आग्झबर्ग** येथें गेला; व त्या गांवीं सुरक्षित पोहोंचला. हें ऐकून **काजेटनास** फार राग आला. त्यानें ताबडतोब **साक्सनीच्या** राजास हुकूम सोडिला कीं, **लूथरास** एकतर कैद करून **रोमशहरीं** पाठवावें किंवा राज्यांतून हद्दपार करावें. **लूथरच्या** संबंधानें काय व्यवस्था करावी याबद्दल

राजास सुद्धां मोठी चिंता पडली. लूथरनें तर साक्सनी प्रांत सोडून कोठें तरी प्रयाण करावें ह्मणून तयारी चालविली होती. त्यानें आपल्या मित्रमंडळीच्या भेटी घेऊन त्यांस एकत्र जमवून एक शेवटचें व्याख्यानाही दिलें. प्रथम त्याचा विचार फ्रान्स देशांत जावें असा होता. कारण त्यास असें वाटलें कीं, तेथल्या विद्यालयांतून पोपास अडविण्याचे बरेच प्रयत्न झाले होते; ह्मणून आपणासही तेथें चांगला आश्रय मिळेल. फ्रेडरिकराजा लूथरची किंमत जाणून होता. त्याचा चित्ताकर्षक धर्मोपदेश, त्याचीं सुश्राव्य व्याख्यानें, त्याचें अलौकिक धैर्य व असेच त्याचे इतर गुण जाणून त्या राजाच्या मनांत त्याच्याबद्दल बरीच पूज्यबुद्धि उत्पन्न झाली होती. विटेनबर्गच्या विद्यालयाचें तो केवळ भूषण आहे असें तो राजा समजत असे. ह्मणून त्यानें त्या हुकुमावर असें उत्तर लिहिलें; "एकाद्या निःपक्षपाती न्यायाधिशासमोर धर्मसंबंधीं वादविवाद होऊन माझ्या मतांचा निकाल लावावा अशी लूथरची विनंती आहे, व ती न्याय्य आणि रास्त आहे असें मला वाटतें, ह्मणून तसा प्रसंग घडवून आणिला असतां फार बरें होईल." असें उत्तर लिहिल्यावर ज्या दिवशीं संध्याकाळीं लूथर प्रयाण करणार होता, त्याच दिवशीं राजानें त्यास सांगून पाठविलें कीं–'आपणास हा देश सोडून जाण्याचें कांहीं कारण नाहीं; आपण येथेंच राहावें.'

ह्या वेळेच्या सुमारास एक गोष्ट घडून आली. तिच्या योगानें लूथरच्या कामास बरीच मदत होऊन त्यास चांगलें तेज आलें.

स. १५१९ च्या जानेवारी महिन्यांत जर्मनीचा बादशाह-**माक्स्मिलन**-मरण पावला; व नवीन बादशाह सिंहासनारूढ होईपर्यंत **साक्सनी**चा राजा **फ्रेडरिक** ज्यास The wise ह्मणजे **शहाणा** अशी संज्ञा असे, तो कारभारी नेमिला गेला. शहाण्या **फ्रेडरिकचें** व **लूथरचें** कसें सूत होतें व एक दुसऱ्यास मदत करण्यास कसा तयार असे, हें नुक्तेंच सांगितलें आहे. **फ्रेडरिक** राजास अनुकूल करून घेऊन त्यास प्रसन्न ठेवावें ह्मणून **पोप** महाराजांनीं खटपट चालविली. त्यांनीं त्यास सन्मानदर्शक चिन्ह ह्मणून एक सोन्याचें गुलाबी फूल नजर पाठविलें. ज्यावर **पोपाची** मर्जी खुष असे त्याजवर त्यांची अशी कृपा होत असे, इतरांवर होत नसे. **फ्रेडरिक** राजा **लूथराचा** पुरस्कर्ता असल्यामुळें **लूथरनें पोपाच्या** विरुद्ध इतकी धुमाळी माजविली असतांही त्याचें पारिपत्य करण्यास **पोपाची** एकदम छाती होईना. यावेळेस **पोपाच्या** मनांत असाही एक धूर्तपणाचा विचार आला कीं, हें धर्मसंबंधीं भांडण जास्ती न लांबवितां आपसांत कांहीं तडजोड करून समेट करून टाकावा. ह्मणून **लिओनें मिल्टिट्झ** नांवाचा हुशार चिटणीस हें भांडण मिटविण्यासाठीं **फ्रेडरिका**कडे पाठविला. हा **जर्मनी** देशांत आला तेव्हां त्यास असें आढळून आलें कीं **जर्मनीं**तील तीन चतुर्थांश लोक **लूथर**च्या पक्षाचे आहेत. **साक्सनीच्या** दरबारांत त्याचें आदरातिथ्यही बेताबाचेंच झाल्यामुळें आपल्या कामांत आपणास कितपत यश येईल याचीही त्यास बरीच कल्पना झाली.

त्याची व **लूथरची** मुलाखत झाली. उभयतांमध्यें बरेंच संभाषण झाल्यावर **मिल्टिट्झनें** कबूल केलें कीं, मुक्तिलेखांचा व्यापार खरोखर पोपाच्या दर्जास व एकंदर धर्मास लाज आणणारा आहे. तो बंद करण्याची सर्व व्यवस्था आह्मी करूं व तुह्मीही धर्माध्यक्षांच्या विरुद्ध बोलण्याची खटपट सोडून द्यावी. **लूथरनें** तसें करण्याबद्दल वचन दिलें. उभयतांमध्यें चांगली समजूत होऊन समेट झाल्याबद्दल **लूथरनें पोपास** एक पत्रही लिहावें, असें ठरलें. त्याप्रमाणें **लूथरनें** केलें. धर्माध्यक्षाच्या अधिकारास विनाकारण कमीपणा आणावा व त्यांचा मुद्दाम अवमान करावा अशी माझी बिलकूल इच्छा नाहीं व माझ्या खटपटीचा हेतु शुद्ध असतांही दुष्ट लोकांनीं तो भलताच आहे असें आपणास भासविण्याचा प्रयत्न केला, ह्मणून मलाही खरोखर वाईट वाटतें ' वगैरे मजकूर त्या पत्रांत होता. परंतु या कामाची अशी निमूटपणें लागलेली व्यवस्था पाहून कांहीं लोकांच्या पायांची आग मस्तकांत गेली. **विटेनबर्गच्या पाखंडी** लोकांची चारचौघांत पूर्णपणें फजीती करून त्यांच्यावर आपली सरशी झाली तरच पुरुषार्थ, अशी त्यांची समजूत होती. त्यांपैकीं कोणी डॉक्टर ' एक ' नांवाचा गृहस्थ होता. त्यानें खटपट करून **लिप्झिक** येथें वादविवाद करण्यासाठीं तेथील ईश्वरविषयक शास्त्राचा उपगुरु **कार्लस्टड** व **लूथर** यांस बोलाविलें. त्याप्रमाणें **लूथर** तेथें गेला. पण या सभेंत झालेल्या वादविवादानें उभयपक्षांचीं समजूत होणें तर एकीकडेसच राहिलें; उलट एकमेकांचीं मनें परस्परांविरुद्ध जास्तीच कलुषित झालीं. **लूथरनें** तर या सभेंत सर्वांच्या समक्ष साफ

सांगितलें कीं ' धर्माचे अध्यक्ष जे पोपमहाराज यांचा अधिकार त्यांस थेट परमेश्वरापासून मिळाला नाहीं; त्यांस तो लोकांनीं दिला आहे; तसेंच लोकांस मुक्ति देण्याचें सामर्थ्य पोपाच्या अंगीं खास नाहीं व हें काम करण्यास परमेश्वरावांचून कोणी समर्थ नाहीं. ' त्यावेळेसच डॉक्टर ' एक ' ह्यानें त्यास टोमणा मारिला कीं ' हीं आपलीं मतें एका शतकापूर्वी जो हस नांवाचा प्रसिद्ध नास्तिक होऊन गेला, त्याच्या मतांसारखीं आहेत. हस ह्याला त्याच्या मताबद्दल जिवंतपणीं जाळून टाकिलें होतें ह्मणून मागें सांगितलेंच आहे. त्यावर लूथरनें स्पष्ट सांगितलें कीं हसचीं कांहीं मतें खरोखरच धर्मास अनुसरून होतीं. हें उत्तर देतांना लूथर अगदीं सुद्धां कचरला नाहीं. हा वाद ऐकण्याकरितां पुष्कळ लोक जमले होते. त्यांत फ्रेडरिक राजाही होता. तो पूर्वपक्ष व उत्तरपक्ष लक्षपूर्वक ऐकत होता.

या सभेंत सर्वांच्या समक्ष कोणासही न भितां व कोणाचीही पर्वा न बाळगतां लूथरनें आपल्या मताचें स्पष्ट रीतीनें प्रतिपादन केलें. त्यामुळें त्याची प्रसिद्धि अधिकच झाली. विटेनबर्ग शहरांत त्यास पूर्वीपेक्षांही जास्ती मान मिळूं लागला. धर्मगुरूच्या विरुद्ध उघडपणें व मोठ्या धिटाईनें आपल्या मतांचें त्यानें समर्थन केलें. आपला पक्ष जरी खरा आहे तरी तो तसा आहे असें लोकांस स्पष्ट समजावून देण्यासाठीं व त्यास बळकटी आणण्यासाठीं आपण नेहमीं तयार असलें पाहिजे असें त्यास वाटूं लागलें, ह्मणून तो धर्मसंबंधीं कामांत अधिकच लक्ष घालूं लागला व विचार करूं लागला. त्याचप्रमाणें धर्मगुरूंचे हक्क व

त्यांचे अधिकार कोठपर्यंत पोहोंचतात, कोठपर्यंत नाहींत, व त्यांची मर्यादा कोठपर्यंत आहे, याचाही खल करणें त्यास भाग पडलें. सुदैवेंकरून या कामांत त्याला एका मोठ्या विद्वानाकडून मदत मिळूं लागली. हा विद्वान गृहस्थ **हिब्रू** व **ग्रीक** भाषांत फार प्रवीण असून अनेक निरनिराळ्या शास्त्रांतही पारंगत होता. या महापण्डिताच्या बहुश्रुततेची, त्याच्या विद्वत्तेची व त्याच्या ज्ञानाची सर्वत्र प्रसिद्धि असल्यामुळें **विटेनबर्ग**च्या विद्यालयांत त्यास **ग्रीक** व **हिब्रू** भाषांच्या उपगुरूची जागा मिळाली होती. या गृहस्थाचें नांव ' **फिलिप मेलांक्थन** ' असें होतें. त्याच्यावर सर्व जर्मनी देशांतील विद्वान् व सुशिक्षित लोकांची भिस्त होती. जर्मनींतील धर्मव्यवस्था व शिक्षण-पद्धति यांस जर कांहीं वाखाणण्यासारखें स्वरूप आलें असेल, तर त्याचें बहुतेक श्रेय **मेलांक्थन**कडे आहे, असें ह्मणण्यास कांहीं चिंता नाहीं. या गृहस्थास जर्मनींतील मुख्य **आचार्य** ह्मटलें तरी शोभण्यासारखें आहे. या सद्‍गृहस्थाची व लूथरची ओळख झाली. ' समानशीले व्यसनेषु सख्यम् ' या उक्तीप्रमाणें थोडक्याच काळांत त्यांची चांगलीच मैत्री जुळली, आणि दिवसेंदिवस सुजनांमध्यें प्रकार होतो त्याप्रमाणें त्यांचें परस्परां-बद्दलचें प्रेम वृद्धिंगत होत गेलें, आणि तें अखेरपर्यंत तसेंच कायम राहिलें. एकाच्या आंगचे गुण दुसऱ्यास अवगत असल्यामुळें त्या उभयतांमध्यें परस्परांविषयीं पूज्यभाव उत्पन्न झाला. एकाच कार्यांत हे उभयतां एकत्र होऊन नेटानें व चातुर्यानें काम करण्यास

अगदीं योग्य होते. कारण, एकाच्या अंगीं अद्वितीय धैर्य तर दुसऱ्याच्या अंगीं अप्रतिम मुत्सद्दीपणा, अशी त्या त्या गुणांनीं युक्त ही जोडी होती. **लूथर** स्वभावतःच मोठा धिराचा माणूस असून इतका पक्का असे कीं लोकांस हार जाणें म्हणजे जिवा-वरची गोष्ट आहे असें त्यास वाटे. त्याचे स्वभावाचें दुसरें असें एक लक्षण कधींकधीं पाहण्यांत येई कीं, नसेल तेथें वाद उत्पन्न करून आपली सरशी करून घ्यावी, ही हातोटी तर त्यास चांगलीच साधली होती. प्रतिपक्षीयांची बाजू ढासळून टाकण्याचे कामांत तर त्याचा हात खंडाच असे. इकडे **मेलांक्थन** हा गृहस्थ फार सौम्य व सभ्य असून युक्ति-प्रयुक्तीनें लोकांचीं मनें वळविण्याच्या कामांत फार चतुर असे. वाद मिटविण्याच्या कामांत तर त्याचा बाणा असे, मग तें करतांना स्वतःवर येऊन बेतली तरी त्याबद्दल त्यास फारसी खंती वाटत नसे. तसेंच कोणतीही गोष्ट विकोपास जाऊं न देतां तिजपासून कांहींतरी चांगली गोष्ट निष्पन्न करून घेण्याकडे त्याचें विशेष लक्ष असे. **लूथरनें** एके ठिकाणीं असें लिहिलें आहेः 'धिटाईनें समरांगणांत उभें राहून व दुष्ट लोकांशीं दोन हात करून त्यांस हतवीर्य करून हाकून द्यावें, हें माझें काम आहे; म्हणूनच माझे लेख दांडगे व जोराचे असतात. तसेंच कांटेरी झाडेंझुडपें तोडून तीं मुळांसकट उपटून टाकून खाचाखिचा बुजवून काढणें व अशा रीतीनें जमीन साफसूफ करणें हें काम माझें आहे. **फिलिप मेलांक्थनसारख्याचें** काम याच्यापुढचें आहे. ईश्वरानें मोठ्या कृपेनें त्यास उच्च

न्हेचे गुण दिले आहेत व म्हणून तो आपलें काम फार शांत व सौम्य रीतीनें करीत आहे. कोणत्या झाडास कोणतें खत पाहिजे, कोणतें खत दिलें असतां इच्छेनुरूप कार्य घडेल व कोणत्या खतानें बिघाड होईल, या सर्व गोष्टींचा सूक्ष्म रीतीनें विचार करून त्या त्या झाडास लागणारें तें तें खत देऊन व उत्तम झाडाचें बीजारोपण करून सुंदर बगीचा निर्माण करण्याचें काम त्याचें आहे.

असो. **लूथर** व **पोप** यांच्यामधील भांडण अगदींच विकोपास जाऊन **लूथरास** बहिष्कार घालण्याचा **पोपाकडून** आलेला हुकुम त्यानें कसा जाळून फस्त केला वगैरे मनोरंजक हकीकत पुढील भागांत येईल.

## भाग ९ वा.

I take your bill as an empparchmented Lie and burn it; you will do what you see good next: this is what I do.*—*Carlyle.*

### लूथरास बहिष्कार घालण्याबद्दल पोपाचा लेखी हुकूम— तो हुकूम लूथर जाळून फस्त करितो.

जर्मनींतील धर्मक्रांतीच्या नाटकाचा दुसरा अंक लवकरच रंगभूमीवर आला. त्यासही डॉक्टर ' एक ' चेच प्रयत्न कारणीभूत झाले. ' धर्मगुरु—**पोपमहाराज**—व त्याच्या हाताखालील धर्माध्यक्षमंडळ चुकीस पात्र नाहीं—' हें लोकांचें मत दृढ बनलें होतें तें रास्त नाहीं, त्यांत तथ्यांश नाहीं, हा समज चुकीचा व भ्रममूलक आहे, अगदींच खोटा आहे—असें **लूथर** व **मेलांक्थन** प्रसिद्धपणें प्रतिपादूं लागले. यानंतर **मेलांक्थन** व **लूथर** या उभयतांचें प्रतिपादन चुकीचें आहे—तें खोडसाळपणाचें आहे—तें धर्मविरुद्ध आहे, अशी लोकांची समजूत घालण्यासाठीं डॉक्टर ' एक ' ह्यानें एक पुस्तक लिहून तें प्रसिद्ध केलें. हें पुस्तक बरोबर घेऊन तो **रोम** शहरीं गेला. **विटेन्बर्ग** येथें धर्मगुरूच्या विरुद्ध जी कांहीं भयंकर खटपट सुरू होती, तिची साद्यंत हकीकत त्यानें **पोपमहाराजांस** निवेदन केली, व असें कळविलें कीं, प्रतिपक्षीयांच्या प्रयत्नांकडे कानाडोळा केल्यास परि-

---

* आपला लेखी हुकूम चर्मपत्रावर नमूद केलेली एक लबाडी आहे असें मी समजतों व मी तो जाळून भस्म करितों. नंतर आपणास काय वाटेल तें आपण करावें. जें मी करितों तें हें होय.

णाम भयंकर होईल. ही इशारत पोपमहाराजांस होतांच त्यांनीं एक लेखी हुकूम तयार केला. या हुकुमांत असें लिहिलें होतें कीं 'लूथरनें प्रतिपादिलेले बहुतेक सिद्धांत नास्तिकपणाचे आहेत, ते जाळून भस्म करावे; तसेंच आठ दिवसांचे आंत तो आपलें ह्मणणें परत घेईल तर बरें; नाहीं तर तो बहिष्कृत आहे असें समजावें.' हें जबरदस्त शस्त्र हातीं पडतांच डाक्टर 'एक' हे जर्मनींत पुन्हा परत आले व ठिकठिकाणीं हा पोपाचा हुकूम त्यांनीं प्रसिद्ध केला. त्याप्रमाणें त्याच्या पुस्तकासंबंधाची शिक्षा फारच थोड्या ठिकाणीं अमलांत आली. कारण, लूथरबद्दल बहुतेक सर्वत्र कळकळ उत्पन्न झाली होती. पोपानें ठरविलेल्या शिक्षेबद्दल लोकांस फारच वाईट वाटून त्यांस पोपाचा रागही आला. लूथरला तर या हुकुमाचें व या शिक्षेचें कांहींच भय वाटलें नाहीं. उलट तो आपले लेख जास्तीच आवेशानें लिहूं लागला. सरते शेवटीं इ. स. १५२०च्या दिसेंबरच्या १० व्या तारखेस त्यानें असें एक कृत्य केलें कीं, त्याच्या योगानें हें भयंकर भांडण मिटण्याचा मुळींच संभव राहिला नाहीं. त्या दिवशीं त्यानें विटेन्बर्ग शहरांत एक मोठी होळी पेटविली; व पुष्कळ लोकांची गर्दी जमली असतांना त्या सर्वांच्या समक्ष पोपाच्या त्या हुकुमाची व आपल्या प्रतिपक्षीयांच्या लेखांची स्वतः आपल्या हातांनीं अग्नींत आहुति दिली. पोपाचा हुकूम होळींत टाकीत असतां लूथर ह्मणाला 'हे दुष्ट लेखा! ज्या अर्थीं तूं ईश्वराच्या भक्तांस दुखविलेंस व त्यांची नालस्ती केलीस, त्या अर्थीं तूं अग्नीच्या भक्ष्यस्थानीं

पडावेंस हेंच योग्य आहे. त्याच्या ह्या कृतीची वार्ता हां हां ह्मणतां सर्वत्र पसरली. पोप व लूथर यांच्यामध्यें समेट होण्याची आतां आशा नाहीं अशी सर्वांची खात्री झाली. सुमारें तीन वर्षांपासून त्यानें आपली तरवार म्यानाबाहेर काढली होती; पण मधून मधून ती पुनः म्यानांत घालण्याचा प्रसंग त्यास येत असे. आतां तर त्यास म्यान लांब झोंकून द्यावें लागलें व केवळ नग्न तरवारीच्याच जोरावर काम चालविणें भाग झालें.

वाटेल त्या भ्रष्टतेला, वाटेल त्या खोडसाळपणाला, वाटेल त्या खोट्या गोष्टींना धर्माचें स्वरूप देऊन पाद्री मंडळीनें लोकांत स्वैर वर्तन केलें, लोकांस लुटलें, नाडिलें, व आपल्या मनमुराद वर्तनाचा अगदीं कळस करून सोडिला. परंतु हें खोटें व हें खरें, हें निवडून काढणारा व मोठ्या छातीनें जगापुढें उभें राहून तें स्पष्ट सांगणारा मोहरा सरते शेवटीं उत्पन्न झालाच.

याच सुमारास लूथरनें दोन ग्रंथ लिहून प्रसिद्ध केले. धर्माधिकाऱ्यांनीं अविवाहित राहण्याची चाल वाईट ह्मणून ती बंद करणें, व धर्माध्यक्षाचे अधिकार मर्यादित करणें, वगैरे गोष्टी त्यांत मुख्य होत्या. असो; लूथर व पोप यांच्यामध्यें अति निकराचा प्रसंग कसा येऊन पोहोंचला, व अशा आणीबाणीच्या प्रसंगीं लूथरच्या जीवावर येऊन बेतली असतां त्यानें आपल्या आंगचें अद्वितीय धैर्य कसें प्रगट केलें, याची हकीकत पुढच्या भागांत दिली आहे.

## भाग १० वा.

### वर्म्स् येथील परिषद्—इ. स. १५२१.

इ. स. १५२१ च्या जानेवारीच्या तिसऱ्या तारखेस लिओनें लूथर बहिष्कृत आहे, ह्मणून जाहीर केलें; इतकेंच नव्हे, तर त्याचा पुतळा करून तो त्याच्या लेखांसह जाळून टाकिला. पोपाच्या या कृत्यानें लूथर भ्याला तर नाहींच, पण त्याला असें वाटूं लागलें कीं, धर्मगुरु–पोप महाराज–यांचा आपला आजपर्यंत जो कांहींएक प्रकारचा संबंध होता, तो नाहींसा होऊन आपण मोकळे झालों व काय वाटेल तें करण्यास आतां आपणास चाऱ्ही वाटा मोकळ्या झाल्या.* तेव्हां ही एक मोठी सोयच झाली.

याच वर्षी लूथरवर जो अति बिकट व भयंकर प्रसंग गुदरला तो आतां सांगावयाचा आहे. हा प्रसंग ह्मटला ह्मणजे सर्व जर्मनी देशांतल्या मोठमोठ्या राजेरजवाड्यांसमोर व अमर्यादित सत्ता धारण करणाऱ्या धर्माध्यक्षांसमोर उभें राहून अंगीकारिलेल्या महत्कार्याचें समर्थन निर्धास्तपणें व शौर्यानें त्यानें केलें, त्यावेळचा होय.

याच वर्षाच्या आरंभीं पांचव्या चार्लस बादशहास एलाचापेल शहरीं मोठ्या समारंभानें राज्याभिषेक झाला. तो तक्तावर

---

* Dyer's His. Eng. Page 396.

आरूढ झाल्यावर ऱ्हाइन नदीपर्यंत प्रवास करीत गेला. त्यावेळेस धर्मसंबंधीं या हालचालीनें सर्व जर्मनी देश दणाणून गेला होता. तिची कांहीं चांगली विल्हेवाट लावावी ह्मणून कित्येक देशाभिमानी जर्मन गृहस्थांनीं बादशहास विनंती केली कीं जर्मनीसाठीं एका राष्ट्रीयधर्माची स्थापना करून आपण त्याचें प्रमुखत्व स्वीकारावें. ह्मणजे या चळवळीचा शेवट मोठा गोड होईल. ही मसलत बादशहानें ऐकिली नाहीं. ही उत्कृष्ट संधि त्यानें दवडली. ज्या लोकांवर त्याला अंमल चालवावयाचा होता; त्यांची स्थितिरीति त्यास बरोबर समजली नव्हती, असें दिसतें. कारण, लूथरच्या मतांचा यावेळेस फार प्रसार झाला होता, व तीं खरीं आहेत अशी बहुतेकांची खात्रीही झाली होती. बादशहानें या आणिबाणीच्या प्रसंगीं पोपमहाराजांचा पक्ष स्वीकारिला, व आपल्या कारकीर्दीच्या आरंभापासून तों ती संपेपर्यंत धर्मसुधारणेचा तो कट्टा शत्रु बनून राहिला. या वर्षी एप्रिलमध्यें वर्म्स् शहरीं त्याच्या कारकीर्दीतलें पहिलें दरबार भरलें.

या दरबारांत लूथरबद्दल प्रश्न निघाल्यावर बादशहानें हुकूम फर्माविला कीं लूथरचे लेख माजिस्ट्रेट लोकांनीं जमवून जाळून टाकावे. पण तेथें जमलेल्या मांडलिक राजांस तें न आवडून त्यांनीं बादशहास विनयपूर्वक सांगितलें कीं, असें करणें रास्त नाहीं; फार तर लूथरास दरबारांत बोलवावें व वादविवाद न करितां 'तूं आपलें ह्मणणें परत घेण्यास तयार आहेस किंवा नाहींस' असें त्यास विचारावें. ही सूचना सर्वांस मान्य होऊन

लूथराला वर्म्स्च्या दरबारीं २१ दिवसांत हजर होण्याबद्दल मार्चच्या ६व्या तारखेस हुकूम सुटला. वर्म्स् येथें येतांना व तेथून आपल्या गांवीं विटेन्बर्ग येथें परत जातांना तुझ्या शरीरास यत्कि-चित् सुद्धां धक्का पोहोंचणार नाहीं, अशा आशयाचें एक अभय-पत्रही त्यास पाठविण्यांत आलें. त्याचप्रमाणें इतर मांडलिक राजांनींही आपआपल्या राज्यांतून लूथर येत असतां किंवा जात असतां कांहीं दगा होणार नाहीं अशी त्याची खात्री करण्याकरितां त्यास पत्रें पाठविलीं व त्याप्रमाणें व्यवस्था केली. थोडया वर्षां-पूर्वी जो लूथर केवळ यःकश्चित् धर्मोपदेशक होता, तो आप-ल्या मतांच्या स्पष्ट प्रतिपादनामुळें प्रसिद्धीस आला व त्याच्या जीवाच्या संरक्षणाबद्दल सर्व यूरोपभर चिंता वाटूं लागली. या वेळेस लूथराचा वर्म्स्चा प्रवास मोठया थाटानें झाला. बादश-हाकडून आलेला जासूद व निरनिराळ्या गांवांतले कांहीं कांहीं प्रमुख लोक त्याच्या बरोबर होते. विटेन्बर्ग शहरांतल्या लोकांनीं तर त्यास एक गाडी नजर केली. बोमरच्या अमीरानें वाटखर्ची-करितां पैसे दिले. ज्या अरफर्ट गांवीं तो प्रथम मठवासी बनला होता, त्या ठिकाणीं त्याचें आदरातिथ्य फारच मोठया थाटाचें झालें. शहरांतील सुमारें चाळीस प्रमुख लोक अश्वारूढ होऊन दहा मैलांवर त्याचें स्वागत करण्याकरितां गेले. या चाळीस लोकांबरोबर शहरांतील इतर लोकही पुष्कळ गेले होते. अशा रीतीनें त्यास योग्य अशा सन्मानानें त्यांनीं त्यास शहरांत आणिलें. त्याचें आदरातिथ्य जरी मोठया सन्मानानें झालें, तरी लूथरच्या सुरक्षितपणाबद्दल बऱ्याच लोकांस

शंका वाटूं लागली. त्याचा घात झाल्यावांचून राहणार नाहीं असें मनांत येऊन त्यांस भय वाटूं लागलें. त्याच्या कांहीं मित्रांनीं तर त्यास अशी मसलत दिली कीं ' तुम्ही **बर्न्स्** शहरीं जाऊं नका, तुमच्यावर खात्रीनें अरिष्ट येईल; एका शतकापूर्वी ' **हस्** ' यासही असेंच सुरक्षितपणाबद्दल अभयपत्र मिळालें असून केवळ त्याचीं मतें निराळीं म्हणून लोकांनीं त्यास पकडून जाळून टाकिलें. तुमचीही तशीच अवस्था होईल, म्हणून तुम्ही हा नाद सोडून द्यावा. ' त्यावेळेस त्यानें मोठ्या आवेशानें उत्तर दिलें कीं ' **हस्** यास जाळून भस्म केलें, पण त्याच्या बरोबर ' **सत्य** ' जळून गेलें नाहीं; मी तर जाणारच; माझा निश्चय कालत्रयीं फिरणार नाहीं. इमारतीच्या कौलारावर जितकीं कौलें असतात, तितकीं दुष्ट माणसें जरी माझा जीव घेण्यास तयार होतील, तरी मी त्यांची परवा बाळगणार नाहीं. " असें खडखडीत उत्तर देऊन तो मार्ग क्रमूं लागला. जातांना **मोहरा** गांवीं तो एका झाडाखालीं थांबला. तेथें त्यास पाहण्याकरितां लोकांची गर्दी जमली. त्या लोकांस त्यानें मोठ्या अस्खलित रीतीनें उपदेश केला कीं–' मित्रहो, सत्य हें धर्मपुस्तकांत आहे; पण दुःखाची गोष्ट ही आहे कीं, अंधपरंपरेनें भलतेच आचारविचार प्ररूढ होऊन त्यांस उगीच महत्व आलें आहे, व सत्य हें एकीकडेसच राहिलें आहे. तर ही अंधपरंपरा कायम ठेवण्याचा जे अविचारानें हेका धरितात, ते खऱ्या धर्माचे कैवारी नसून केवळ दुराचारी होत. ' असो.

अशा रीतीनें मार्ग क्रमीत क्रमीत तो एप्रिलच्या सोळाव्या

तारखेस बर्म्स् शहरीं पोहोंचला. ती दुपारची वेळ होती. शह-रवासी लोक जेवण्याखाण्यांत गुंतलेले होते; देवालयाच्या बुर-जावरील पहारेकऱ्यानें लूथरच्या आगमनाबद्दल दौंडी देतांच या प्रसिद्ध पुरुषास पाहण्यासाठीं प्रत्येकजण मोठ्या आतुरतेनें येऊं लागला. लूथर उघड्या गाडींत बसला होता. त्याच्यापुढें त्याला आणण्यासाठीं पाठविलेला जासूद घोड्यावर बसून चालला होता. सरदार लोक व इतर लोक मिळून बरीच गर्दी जमली होती. अशा मोठ्या थाटानें त्यास त्याच्या बिन्हाडीं नेलें. दुसऱ्या दिवशीं ह्मणजे इ. स. १५२१ च्या एप्रिल महिन्याच्या १७ व्या तारखेस लूथर त्या भव्य राजदरबारांत जाऊन हजर झाला. ही तारीख युरोप खंडाच्या अर्वाचीन इतिहासांत फार महत्वाची गणिली पाहिजे. कारण, पुढें विद्याचारसंपन्नतेचा जो प्रसार झाला, त्याला आरंभ या तारखेपासूनच झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं.* असो. या दैदीप्यमान परिषदेपुढें लूथर येऊन उभा राहिला, तेव्हां तो बराच गोंधळलासा दिसला. परिषदेचें भव्य स्वरूप, तेथें जमलेल्या मंडळीचें ऐश्वर्य, व त्यास जें काम करावयाचें होतें त्याचें काठिण्य मनांत आणिलें, तर क्षणभर त्याची चित्तवृत्ति गुंगली, यांत फारसें आश्चर्य नाहीं. ज्या भव्य इमारतींत हें दरबार भरलें होतें त्या इमारतीच्या दरवाजांत लूथर शिरला, तेव्हां तेथें एक सेनापति उभा होता. तो लूथर-च्या खांद्यावर हात ठेवून हलकेंच ह्मणाला ' मित्रा, मोठमोठ्या समरांगणीं झुंज घेतांना सुद्धां जी अवस्था प्राप्त करून घेण्यास

* Carlyle's Hero-worship, Page 124.

मी व माझ्यासारखे संग्रामशूर धजले नाहींत, ती अवस्था तूं आपणावर आपण होऊन आणून घेतली आहेस. चिंता नाहीं; आपले बाजूस सत्य आहे अशी जर तुझी खात्री असेल, तर **परमेश्वराचें** नांव घेऊन खुशाल जा व धैर्य धर, म्हणजे तो तुला कधीं अंतर देणार नाहीं.' या दरबारांतील व्यवस्था बहुतेक अशी होती. * 'एका भव्य सिंहासनावर बादशहाची स्वारी विराजमान झाली होती. त्यांच्या डाव्या बाजूस त्याचा बंधु–**आर्चडयूक फर्डिनंड**–बसला होता. त्याच्या पुढच्या बाजूस धर्माध्यक्षाचा मुकुट घालून **पोप** महाराजांचे प्रतिनिधि बसले होते. मध्यभागीं एक मोठें मेज मांडलेलें असून त्यावर बरींच पुस्तकें ठेविलीं होतीं या मेजाजवळ **लूथर**ला प्रश्न विचारण्याकरितां **चान्सेलर** उभे होते. उजवेकडे **साक्सनी**चा राजा **फ्रेडरिक** हातांत तरवार घेऊन उभा होता. समोरच्या बाजूस बादशहाकडे तोंड करून **लूथर** उभा होता. त्याच्यासमोर एक मेज होतें. त्यावर त्यानें आपलीं बरींच पुस्तकें ठेविलीं होतीं. इतर राजेरजवाडे, धर्माधिकारी, व धर्मोपदेशक मिळून २०० वर मंडळी होती. शिवाय इमारतीच्या मुख्य दिवाणखान्यांत ५००० प्रेक्षकसमूह जमला होता.

**लूथर** सभेपुढें जाऊन उभा राहिल्यावर 'तूं आपलीं मतें परत घेण्यास तयार आहेस किंवा नाहींस' असा त्यास प्रश्न झाला. तेव्हां उत्तर देण्यापूर्वी विचार करण्यास मला वेळ पाहिजे

* M. Luther–Christian Literature Society, Madras.

म्हणून त्यानें विनंती केली. त्यावरून त्याला एक दिवस विचार करण्यास मुदत मिळाली.

तो दिवस लोटला. दुसऱ्या दिवशीं लूथर सभेपुढें जाऊन उभा राहिला. या वेळेस त्याची चित्तवृत्ति अगदीं शांत होती. दरबारचा भपका पाहूनच जणों काय त्यास आवेश चढला, नकळे. तो न गडबडतां धैर्यानें म्हणाला कीं 'धर्मपुस्तकाच्या आधारानें मला माझी चूक दाखवून माझें म्हणणें खोटें आहे अशी माझी कोणी खातरी करीपर्यंत मी माझें म्हणणें कधींही परत घेणार नाहीं; व विचार करून जें मत ठाम झालें असेल तें मीच काय, पण कोणीही सोडूं नये असें मला वाटतें.' या प्रसंगीं त्याच्या तोंडांतून शेवटीं जे उद्गार निघाले, ते असेः-'माझ्या सदसद्विवेकबुद्धीच्या व पवित्र धर्मशास्त्राच्या विरुद्ध मला वर्तन करितां येत नाहीं. मी त्यांचा गुलाम बनलों आहें, म्हणून माझें म्हणणें परत घेण्याची माझी इच्छा नाहीं. मी येथें आपणा सर्वांसमोर माझ्या वर्तनाबद्दल जाब देण्यास उभा आहें. माझ्यानें अन्यथा वर्तन करवत नाहीं व या माझ्या कामांत ईश्वर मला साहाय्य करो'.

याप्रमाणें जर्मनी देशांतील विद्वन्मंडळासमोर-इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष त्या देशाच्या बादशहाच्या समोर व समस्त अधिकार-संपन्न व ऐश्वर्यसंपन्न धर्माधिकाऱ्यांसमोर निर्धास्त उभें राहून ह्या धैर्यशाली वीरानें सत्याच्या बाजूची तरफदारी केली. या प्रसंगाचें एका ग्रंथकारानें असें वर्णन केलें आहे. 'लूथरच्या मताबद्दलचा विचार घटकाभर एका बाजूस ठेवून याचा कट्टा

शत्रु जरी बर्म्सूच्या दरबारांतील या इतिहासांत नमूद करून ठेवण्यासारख्या त्याच्या अचाट कृत्याचें क्षणभर मनन करील, तर त्याला या व्यःकश्चित् धर्मोपदेशकाबद्दल कौतुक वाटल्यावांचून राहणार नाहीं. लष्करी वेष परिधान केलेला व हातांत जबरदस्त नग्न तरवारी धारण केलेला तो राजसमूह व सरदारवर्ग, ज्याचा दरारा राजेरजवाड्यांसही वाटे अशा पोप महाराजांचें तें प्रतिनिधिमंडळ, प्रेक्षकसमूहानें गच्च भरलेलें तें भव्य दरबार, असा हा मोठ्या वीरास सुद्धां गांगरून टाकणारा देखावा दृष्टीपुढें असतां, मनाची यत्किंचितही चलबिचल न होऊं देतां; व कोणाची भीडभाड न धरितां, आपलीं ठाम मतें सावकाश रीतीनें व सर्वांस ऐकूं जाई अशा अस्खलित वाणीनें प्रतिपादिलेलीं ऐकून कोणाचें अंतःकरण उचंबळल्यावांचून राहील ! '*

बादशहा पोपास अनुकूल आहे ही गोष्ट माहीत असतां, त्याच्या प्रतिनिधींस ' तुमचीं मतें व तुमच्या कृति मला मान्य नाहींत व माझ्या बुद्धीला माझींच मतें खरीं वाटतात, ह्मणून मी तुमचें ऐकत नाहीं ' असें धिटाईनें–व पुढें आपलें काय होईल व आपणावर कसा अनर्थ ओढवेल याविषयीं यत्किंचित्‌हि न भितां–त्यानें ह्मणावें, व युक्तिवादानें सर्वांचीं तोंडें बंद करावीं, ह्मणजे निःसंशय असामान्यच कृत्य होय.

लूथरानें आपल्या मतांत कांहीं बदल करावा ह्मणून त्याचें मन वळविण्याचा कांहीं लोकांनीं मध्यस्ती करून प्रयत्न करून पाहिला, परंतु त्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले. एप्रिल महिन्याच्या २५व्या

---

* *Audin*.—Life of *Luther*.

तारखेस एका धर्माधिकाऱ्यानें लूथरला स्पष्ट सांगितलें कीं, ' तुम्ही खुद्द बादशहाचें व इतर राजांचें ऐकत नाहीं, म्हणून थोड्या दिवसांत बादशहा तुमच्याबद्दल योग्य अशी तजवीज करणार आहे. ' नंतर बादशहानें त्यास २० दिवसांचे आंत घरीं जाण्यास हुकूम दिला. या दरबारांत लूथर इतक्या धिटाईनें वागला असतांही त्याचा छल वगैरे कांहीं एक न होतां त्यास जाण्याची परवानगी मिळाली हें मोठें आश्चर्यच म्हणावयाचें. परंतु तो आणीबाणीचा समय मनांत आणिला असतां या गोष्टीचें फारसें आश्चर्यही वाटावयास नको. कारण, लोकांचीं धर्मसंबंधानें मतें जागृत होऊन नवीन मतांबद्दल ते विचार करूं लागले होते. यामुळें सर्वत्र चलबिचल स्पष्ट दृष्टीस पडत होती. हा सर्व प्रकार पाहून खुद्द बादशहाच्या मनाची सुद्धां त्रेधा उडून गेली होती. लूथरबद्दल अनुकंपा सर्वत्र स्पष्ट दिसूं लागली होती. तो आपल्या मतांचें निरूपण करूं लागला म्हणजे त्याच्याभोंवतीं लोकांची सारखी गर्दी जमून सर्वांच्या मनाची तंद्री त्याच्या निरूपणाकडे एकसारखी लागत असे. त्याची लोकप्रियता पाहून त्यास अडकवून ठेविलें असतां भलताच परिणाम होईल अशी त्याच्या प्रतिपक्षीयांची बहुतेक खात्री झाली होती.

एप्रिलच्या २६ व्या तारखेस जेथें त्याच्या अद्वितीय धैर्याचें जणूं काय मोठें प्रदर्शन झालें, तें शहर सोडून तो आपल्या गांवीं परत येण्याकरितां मार्गस्थ झाला.

## भाग ११ वा.

शुद्धःस एव कुलजश्च स एव धीरः ।
श्लाघ्यो विपत्स्वपि न मुञ्चति यः स्वभावम् ॥*

### लूथरचा वार्टबर्ग किल्ल्यांतील अज्ञातवास.

**सॅक्सनी** प्रांताचा राजा—**फ्रेडरिक**—यास लूथरचीं मतें पसंत होतीं. त्याच्याबद्दल त्यास खरोखरच कळकळ वाटत असे. आतां त्याजवर असा प्रसंग येऊन बेतला हें पाहून तर त्याज-बद्दल त्याच्या मनांत बरीच चिंता उत्पन्न झाली. ज्या मनुष्यास खुद्द बादशहानें बहिष्कृत ठरविलें, त्याचा कैवार घेऊन उघडपणें त्यास मदत करणें ह्मणजे अतिशय धोक्याचें काम. इकडे आ-पल्या जीवाची सुद्धां परवा न करितां हातीं घेतलेल्या महत्कार्यास स्वतःस वाहून घेतलेल्या या महासुधारकाचा त्याग करणें ह्मणजे, त्यास मृत्युमुखीं नाहीं तरी कारागृहीं तरी खास लोटण्या-सारखें होतें. अशा अडचणींत तो पडला. शेवटीं या धूर्त राजा-च्या मनांत असा विचार आला कीं, लूथराला कांहीं काळ-पर्यंत लपवून ठेवावें. आपला पुरस्कर्ता नाहींसा झाला, असें

---

* संकटकाळीं सुद्धां जो आपला स्वभाव सोडीत नाहीं, तोच शुद्ध, तोच कुलवान्, तोच शहाणा व तोच स्तुतीस पात्र होय.

त्याच्या अनुयायांस समजतांच त्यांचा क्रोधाग्नि जास्ती भडकेल व त्यांस जास्ती आवेश चढेल आणि असें झाल्यामुळें त्यांची कदाचित् संख्याही वाढेल; एक तर असा प्रकार होईल. नाहीं तर, एक असें तरी होईल कीं तो दृष्टीआड झाला म्हणजे तो बहिष्कृत आहे, तो कायद्याच्या रक्षणाच्या बाहेर आहे, असें फारसें लोकांच्या लक्षांत न येतां सध्यां जी लोकांच्या मनाची चलबिचल झाली आहे ती बरीच कमी होईल. असें या राजाच्या मनानें घेतलें. असें पुढचें धोरण बांधून लूथरचे शत्रु त्यास पकडण्याची संधि पाहत असतां, त्यास मोठया युक्तीनें त्यानें छपवून ठेविलें व या कामांत आपलें अंग आहे असें तर मुळींच दिसूं दिलें नाहीं. वर्म्स् शहर सोडून लूथर घरीं परत यावयास निघाला. त्याची गाडी रस्त्यानें जंगलांतून चालली असतां सशस्त्र लोकांच्या एका टोळीनें ती थांबविली. या मंडळीनें तोंडावर बुरखे घेतल्यामुळें ते कोण होते हें त्यास ओळखितां आलें नाहीं. त्यांनीं लूथराला गाडीच्या खालीं उतरण्यास सांगितलें. हें पाहतांच त्याचा भाऊ व त्याचा एक स्नेही कांहीं तरी दगा आहे असें समजून भिऊन पळून गेले. लूथर खालीं उतरल्यावर त्यांनीं त्याचा झगा काढून घेऊन त्यास लष्करी पोषाख दिला व एका मोठया घोडयावर बसवून फ्रेडरिक राजाच्या वार्टबर्ग किल्ल्यांत ते त्यास घेऊन गेले. त्यास कोणी ओळखूं नये म्हणून त्यांनीं त्याला कृत्रिम दाढी लावून दिली. या किल्ल्यांत तो 'जंकर' या नांवानें एक वर्षपर्यंत गुप्त राहिला. हा मेला असावा किंवा त्यास जन्मठेपेची शिक्षा झाली असावी असें प्रथम त्याच्या

अनुयायांस वाटून ते फार कष्टी झाले. परंतु त्यानें आपल्या कांहीं निकट स्नेह्यांस पत्रें लिहिल्यामुळें तो जीवंत असून सुरक्षित आहे अशी त्यांची खात्री झाली. त्या पत्रांत केव्हां मुक्काम वाता-वरणप्रांत तर केव्हां पर्वतप्रांत अशा चमत्कारिक मुक्कामाच्या जागा लिहून त्यानें आपलें ठिकाण गुप्त ठेविलें. त्याच्या पत्रांतील मजकूर वाचून त्याच्या अनुयायांची अशी खात्री झाली कीं, तो विपत्तींत नसून त्याच्या स्वीकृत कार्याबद्दल तो हताश न होतां तें मोठया उल्हासानें व उत्साहानें करीत आहे. यावेळच्या त्याच्या स्थितीबद्दल एका गृहस्थाचा असा लेख आहे: "आमचा सन्मा-ननीय मित्र **वार्टबर्गच्या** किल्ल्यांत गुप्तपणें राहत असतां त्यानें आपला काळ आळसांत किंवा झोपेंत घालविला नाहीं. **लाटिन** व **ग्रीक** भाषेंतील धर्मपुस्तकांचें अध्ययन त्यानें नेहमीं सुरू ठेविलें होतें." **लूथरानें** त्यावेळीं आपल्या एका मित्रास लिहिलें कीं "आपल्या मंडळीच्या इच्छेनुरूप धर्मपुस्तकांचा तर्जुमा स्वभाषेंत करण्याचा माझा हेतु आहे. प्रत्येक शहरांतून असा एक एक तरजुमा करणारा असता तर, सर्व लोकांच्या हातांत धर्मपुस्तकें पडून त्यां-तील रहस्य त्यांच्या हृदयांत सदा सर्वकाळ खेळलें असतें." असो.

तो अज्ञातवासांत सुरक्षित होता, तरी पण हा एकांतवास त्याच्या-वर जुलुमानें लादला असल्यामुळें तो मनांत झुरत असे. आपलें अंगीकृत कार्य चांगलें जोरानें पुढें सरसावत नाहीं असें मनांत येऊन त्यास वाईट वाटे. केव्हां तरी आपण आरंभिलेल्या कामाचा जयजयकार होईल याबद्दल जरी तो निःशंक होता, तरी त्याचा सर्वत्र प्रसार पाहून होणारें सुख व समाधान हीं आपल्या

नशिबीं नाहींत असें वाटून तो वारंवार खिन्न होई. त्यावेळीं त्याची प्रकृतिही स्वस्थ नव्हती. ह्मणून अध्ययन किंवा इतर कांहीं काम करीत असतां त्याच्या मनांत कांहीं तरी वेडयावांकडया कल्पना शिरत. आपल्या पवित्र कामांत . अडथळा करावा ह्मणून भुतें आपल्यासमोर येऊन उभीं राहतात व आपणापुढें तोंडें वेंगा-डतात अशा भोळवट कल्पना सुद्धां त्याच्या मनांत येऊं लागल्या. एकदां धर्मपुस्तकाच्या भाषांतराचें काम तो करीत असतां एक भूत आपल्यासमोर उभें राहून चेष्टा करीत आहे असा त्याला भास होऊन तो फार रागावला. त्या संतापासरशीं त्यानें आपली दौत त्यावर फेंकिली. तो शाईचा डाग भिंतीवर पुष्कळ वर्षें कायम होता व हें ठिकाण पहावयास जाणाऱ्या लोकांस हा डाग तेथील लोक दाखवीत असत. तो उद्योगांत सतत गुंतला असतां व रात्रंदिवस अश्रांत श्रम करीत असतांही त्यास वाटे कीं आपण कांहींच करीत नाहीं. परंतु इकडे सर्व जर्मनी देशभर एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत त्याचे निबंध पसरले होते. केव्हांकेव्हां त्याच्या मनांत असें येई कीं, बर्म्सच्या दरबारांत सत्यपक्षसमर्थनार्थ जितका प्रयत्न करणें जरूर होतें, तितका आपण केला नाहीं; असा विचार मनांत येऊन त्यास अतिशय पश्चात्ताप होई व तो स्वतःस फार हिणवून घेई. याव-रून त्याच्या मनाची स्थिति कशी चमत्कारिक झाली होती हें सहज लक्षांत येईल. एका धर्माधिकाऱ्यानें मुक्तिलेख विकण्याचा क्रम पुन्हा सुरू केला. हें त्यास समजतांच त्या धर्माधिकाऱ्यास सावध करण्याकरितां त्यास एक निषेधपर व धमकीचें त्यानें

पत्र लिहिलें. त्यांतील सारांश असा होता कीं " आपला बचाव करण्याकरितां जरी चार बादशाहा एकत्र करून आपण आपल्या पाठीशीं उभे केले, तरी सत्यपक्ष **परमेश्वरास** कळतो आहे, व आपल्या सारख्या माणसाची खोडकी जिरविण्याचें पूर्ण सामर्थ्य त्यास आहे. ह्मणून **परमेश्वराचा** कोपाग्नि आपण प्रज्वलित करूं नये अशी आपणास मी विनंती करितों. " या पत्रांतील कांहीं मजकूर तर अतिशयच कडक रीतीनें लिहिलेला होता. यावरून इतकीच गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, धर्माच्या बाबतींत अनाचार झालेला पाहून त्याचा क्रोधाग्नि भडकून जोरानें पेट घेत असे.

मठवासी मंडळीला अविवाहित राहण्याबद्दल शपथ घ्यावी लागत असे. हा मार्ग इष्ट आहे किंवा कसें या प्रश्नाबद्दल **लूथर** विचार करूं लागला. विचाराअंतीं त्याचें असें मत ठरलें कीं विचार न करितां किंवा अंगीं विचार करण्याची पात्रता नसतां एकादी गोष्ट मनुष्यास दाबदपटशा देऊन करावयास लावणें व ती करण्याबद्दल त्याजकडून शपथ घेवविणें ही निवळ दांडगाई आहे, व अशा रीतीनें घेतलेल्या शपथांचा अंमल मुळींच चालूं नये. त्याचप्रमाणें पुष्कळ मठवासी स्त्रीपुरुषांस मठ सोडण्याकारितां तंटाबखेडा करावा लागत असे. हें त्याला बिलकूल आवडत नसे. त्यानें मठाधिकाऱ्यांस लिहिलें–' ज्यांची इच्छा मठांत राहण्याची नाहीं त्यांस मारून मुटकून मठांत ठेवण्यांत कांहीं अर्थ नाहीं. त्यांस खुशाल जाऊं द्यावें. कोणास मुद्दाम हांकून मात्र लावूं नये. '

# भाग १२ वा.

कोऽतिभारः समर्थानां किं दूरं व्यवसायिनाम् ॥ *

## धर्मपुस्तकाचें भाषांतर,–मूर्तिभंजक,–धर्मसुधारणेचें पुढें पाऊल.

**वार्टबर्ग** किल्ल्यांत असतां **लूथरानें** धर्मपुस्तकाचें ( बायबलाचें ) भाषांतर करण्यास आरंभ केला, हें मागें सांगितलेंच आहे. त्या कामासंबंधानें त्याचा व्यवसाय एकसारखा सुरू होता तरी, तें काम पुरें होऊन पुस्तक प्रसिद्ध करावयास तेरा वर्षें लागलीं. **लूथरानें** लिहिलेल्या ग्रंथांपकीं हा त्याचा मुख्य ग्रंथ ह्मटला तरी चालेल. त्यानें आपले इतर लेख प्रसिद्ध न करतां हाच एक ग्रंथ प्रसिद्ध केला असता तरी त्याचें नांव अजरामर झालेंच असतें. या ग्रंथाच्या योगानें सर्व **जर्मनी** देशभर धर्मपुस्तकांतील रहस्यांचें ज्ञान लोकांत पसरलें, ही गोष्ट निर्विवाद आहे. तसेंच, **जर्मन–वाङ्मयांत** इतक्या महत्त्वाचा ग्रंथ हा पहिलाच झाला असें ह्मटलें तरी चालेल. त्याच्या एकांतवासांत हें काम तो करीत असतां त्याला किती अडचणी आल्या व तें काम त्यास किती कठीण गेलें, हें त्यानें स्वतःच काढिलेल्या उद्गारांवरून लक्षांत येण्यासारखें आहे. त्यानें त्याबद्दल असें लिहिलें आहे कीं, ‘ माझ्या शक्तीच्या बाहेरचें काम मीं हातीं घेतलें आहे. भाषांतराचें काम ह्मणजे काय व

---

* शक्तिमान लोकांना कोणती गोष्ट जड वाटेल ? व्यासंग चालू ठेवणाराला कोणती गोष्ट दूर आहे ?

तें कसें असतें याचा अनुभव आतां मला प्रथमच आला आहे. आजपर्यंत हें काम करण्यास कोणी हात कां घातला नाहीं हेंही मला आतां चांगलेंच समजून आलें आहे.' हे त्याचे उद्गार वाचून कविकुलगुरु **कालिदासाच्या** 'तितीर्षुर्दुस्तरम् मोहादुडुपे-नास्मि सागरम्' या उक्तीची आठवण होते. असो.

**लूथरानें** जीं कामें केलीं त्या सर्वांत हें भाषान्तराचें काम तो अति महत्त्वाचें समजत असे. या कामासंबंधानें त्यास उत्साह अतोनात वाटत असल्यामुळेंच हें काम त्याच्याकडून तडीस गेलें. इतकेंच नव्हे, तर त्या कामास लागणारी सर्व खटपट करण्यास या त्याच्या उल्हासवृत्तीमुळेंच त्यास वरचेवर ताजा दमही येत गेला. हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर त्यानें आपल्या कांहीं विद्वान् मित्रांस मदतीस घेऊन दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं काय काय फेरफार केले पाहिजेत या विचारास तो लागला. **मेलांक्थन**प्रभृति जे प्राचीन भाषांत निपुण होते ते व स्वतः **लूथर** यांची एक सभाच जमली. त्या सभेचा अध्यक्षपणा अर्थां-तच **लूथराकडे** आला. ही मंडळी वेळोवेळीं जमून **ग्रीक, काल्डी, हिब्रू,** व **लाटीन** या भाषांतल्या धर्मपुस्तकांशीं **लूथराच्या** तरजुम्याचा मेळ पाही व काय कमी जास्ती करावयाचें याचा विचार करून तें ठरवी. अशा रीतीनें यांचा क्रम बराच कालपावेतों सुरू होता. त्यामुळें **लूथराचा** ग्रंथ कसा उतरला असेल हें वेगळ्या रीतीनें सांगावयास नकोच.

**लूथर** एकांतवासांत असतां **विटेनबर्ग** येथें कांहीं विलक्षणच प्रकार सुरू झाला होता. धर्माच्या बाबतींत अज्ञानामुळें अनेक

घातांडें शिरलीं होतीं, तीं नाहींशीं करण्याच्या हेतूनें लूथर मोठ्या आवेशानें व निर्भीडपणें मांडत असे; तरी पण मागचा पुढचा विचार न करितां सब झूट ह्मणून प्रचलित चांगल्या गोष्टींचें सुद्धां निरसन करणें त्याला बिलकुल पसंत नव्हतें. कारण, प्राचीन वस्तुस्थिति जेवढी ह्मणून चांगली असेल तेवढी कायम ठेवण्याकडे निसर्गतःच त्याची प्रवृत्ति असे.

त्याच्या अपरोक्ष त्याच्या कांहीं अनुयायांनीं विचाराचा अवलंब न करितां विकारवश होऊन जो निंद्य प्रकार चालविला होता, तो ऐकून त्यास फार वाईट वाटलें व तो अगदीं अस्वस्थ झाला. डाक्टर कार्लस्टड ह्मणून एक अविचारी, तव्यती व माथेफिरू धर्मोपदेशक होता; तो बहुतेक धर्मसंस्कार धर्मविरुद्ध आहेत असें प्रतिपादूं लागला. इतकेंच करून तो थांबला नाहीं. कांहीं मूर्ख व उतावळ्या लोकांचें आधिपत्य स्वीकारून तो त्यांसह विटेनबर्गच्या मुख्य देवळांत शिरला; व आपल्या कृत्यांच्या समर्थनार्थ धर्मपुस्तकांतील कांहीं वचनें मोठ्यानें ह्मणून देवाची प्रार्थना सुरू असतां साधूंच्या मूर्ति फोडण्याचा त्यानें सपाटा चालविला. ही बातमी हां हां ह्मणतां सर्वत्र पसरली व मूर्ति फोडण्याच्या वेडाचें अनुकरण इतर शहरांतूनही होऊं लागलें. नामांकित चितान्यांनीं काढलेल्या उत्तम तसबिरी व चित्रें—ज्यांचा संबंध पूजेशीं किंवा प्रार्थनेशीं यत्किंचितही नव्हता—त्यांचा सुद्धां ह्या मूर्तिभंजकांनीं, कालाचें सुद्धा महत्त्व लक्षांत न आणितां, विध्वंस केला. या अशा दुष्ट व नीच कृत्यांमुळें पुष्कळ लोकांच्या मनांत धर्मसुधारणेबद्दल वाईट ग्रह उत्पन्न झाले व इराझ्मसासारखे

विद्वान् व बुद्धिमान् लोकही या चळवळीस प्रतिकूल झाले. या अव्यवस्थितपणाची व धामधुमीची हकीकत **लूथरास** कळल्यावर त्यास फार वाईट वाटून तो फार खिन्न झाला, म्हणून मागें सांगितलेंच आहे. आपण स्वतः **विटेनबर्ग** येथें जाऊन हा सर्व प्रकार बंद करण्याची खटपट करावी, असें त्याच्या मनांत आलें. किल्ल्यांतून निघून परत जाण्याचा आपला हेतु त्यानें **फ्रेडरिक** राजास कळविला. **फ्रेडरिक** राजानें त्यास कळविलें कीं शिक्षेसंबंधीं **बादशाहाचा** ठराव अजून कायम आहे; व तो अमलांत आणण्याचा हुकूम सुटला असतां जें विघ्न येईल तें टाळतां टाळतां मुष्कील होईल. परंतु **लूथराला** राजाचा हा उपदेश आवडला नाहीं. येतील त्या अडचणींस तोंड देऊन व त्या त्या विघ्नांस टक्कर मारून **विटेनबर्ग** शहरीं जाण्याचा आपला हेतु तडीस नेण्याचा त्यानें निश्चय ठाम केला. त्याप्रमाणें तो **विटेनबर्ग** येथें जाण्यास निघाला असतां एका मुक्कामाहून त्यानें **फ्रेडरिक** राजास एक पत्र पाठविलें. 'आपण भिऊं नये; आपणावर कोणत्याही प्रकारचें संकट मी येऊं देणार नाहीं.' अशा आशयाचें तें पत्र होतें. यांत चमत्कार वाटण्यासारखी गोष्ट इतकीच कीं, राजानें **लूथराला** धीर द्यावयाचा तो एकीकडेच राहून **लूथरच** उलट राजास धीर देऊं लागला. राजा व प्रजा यांमधील संबंध येथें अगदीं उलट झाला असें दिसतें. फ्रेडरिक राजाच्या हुकुमाची सुद्धां वाट न पाहतां घोडेस्वाराचें सोंग घेऊन इ. सन १५२२ च्या मार्च महिन्यांत तो **विटेनबर्ग** येथें परत आला व आपल्या

अनुयायांस एकत्र जमवून त्यांस आपलें हलकट व अविचाराचें वर्तन सोडून देण्याबद्दल विनंती करूं लागला. त्यानें त्यांस सांगितलें कीं, 'मित्रहो, माझ्या कट्टया शत्रूंनीं जरी मला अतोनात त्रास दिला, तरी तुमच्या कृतींपासून जसा माझ्या मनाला धक्का बसला व जसें दुःख झालें, तसा धक्का व तसें दुःख त्यांच्या त्रासापासून झालें नाहीं. तुमच्या उतावीळपणानें व तुमच्या अविचारानें आपल्या पक्षाचें फार नुकसान झालें आहे. तें भरून काढणें केवळ तुमच्या वर्तनावर आहे. हळू हलू लोकांचीं मनें वहकूं न देतां, त्यांची समजूत घालून जी सुधारणा होईल तीच खरी." अशा रीतीनें सुमारें एक आठवडापर्यंत उपदेश करून त्यानें त्यांस वाटेवर आणिलें.

याच वेळेच्या सुमारास इंग्लंड देशचा राजा **आठवा हेन्री** यानें **लूथरचीं** कृत्यें फार वाईट आहेत असें मोठया आवेशानें दाखविण्याकरितां त्याचे सर्व लेख एकत्र करून **लंडनांतील** सेंटपालच्या देवळांत जमलेल्या मोठया समाजाच्या समक्ष जाळून भस्म केले; व त्यानें **लूथराच्या**विरुद्ध एक पुस्तक लिहून तें प्रसिद्ध केलें. त्यांत त्यानें त्याला लांडगा, सर्प, पिशाच, आणि अशाच कांहीं शिव्यांनीं आळविलें होतें ! या कारणावरून **पोप** महाराजांची मर्जी त्या तव्यतखोर व जुलमी राजावर प्रसन्न होऊन त्यांनीं त्यास '**धर्मसंरक्षक**' असा किताब दिला **हेन्रीच्या** ह्या पुस्तकास प्रत्युत्तरादाखल **लूथरानें** एक लेख लिहिला. त्यांत तो राजा ह्मणून

यत्किंचित् सुद्धां भीड न धरतां त्या मदांध राजाची त्यानें यथास्थित पूजा केली होती.

**वार्टबर्ग** किल्ला सोडून परत आल्यावर **लूथरानें** जे जे लेख लिहिले किंवा जीं जीं भाषणें केलीं, त्यांत योजलेली भाषा अति कडक असे. याचें कारण असें की, रात्रंदिवस श्रम करून त्याचा मेंदू बराच क्षुब्ध झाला होता व आपल्या कामाबद्दल त्याला अत्यंत चिंता वाटत होती. त्यानें त्याचें डोकें भणाणल्यासारखें झालें होतें. त्याच्या संभाषणांत व लेखांत वेळोवेळीं जरी आडदांडपणा दिसून येई, तरी पण धर्मपुस्तकाच्या खंबीर पायावर त्यानें एकंदर आपली इमारत उभारली असल्यामुळें, त्याच्यापुढें त्याच्या वैऱ्यांचें सुद्धा कांहीं चालत नसे. त्यांचे विचार, त्यांच्या कल्पना, त्यांच्या युक्ति याच्यापुढें फिक्या पडत. त्याची पक्की समजूत झाली होती कीं, धर्मपुस्तकाचें शस्त्र आपल्या हातीं आहे तोंपर्यंत शेंकडो **पोप** व हजारो **हेन्री** सामना करावयास आले तरी, त्या सर्वांबरोबर टक्कर मारून त्यांस चीत करण्याची धमक आपणामध्यें निःसंशय राहणार. तसेंच, धर्मपुस्तकांतील वचनें चुकीचीं असण्याचा संभव नाहीं, तीं अक्षरशः खरीं आहेत; पण **पोप** व त्याचे अनुयायी यांच्याकडून चुकी होण्याचा संभव आहे व ते चुकले आहेत, अशी त्याची पूर्ण खात्री झाली होती, व तो त्याप्रमाणें स्पष्ट बोलूनही दाखवीत असे.

**पोप** लिओ मरण पावला, तेव्हां सहावा **आड्रियन** यास **पोप**ची गादी मिळाली. **लूथर**ची चळवळ यास साहजिकच न आवडून तीस वाटेल त्या रीतीनें अडथळा आणण्यासाठीं

त्यानें यत्न चालविला. **रोमच्या** धर्माधिकाऱ्यांमधील व एकंदर धर्माच्या बाबतींत जी काय भ्रष्टता असेल ती चट् सारी नाहींशी करण्याची खटपट मी करतों, पण **बर्म्सच्या** दरबारीं ठरविलेली शिक्षा **लूथरला** दिली पाहिजे, असें त्यानें मोठ्या आग्रहानें बादशहास कळविलें. असा तो हात धुऊन **लूथराच्या** पाठीस लागला. इकडे **लूथराचा** पक्ष इतका दृढ झाला होता व त्याची चळवळ अशा जोरानें पुढें सरसावत होती कीं, **आड्रियनसा-** रख्या कित्येक **पोपांनीं** त्याला खालीं दडपण्याचा विडा उच- लला असता तरी **लूथराला** त्यापासून यत्किंचित् सुद्धा धक्का पोहोंचला नसता. **पोपांच्या** मुलथापींला व एकंदर जुलूमाला आडकाठी घालून त्यापासून लोकांस मुक्त करणाऱ्या **लूथरास** लोक आपला नायक समजूं लागले होते. यावेळेस **विटेनबर्ग** शहर ह्मणजे **जर्मनी** देशांत एक विद्यादेवीचें मुख्य ठिकाण होऊन बसलें होतें. तेथें विद्यार्जनासाठीं त्या राज्यांतील निरनि- राळ्या ठिकाणांहून विद्यार्थी येत असत. त्यांच्या मतांकुरांवर **लूथराच्या** रसवती वाणीच्या उदकाचें वारंवार अभिषेचन होत गेल्यामुळें त्यांच्या बुद्धिलतेस इष्ट असा आकार येत चालला होता. मधून मधून धर्मपुस्तकाच्या निरनिराळ्या अध्यायांचें भाषां- तर होऊन तें वेगळें वेगळें प्रसिद्ध होत होतें. तसेंच, धर्माच्या वादविवादाचीं छोटेखानी लहानलहान पुस्तकें वारंवार निघत असत व तींही मोठ्या आस्थेनें वाचलीं जात असत. त्यामुळें सुधारकचमूचें मन या चळवळींकडे सारखें लागून तिचा उत्साह सारखा कायम राहत असे. याच सुमारास **मेलांक्थनानें** आपल्या

विद्वत्तेस व नेमस्तपणास साजेसा एक उत्तम ग्रंथ या नवीन पंथासंबंधीं लिहून त्यास त्यानें एक प्रकारचें मर्यादित स्वरूप आणलें. त्यामुळें सुधारकमंडळी नवीन पंथास चिकटून राहिली. त्यांची दिवसेंदिवस अशी पक्की समजूत होत चालली होती कीं, लोकांमध्यें स्वतःचा विचारांकुर उत्पन्न करण्यास, लोकांचा रानटीपणा घालवून त्यांस विद्याचारसंपन्न करण्यास, व अज्ञानांधकार नाहींसा करून ज्ञानप्रदीपाची धगधगीत जोत लावण्यास, हा पंथ फार उपयोगी आहे. त्या वेळच्या काव्यांतून, लेखांतून व एकंदर वाङ्मयांतून या नूतन पंथाबद्दल स्तुति होऊं लागली व त्याच्या आड येऊं पाहणाऱ्यांची निंदा होऊं लागली. या सुधारलेल्या पंथानें लोकांस कांहीं जगिक फायद्यांचीही प्राप्ति झाली. "राजेरजवाड्यांस देवळासभोंवतालच्या जमिनी, उपाध्येलोकांस पत्नी, व एकंदर लोकांस स्वातंत्र्य, हे ठळक फायदे या पंथानें करून दिले–" असें जें एका **जर्मनीं**तील इतिहासकारानें ह्मटलें आहे तें अगदीं खरें आहे.

प्ररूढ आचारविचार चुकीचे आहेत ह्मणून त्यांचा अंमल क्रमाक्रमानें नाहींसा होऊन लोकांस योग्य वळण लागावें अशी ज्यांची मनापासून इच्छा असते, व तशा वळणाचा कित्ता लोकांच्या पुढें स्वतःच्या उदाहरणानें मांडण्याइतकें मनोधैर्य अंगीं असल्यास त्यांच्या कृतींचा सुपरिणाम ताबडतोब कसा दृष्टीस पडतो, आणि 'बोले तैसा चाले, त्याचीं वंदावीं पाउलें' या महासाधूच्या उक्तीस ते कशी सार्थकता आणितात, याचा मासला पुढील भागांत आहे.

## भाग १३ वा.

तथा नित्यं यतेयातां स्त्रीपुंसौ तु कृतक्रियौ ।
यथा नाभिचरेतां तौ विभक्ताावितरेतरम् ।। *

### फ्रेडरिक राजाचा मृत्यु-लूथराचा विवाह,—त्याची गृहस्थिति,—धर्मसुधारणेचें पुढें पाऊल.

कोणतेंही महत्कार्य हातीं घेतलें ह्मणजे तें करीत असतां अडचणी येतातच; त्यांतून धर्मसुधारणेसारखी नाजूक गोष्ट करीत असतां तर अनेक अडचणी येतात; पण त्या अडचणींस न भितां त्यांच्याशीं झुंजून त्यांतून शिताफीनें जे पार पडतात तेच खरोखर पूज्य होत, व त्यांच्या मानसिक धैर्याची करावी तितकी स्तुति कमीच होणार आहे. इ. स. १५२५ या वर्षी **फ्रेडरिक** राजा मरण पावला. **लूथराचा** पक्ष खरा आहे, त्याचीं मतें वाजवी आहेत, तीं धर्मशास्त्रास धरून आहेत, अशी विचाराअंतीं खात्री वाटल्यावरून ज्यानें त्यास पाठबळ दिलें होतें; बादशाहाच्या इतराजीमुळें तो अगदीं निराश्रित असतां मोठया युक्तीनें ज्यानें त्यास वांचविलें होतें; व हरएक आणीबाणीच्या प्रसंगीं त्याच्या केंसास सुद्धा धक्का न लागूं देण्याबद्दल

* स्त्रीपुरुषांनीं सारखेपणानें नेहमी असें वागावें कीं एकमेकांपासून आपण कधींच विभक्त होणार नाहीं.

जो सदा जपत असे;-तो त्याचा पुरस्कर्ता परलोकवासी झाला. पण **लूथर** विलक्षण धैर्याचा मनुष्य असल्यामुळें येईल तें संकट सोसण्यास तयार असे; त्यानें या प्रसंगीं आपल्या मनाची समता कायम ठेविली, व **फ्रेडरिक** राजाच्या मरणानें त्याच्या पक्षाची हानि होईल अशी जरी पुष्कळांस भीति पडली होती तरी त्यानें आपल्या अनुयायांचें सांत्वन करून आपलें काम नेटानें चालविण्याबद्दल तो त्यांस उत्तेजन देत गेला. धर्मदीक्षा घेतलेल्या कोणत्याही मनुष्यानें लग्न करूं नये असा धर्माचा निर्बंध आहे अशी लोकांची समजुत असे. त्याबद्दल **लूथरानें** नापसंती दाखविल्याबद्दल मागें सांगितलेंच आहे. त्यानें इ. स. १५२७ या वर्षी एका **काथराईन** नामक मठवासिनीशीं लग्न लावून आपल्या मताप्रमाणें वर्तन करून दाखविलें. यामुळें तर त्याच्या शत्रूंस त्याचा फारच राग येऊन ते त्याचा अधिकच द्वेष करूं लागले, व उभयपक्षांत तडजोड होण्याचा संभव आतां अगदींच नाहींसा झाला. **लूथर** हा विषयासक्त आहे म्हणून यानें लग्न केलें, एरव्हीं अशी धर्मविरुद्ध गोष्ट करण्यास विषयलंपटावांचून दुसरा कोणी धजणार नाहीं, कोणासही इच्छा व्हावयाची नाहीं, वगैरे निंदापर प्रलाप त्याच्या शत्रूंनीं काढून त्याची होईल तितकी मानहानि करण्याची त्यांनीं खटपट चालविली. पण त्याच्या अंगीं विलक्षण मानसिक धैर्य असल्यामुळें त्यांच्या निंदेकडे मुळींच लक्ष न देतां योग्य कर्तव्याकडे रोख ठेवून तें नीट रीतीनें तो बजावूं लागला.

संसारामध्यें खऱ्या पत्नीच्या समागमापासून जें सुख होतें, त्यापासून होणारा आनंद अवर्णनीय असतो. तिची प्रेमळ व साधी वृत्ति, गोड स्वभाव, पतीच्या कामधंद्याविषयीं कळकळ, गृहकृत्यांतील दक्षता व एकंदर संसारांतील त्रासास व कटकटीस पुरून उरणारा तिचा धिमेपणा वगैरे गुणांनीं मंडित जी गृहिणी, तिचा थोरपणा किती वर्णावा ? सुदैवकरून **लूथरानें** जिच्याशीं लग्न केलें, त्या **काथराइनच्या** अंगीं हे गुण बऱ्याच अंशीं वसत होते. एका विद्वान ग्रंथकारानें या पतिपत्नीबद्दल असें लिहिलें आहेः " विवाहानंतर **लूथराचा** आयुष्यक्रम जितका सुखांत गेला, तितका फार थोडयांचा जात असेल. त्याच्या धामधुमीच्या कालक्रमामध्यें त्यास विश्रांति मिळून जर अधिक श्रमांचीं कामें करण्यास वेळोवेळीं ताजा दम आला असेल, तर त्याचें सर्व श्रेय त्याच्या थोर पत्नीकडे आहे. " स्वतः **लूथरानें** तिजबद्दल असें ह्मटलें आहे: " मला कोणी वाटेल तितकी संपत्ति देण्याचें कबूल करून माझ्या प्रिय **काथराइनवांचून** रहा ह्मणून सांगितलें, तर तसें माझ्याकडून कधींच व्हावयाचें नाहीं. माझ्या प्रियतमेच्या समागमांत माझ्या दारिद्र्याबद्दल मला कांहींच वाटत नाहीं. " अशी पत्नी खरोखर आपल्या पतीचें रत्नभांडार होय. असें रत्न लाभलें असतां दारिद्र्यच काय, पण त्याहीपेक्षां जास्ती संकटाचा काल सुद्धां सहज लोटतां येईल. असो. **काथराइनचें** वय लग्नाच्या वेळीं २१ वर्षांचें होतें. **साक्सनी** प्रांतांतील एका कुलीन घराण्यांत

हिचा जन्म झाला होता. लग्नाच्या पूर्वी कांहीं वर्षे ही एका स्त्रीमठांत होती. पण मठांत नानातऱ्हेचे निरर्थक धर्मसंस्कार व व्रतें उपोषणें करावीं लागत. त्यांच्या योगानें तिच्या मनास कांहींच बोध व समाधान न होतां शांति तर मुळींच वाटेना, व कायद्याप्रमाणें तेथें अगदीं बरोबर वर्तन न घडल्यास अतिशय जाच सोसावा लागत असे. या कारणांमुळें मठवासिनी फार त्रासून गेल्या होत्या. ह्मणून आठ मठवासिनी मठाधिकाऱ्यांशीं भांडण करून हा मठ सोडून गेल्या; त्यांपैकीं ही एक होती.

लूथराची स्थिति गरिबीचीच होती. एकंदर सर्व आयुष्यक्रमांत पुरून उरेल इतका पैसा त्यास कधींच मिळाला नाहीं ज्ञानप्रसारार्थ त्यानें जीं पुस्तकें लिहिलीं, त्यांबद्दल तो पैसा घेत नसे. धर्मपुस्तकाच्या भाषांतरासारख्या अति महत्त्वाच्या कामापासून सुद्धां त्यास कांहींच प्राप्ति झाली नाहीं. मात्र ज्यांनीं त्याचे ग्रंथ छापून प्रसिद्ध केले, ते सधन झाले. लूथराच्या या स्थितीबद्दल विचार केला ह्मणजे ' मतिमतां च विलोक्य दरिद्रतां, विधिरहो बलवानिति मे मतिः' या उक्तीची आठवण झाल्यावांचून राहत नाहीं. अशी जरी त्याची स्थिति होती, तरी पण आपणास धनाढ्य लोकांप्रमाणें मोठ्या भपक्यानें राहतां येत नाहीं, ह्मणून तो कधीं विव्हळत नसे. त्यास पांच मुलें होतीं. नवराबायकोचें अंतःकरण व विचार एक असल्यामुळें त्या कुटुंबांत कधींच कलह होत नसे. सुख, शांति, प्रीति व समाधान यांची त्या कुटुंबांत रेलचेल असे. त्याच्या घरांत

लक्ष्मीचा वास जरी कमी होता, तरी सौजन्य, प्रेमळपणा, आतिथ्य, सत्कर्मे व सुवचें ही धनसंपदा भरपूर नांदत होती. असो. तात्पर्य इतकेंच कीं पतीनें हातीं घेतलेल्या कामाबद्दल रात्रंदिवस कळकळ बाळगणारी व यथाशक्ति त्यास साहाय्य करून प्रोत्साहन देणारी, अति सभ्य, ममताळू व त्या त्या कामांत तत्पर अशी पत्नी लाभली ह्मणून लूथरास धन्यता वाटावी, हें साहजिक आहे. त्याचें लग्न झाल्यावर पुष्कळ लोकांस असें वाटलें होतें, कीं हा संसारांत पडल्यामुळें त्याच्याकडून हातीं घेतलेल्या कामाची हयगय होईल व तें बरेंच मागें पडेल. पण तसा प्रकार बिलकुल झाला नाहीं. धर्मसुधारणेच्या कामास त्यानें स्वतःस वाहून घेतलें होतें व तें थेटपर्यंत त्यानें खंड न पडतां व कसल्याही अडचणींस न जुमानितां तसेंच चालविलें.

त्याच सुमारास **इताली** देशांत लढाईचें कारण उपस्थित झाल्यामुळें **जर्मनी**च्या बादशाहास तिकडे लक्ष पुरविणें भाग पडलें. त्या वेळीं जे **पोप**महाराज गादीवर होते, त्यांचा व बादशाहाचा कांहीं मतभेद होऊन उभयतांचें वांकडें पडलें. प्रथम या उभयतांमध्यें चांगलें सूत होतें; इतकें कीं **पोप**महाराजांच्या हातून राज्यमुकुट ग्रहण करावा या हेतूनें बादशाहाची स्वारी **रोम**शहरीं प्रयाण करणार होती. परंतु बादशाहापासून कांहीं प्रांत मोठ्या युक्तीनें काढण्याची लालसा **पोपास** झाल्यामुळें त्याच्या भिक्षुकी काव्याचा बादशाहास तिटकारा वाटला. ह्मणून त्यांच्यांत बेबनाव झाला. नंतर **पोपांनीं** इंग्लंड व फ्रान्स

दोन्ही देश आपल्या बाजूकडे वळवून घेण्याचा यत्न चालविला. इकडे **जर्मनीं**तील सुधारणाप्रिय राजेरजवाड्यांची मदत घेण्याची खटपट बादशाहानें चालविली. ही गोष्ट सुधारलेल्या धर्मपंथाचा प्रसार होण्यास फारच अनुकूल झाली. तसेंच, **साक्सनी**च्या **फ्रेडरिक** राजाप्रमाणें आतां इतर राजेरजवाड्यांमध्यें या पंथाची बरीच आवड उत्पन्न झाली व ते **लूथरा**चे अनुयायी बनले. याप्रमाणें **जर्मनी** देशांत व त्या सभोंवतालच्या प्रांतांत या पंथाची बरीच भरभराट होत चालली.

## भाग १४ वा.

जितेंद्रियाणामतिथिप्रियाणां, गृहेपि मोक्षः पुरुषोत्तमानाम् ॥ ‡

## नवीन धर्माचा स्वीकार,—लूथराचा मृत्यु.

**विटेनबर्ग** येथील देवळाच्या दरवाज्याला **लूथरानें** आपले सिद्धांत डकविले, तेव्हांपासून धर्मसंबंधीं सुधारणेची चळवळ सारखी सुरू झाली. त्या गोष्टीस पुरीं १३ वर्षे लोटलात न लोटतात इतक्यांतच **लूथरानें** पेरलेलें बीं चांगलें रुजून फलद्रूप झालें, व त्यापासून झालेल्या इष्ट सुधारणांचा परिणाम सर्वत्र चांगलाच दृष्टीस पडूं लागला. १५१७ या वर्षाच्या सुमारास सत्याच्या बाजूचें समर्थन करण्याकरितां विचारा **लूथर** यःकश्चित् धर्मोपदेशक ह्मणून पुढें आला होता. त्या वेळेस आपल्या यत्नांपासून एवढा मोठा परिणाम होईल व ही चळवळ अशा थरास येऊन पोहोंचेल हें त्याच्या स्वप्नींही नव्हतें. पण इ. स. १५३० च्या सुमारास धर्माचा नवीन पंथ स्वीकारणाऱ्या संस्थानिकांची व इतर लोकांची एक जंगी सेना जमून तिनें तो पंथ वृद्धिंगत करण्याचा सारखा क्रम सुरू ठेविला. इतकेंच नव्हे, तर या वर्षाच्या जून महिन्यांत या सेनेनें आपला मोर्चा **आ-ग्सबर्ग** शहराकडे वळविला व तेथें जमलेल्या दरबारांत प्रत्यक्ष बादशहाची भेट घेतली. ' आह्मास प्ररूढ धर्माचीं तत्वें मान्य

‡ ज्यांना अतिथि प्रिय वाटतात व ज्यांनीं इंद्रियांना जिंकिलें अशा पुरुषरत्नांस घरीं राहून सुद्धा मोक्ष मिळतो.

नाहींत, व आह्मी नवीन धर्मपथानुयायी आहों, ' असा त्याजपुढें त्या चमूनें मोठ्या धैर्यानें प्रतिज्ञापूर्वक जुन्या धर्माचा निषेध केला. या मंडळीसच ' प्रोटेस्टंट्स ' ह्मणजे ' प्रतिज्ञापूर्वक निषेध करणारे ' ह्मणण्याचा प्रघात पडला. हें नांव हा नवीन धर्म स्वीकारणाऱ्यांस अझूनही लावतात. असो; या प्रसंगीं **लूथर** त्या मंडळीबरोबर नव्हता. कारण, नऊ वर्षांपूर्वीं **वर्मस** येथें बादशहानें त्याचें पारिपत्य करण्याबद्दल जो ठराव केला होता तो अझून कायम होता. तो ह्या वेळीं **कोबर्ग**च्या किल्ल्यांत होता. तरी पण **आग्सबर्ग** येथें जें धिटाईचें कृत्य झालें, तें सर्व त्याच्या मसलतीनेंच झालें.

**साक्सनी** प्रांतांतील ज्या **एसेलूबेन** गांवीं **लूथर** जन्मास आला होता, तेथेंच इ. स. १५४६ सांत त्याचें देहावसान झालें. **मान्स्फील्ड**च्या सरदारांमध्यें खाणीच्या मालकीबद्दल कांहीं तंटा पडला होता. त्याचा निकाल लावण्याकरितां त्यास विनंती केल्यावरून तो तेथें गेला होता. हें काम करून तो परत येत असतां **एसलूबेन** गांवीं तो अजारी झाला, व या दुखण्यांतून तो पुन्हा उठला नाहीं. त्याची प्रकृति क्षीण झाली होती, तरी त्याच्या मनाची हुषारी शेवटपर्यंत कायम होती. अंतकाळीं त्याची मित्रमंडळी त्याच्या सभोंवतीं जमली होती. त्यांपैकीं एका मित्रानें त्यास विचारिलें, ' ज्या मतांचा आपण आजपर्यंत स्वीकार केला व जीं आपण मोठ्या कळकळीनें प्रतिपादिलीं, तीं आपल्या अंतकाळीं सुद्धा आप-

णास खरीं वाटतात काय ? ' तेव्हां या मरणोन्मुख जगविख्यात सुधारकाच्या तोंडांतून ' होय ' हा शब्द मोठया आवेशानें बाहेर आला. हें शेवटलें उत्तर दिल्यावर त्यानें आपले डोळे झांकले, व नंतर लवकरच त्याचें प्राणोत्क्रमण झालें.

## भाग १५ वा.

हो मृत्यु आजीच घडो युगान्तीं ।
सन्मार्ग टाकून भले न जाती ॥

### लूथरच्या आंगचे गुणावगुण व त्याचा स्वभाव.

कोणीही मनुष्य कांहीं मोठें काम करून उदयास आला ह्मणजे जे गुण त्याच्या अंगीं नसतील ते सुद्धा त्याचे अंगीं आहेत, असें दाखविण्याचा यत्न होत असतो. परंतु हा प्रकार वाजवी नाहीं. जसा जो असेल तसेंच त्यास दाखविणें चांगलें. एकाद्या व्यक्तीच्या अंगीं पुष्कळ चांगले गुण असले व थोडे अवगुण असले, तर गुणांबरोबर अवगणही वर्णिल्यानें गुणांचा लोप होतो असें नाहीं. लूथराचा एकंदर वर्तनक्रम पाहून त्याजबद्दल विचार केला असतां असें लक्षांत येतें कीं, अवगुणांपेक्षां त्याच्या अंगीं सद्गुणच जास्ती होते. त्याचें सदाचरण, त्याचें व्यावहारिक चातुर्य, व पारमार्थिक ज्ञान, हे गुणच त्याचा जीवनवृत्तांत वाचीत असतां अनेकदां लक्षांत येतात. ज्ञानप्रसारार्थ त्याच्याकडून जे अनेक प्रयत्न झाले, जीं नानाविध पुस्तकें लिहिलीं गेलीं, व निरनिराळ्या विषयांवर त्याचे जे लेख प्रसिद्ध झाले, त्यावरून त्याच्या विशाल बुद्धिमत्तेची साक्ष पटते. विचाराअंतीं जीं मतें ठरतील व स्वतःच्या समजुतीप्रमाणें खरीं

वाटतील, तीं स्पष्ट बोलून दाखविण्याचा व तदनुसार वर्तन करण्याचा तर त्याचा बाणा असे. कांहीं झालें तरी व कसाही प्रसंग आला तरी त्यांत तो बदल करीत नसे, हें पुष्कळदां स्पष्ट झालेंच आहे. यावरून स्वमताचा अभिमान त्यास किती असे, हें चांगलें दिसून येतें. तसेंच खरें तत्व शोधून काढण्याच्या कामांत त्याचा हातखंडा असे, हें त्यानें सुरू केलेल्या चळवळींत जागोजागीं दिसून आलें आहे. सत्य हें तर त्यास स्वभावतःच आवडत असे. खोटें बोलणें, लपंडाव खेळणें, अंगीं नसतां आव आणणें, या व अशा प्रकारच्या इतर गोष्टींचा त्याला मनापासून तिटकारा वाटे. " चित्ते वाचि क्रियायां च महतामेकरूपता ' ही उक्ति त्याच्या वर्तनास अगदीं बरोबर लागू पडत होती. अशी विलक्षण सत्यप्रीति त्याच्या ठिकाणीं पूर्ण वास करीत असल्यामुळें तोंडपुजेपणा करून लोकप्रियता संपादण्याचा यत्न त्याच्याकडून होणें अर्थातच अशक्य होतें. असे निरनिराळे सद्गुण त्याच्या अंगीं होते तरी तो सर्वस्वी दोषरहित होता असें नाहीं. त्याचा स्वभाव अति तापट असे. त्याचा कोणी निषेध केला असतां तो सहन न होऊन कधीं कधीं तर असभ्य भाषणापर्यंत सुद्धा मजल येऊन पोंहचत असे. कित्येक प्रसंगीं तर त्याच्या बोलण्यांत व लिहिण्यांत दांडगाईचा प्रकारही दिसून येई. हीं त्याचीं व्यंगें त्यास कळत होतीं, व केव्हां केव्हां तर त्यास त्याबद्दल वाईटही वाटे.

मनुष्यांच्या गुणावगुणाचें परीक्षण करून त्याबद्दल मत ठरवितांना, ते ज्या काळीं होऊन गेले त्या काळांतील लोकांच्या

समजुती व कल्पना लक्षांत आणून तें ठरविलें पाहिजे. इतर काळांतल्या समजुती व कल्पना दृष्टीसमोर ठेवून तसें केलें असतां तें बरोबर होणार नाहीं. सद्गुण ते सद्गुण व दुर्गुण ते दुर्गुण; कोणत्याही काळीं सद्गुणांस लोक दुर्गुण व दुर्गुणांस सद्गुण समजणार नाहींत. हें जरी खरें आहे तरी साधारणपणें लोकांच्या रीतिभाती व रूढि नेहमी बदलत जातात. या मानानें पाहतां, लूथरच्या वर्तनाचा जो प्रकार आपणास सध्याच्या काळीं अगदीं दूषणीय वाटेल तो प्रकार तत्कालीन लोकांस अगदीं तसाच वाटला असेल असें ह्मणतां येत नाहीं. त्याच्या लिहिण्यांतील व संभाषणांतील तीव्रपणास आपण असभ्यपणाचा प्रकार समजून त्यास दोष देतों व नांवें ठेवितों; परंतु त्या काळच्या एकंदर वस्तुस्थितीचा विचार केला असतां असें लक्षांत येतें कीं, त्यानें जें महत्कार्य हातीं घेतलें होतें तें सिद्धीस नेण्यास केवळ तो असा तीव्र होता ह्मणूनच समर्थ झाला. अज्ञानांत व धर्मभोळेपणांत सर्वस्वी निमग्न झालेल्या लोकांस जागृत करणें, केवळ दुराग्रहानें गतानुगतिक अशा एका धर्मपथास चिकटून राहिलेल्या व लक्ष्मीच्या मदानें अंध झालेल्या व सत्तेच्या जोरावर वाटेल त्यास—नव्हे राजास, बादशहासुद्धा—यःकश्चित् मानणाऱ्या मानी धर्माधिकाऱ्यांच्या चेतलेल्या क्रोधाग्नीनें होरपळून न जातां त्यांच्याशीं दोन हात करणें, इत्यादि गोष्टी घडवून आणणें ज्या मानानें कठीण, त्याच मानानें योजकही तसाच कठीण छातीचा व तीव्र वर्तनाचाच पाहिजे. अशा प्रसंगीं सौम्य वर्तनानें कांहींच झालें नसतें. लूथरपेक्षां

जास्ती प्रीतीस पात्र, पण कमी जोरदार, अशा माणसानें हें जंगी काम उचलिलें असतें, तर यांत येणाऱ्या नानाविध संकटांपुढें व अडचणींपुढें त्याचा टिकाव न लागतां त्यास माघारच खावी लागती. शेवटीं शेवटीं त्याची प्रकृति बरीच क्षीण झाल्यावर जरी स्वीकृत कार्याबद्दल त्याचा उत्साह सारखा कायम होता तरी, त्याच्या स्वभावावर त्याचा ताबा अगदींच नाहींसा होऊन तो दिवसानुदिवस इतका तापट व चिरडखोर होऊं लागला कीं, त्याच्याविरुद्ध कोणी बोललें किंवा लिहिलें असतां त्यास अगदींच खपेनासें होई, व त्यास खाऊं का गिळूं असें त्यास वाटूं लागे. त्याच्या शत्रूंसही थक करून सोडणारी जयप्राप्ति त्यास झाली, यूरोप खंडांतील बऱ्याच भागांत त्याचीं मतें पसंत होऊन लोक त्याचे अनुयायी बनले, पोपाच्या ज्या गादीसमोर अति प्रबळ बादशहाची सुद्धा गाळण होऊन ते थरथरां कांपूं लागत ती पोपाची गादी त्यानें समूळ हालवून सोडिली. व या सर्व गोष्टी त्याच्या देखत घडून आल्या ह्मणून कधीं कधीं त्याच्या वर्तनांत गर्वोक्ति व आत्मश्लाघा दिसून येत. त्यानें जी कृति प्रत्यक्ष करून दाखविली तिजबद्दल त्याच्या अंतःकरणांत अशी प्रवृत्ति उद्भवली नसती तर तो खरोखर मनुष्यापेक्षां वरच्या पायरीचा गणला गेला असता.

लूथरच्या अंगचे गुणदोष कांहींही असोत, पण धर्माच्या नांवाखालीं होत असलेले अनाचार नाहींसे करून सत्याच्या समर्थनार्थ लढाई करण्यास व मनसोक्त वर्तन करून भोळ्या लोकांस नाडणाऱ्या जबरदस्त मंडळाबरोबर जीवाची पर्वा न

करितां दंड ठोकून झुंजण्यास हाच मनुष्य विशेषेंकरून योग्य होता. त्याला भीति फक्त परमेश्वराची वाटत असे; मनुष्याची भीति त्याला यत्किंचित् सुद्धा वाटत नसे. प्रथमारंभीं पोप महाराजांच्या विरुद्ध कांहींही वर्तन करण्यास तो भीत असे व सावधगिरीही ठेवीत असे. या बंडखोरास नीट शुद्धीवर आणण्याचे व यानें आरंभिलेली खटपट अगदीं बंद करून टाकण्याचे चांगले प्रसंग त्याच्या प्रतिपक्ष्यांस कित्येक आले. परंतु जसजसे त्याचे प्रतिपक्षी जास्तीच हट्टास पेटून त्याचा द्वेष अधिकाधिक करूं लागले, तसतसें या राजश्रींच्या अंगीं जास्ती धैर्य येऊन याच्यांत वीरश्री जास्ती चढत चालली. त्याच्या आयुष्यक्रमांतला अति आणीबाणीचा व अति भयंकर प्रसंग ह्मटला ह्मणजे इ. स. १५२१ सांतील वर्म्सच्या भव्य दरबाराचा होय. या प्रसंगीं या धैर्यशाली पुरुषानें जो पराक्रम करून दाखविला, तो ‘ यावच्चंद्र दिवाकरौ ’ लोकांच्या स्मरणांत निःसंशय राहील. या प्रसंगीं त्याच्या मित्रांस त्याच्या जीवाबद्दल भीति पडून—‘तुह्मी त्या दरबारांत सहसा जाऊं नये—’ ह्मणून त्यांनीं त्यास वारंवार आग्रह केला. पण लूथर हा स्वतःच्या जीवाची परवा न करणारा व अडचणींस भिऊन गांगरून जाणारा लेचापेचा नव्हता. मानसिक व शारीरिक धैर्याचा तो मूर्तिमंत पुतळाच होता. आपल्या मित्रांच्या सूचना व आग्रह एकीकडे ठेवून तो थेट वर्म्स शहरीं जाऊन थडकला. गेला तरी कशाकारितां ? त्या परिषदेची मजा पाहण्यास किंवा ठराव पसार करण्याकारितां नव्हे, तर प्रत्यक्ष बादशहा व इतर राजे-

रजवाडे व याचा नाश करण्यास सर्वथैव उद्युक्त झालेलें व याजब-द्दल अति द्वेष व मत्सर ज्याच्या मनांत पूर्ण भरला होता असें पाद्रीमंडळ, अशांच्या समोर—त्या सर्वांचा कटाक्ष आपणावर आहे हें समजून—उभें राहून सामना करण्याकरितां ! ! वर्म्सला येऊन पोहोंचण्यापूर्वी " माझ्या प्रतिपक्ष्यांनीं आकाशापर्यंत पो-होंचणाऱ्या ज्वालांची होळी पेटविली, तरी मी तींतून जाईन. मी सिंहाच्या ' आ ' केलेल्या जबड्यांत जावयास सुद्धा तयार आहें—" असें तो ह्मणाला. या वर्म्सच्या दरबारांत परा-क्रमाची व असाधारण धैर्याची त्यानें शिकस्त करून दाखविली असें ह्मणण्यास चिंता नाहीं. सारांश, त्या दिपवून टाकणाऱ्या भव्य दरबारांत केवळ निराश्रित, केवळ सत्य आपल्या बाजूस आहे अशा निःसीम विश्वासावर सर्व भिस्त ठेवून तो निर्धास्त उभा असतां, जर्मन लोकांच्या अंतःकरणांत जी ज्योति त्यानें प्रज्वालित करून ठेविली आहे, ती त्या वेळेपासून हा काल-पर्वतों न विझतां तशीच सारखी कायम आहे.

## भाग १६ वा.

शुद्धः स एव कुलजश्च सएव धीरः ।
श्लाघ्यो विपत्स्वपि न मुञ्चति यः स्वभावम् ॥ *

### प्रस्तुत चरित्रावरून सुचलेले विचार.

लूथर हा मूळचा यःकश्चित् मजुराचा मुलगा असतां त्यानें जगांत आपलें नांव गाजविलें, व जुन्या धर्मशास्त्राधारें धर्माचा एक नवीन पंथ स्थापण्यापर्यंत आपल्या कृतीची मजल नेली. या एकंदर गोष्टींचा विचार केला असतां प्रथम असें लक्षांत येतें कीं, हा पुरुष बुद्धिमान असला पाहिजे. तसें नसतें तर त्याच्याकडून विद्याही झाली नसती, व जें पर्वतासारखें काम त्यानें उचललें होतें तेंही त्याच्याकडून तडीस गेलें नसतें. पण थोडा विचार केल्यावर असें वाटूं लागतें कीं, या त्याच्या बुद्धिमत्तेस त्याच्या आंगच्या उद्योगाची व दृढनिश्चयाची मदत मिळाली नसती तर, त्याच्या हातून विशेष नांव घेण्यासारखें कृत्य झालें नसतें. कारण, नुसत्या तीव्रबुद्धीनें मनुष्याचें भागत नाहीं, हा सर्वत्र अनुभव आहे. लहानपणीं विपत्तीमुळें सर्व प्रकारच्या गैरसोयी व अड-चणी असतांही त्यांस न भितां—त्यांनीं न गांगरतां—त्यांच्याशीं सारखा झगडा सुरू ठेवून व त्यांस टक्कर देऊन विद्यादेवीची त्यानें एकनिष्ठपणें आराधना केली; व तीस प्रसन्न करून एम्.

---

* विपत्तीमध्यें सुद्धा जो आपला स्वभाव सोडीत नाहीं, तोच शुद्ध, तोच कुलवान्, तोच शहाणा व तोच स्तुतीस पात्र होय.

ए. पर्यंत मजल नेऊन पोंचविली. अशा हलाकीच्या प्रसंगीं येणाऱ्या अडचणींस भिऊन किंवा कंटाळून ' नको ही कटकट! कोठें तरी पोटापुरती तजवीज झाली ह्मणजे मिळविली '–असा कोता विचार त्यानें मनांत आणिला असता तर त्याच्या हातून काय झालें असतें? केवळ तो ' उदरंभर ' मात्र बनला असता.

खरोखर, ज्यांच्या अंगांत कांहीं जोम असतो–कांहींतरी करून दाखविण्याची धमक असते–ते अडचणींला व विपत्तीला मुळींच जुमानीत नाहींत. इतकेंच नाहीं तर, त्या अडचणींशीं व विपत्तींशीं झुंज घेण्यास अवश्य लागणारी ताकद आपल्या अंगीं त्या अडचणी व त्या विपत्ति आणितात, आणि अशा रीतीनें हे आपले वैरीच आपली एका प्रकारची कामगिरी बजावतात असें त्यांस वाटतें, व त्यांच्या अंगीं त्यांच्याशीं झुंजण्याचें स्फुरण चढत जातें. ज्यांस सर्व गोष्टी आयत्या मिळतात व कोणत्याही प्रकारची वाण, गैरसोय, किंवा अडचण मुळींच ठाऊक सुद्धा नसते, त्यांस स्वतःच्या अंगची करामत दाखविण्यास अवकाशच मिळत नाहीं. ह्मणून सर्वच गोष्टींची अनुकूलता असून केवळ आयत्या पिठावर रेघा ओढण्याची स्थिति असणें सर्वथैव इष्टच आहे असें ह्मणतां येत नाहीं. सारांश, नाना प्रकारच्या अडचणी, गैरसोयी, व विपत्तीचे प्रसंग, इत्यादि प्रतिकूल गोष्टींच्या योगानें पाणीदार मनुष्य गांगरून तर जातच नाहीं; पण संसारांत येणाऱ्या त्या त्या संकटांशीं टक्कर देण्यासाठीं आपलें शरीर व मन या उभयतांत रग उत्पन्न करण्याचे हे

प्रसंग केवळ तालीमखाने आहेत असें समजून त्यांचा उपयोग करून घेतो व आपली करामत करून दाखवितो. असो:

लूथर स्वार्थपरायण असता तर एम्. ए. ची परीक्षा देऊन विद्यालय सोडिल्यावर तो कायदेपंडित बनून बराच श्रीमंत होऊन बसला असता. परंतु मेरेमरेपर्यंत श्रम करून नीतिअ-नीतीचा विचारसुद्धा मनांत न आणितां द्रव्यार्जन करावें व मग त्यावर यथेच्छ मजा मारीत बसावें, यांतच आपली इतिकर्तव्यता, यांतच आपला पुरुषार्थ, असें मानणारांपैकीं तो एक नव्हता. त्याची दृष्टि आपल्या स्वतःपुरतीच नव्हती. तिचा पल्ला बराच दूरवर पोहोंचणारा होता. ह्मणून लोकसेवा करण्याचा थोर हेतु मनांत बाळगून कोणत्याही प्रसंगास न भितां त्यानें यथाशक्ति कृति करून दाखविली, व एकंदर जगाच्या कृतज्ञतेस व स्तुतीस तो पात्र झाला.

लोकहिताचीं निरनिराळीं कामें करावयास संसारपाशांत न पडणारी तरुण मंडळी देशांत तयार होणें अत्यंत इष्ट गोष्ट आहे. अशा मंडळीस स्वार्थाची फारशी परवा न बाळगितां त्याबद्दल जितकें बेफिकीर राहतां येण्यासारखें असतें तितकें संसारांत पडलेल्या माणसांस राहतां येत नाहीं. ह्मणूनच अशा स्वार्थत्यागी तरुणांची देशास फार अपेक्षा असते. आतां लूथरप्रमाणें सर्वांनींच संसारावर पाणी सोडून लोकसेवादि कामें करण्याकरितां संन्यासवृत्तिच धारण केली पाहिजे असें नाहीं. सर्वांसच लूथर बनतां येणार नाहीं हें खरें आहे. पण लूथरप्रमाणें विचारशक्ति जागृत ठेवून खऱ्याखोट्याची निवड करणें, व अमुक एक गोष्ट खरी

व सर्वांस हितप्रद आहे अशी विचाराअंतीं पूर्ण खात्री झाल्यावर कांहीं झालें तरी व कसाही प्रसंग आला तरी तिची कास सोडावयाची नाहीं असा मनाचा निग्रह करणें, हें आपलें कर्तव्य आहे असें समजून प्रत्येकास वागतां येण्यासारखें आहे; व इतकें झालें तरी पुष्कळ आहे.

धर्माच्या बाबतींत चुक्या आहेत अशी लूथराची खात्री झाल्यावरही तो जर तिकडे दुर्लक्ष करता, 'व आपणच इतकी जबाबदारी आणि जोखीम शिरावर घेऊन तत्संबंधीं उपद्व्याप कां करावा ' असें मनांत आणून तो जर स्वस्थ बसता तर चाललें असतें; किंवा या खटपटीस आरंभ केल्यावरही पोपाकडून लांच खावून व मोठमोठया पदव्या मिळवून मोठया दिमाखानें ऐष आरामांत कालक्रमणा त्याला करतां आली असती, आणि हवी तितकी प्रतिष्ठा लोकांमध्यें वाढवितां आली असती. परंतु सदसद्विवेकबुद्धीला पूर्णपणें जागणारा व मानसिक धैर्याचा पूर्ण अवलंब करणारा तो असल्यामुळें त्यानें ही गोष्ट पत्करिली नाहीं ही गोष्ट फार ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. त्याच्या आंगच्या एकंदर गुणापैकीं त्याचें मानसिक धैर्य व सदसद्विवेकबुद्धीस अनुसरून त्याचें वर्तन हेच गुण प्रमुख होते, व ह्याच गुणांमुळें त्यास यशःप्राप्ति झाली.

जगांत जे मोठमोठे विजयध्वज उभारले गेले व जीं मोठमोठीं कार्यें झालीं, तीं धैर्यशाली माणसांकडूनच झालीं. मनुष्यांच्या आंगचे गुणांमध्यें धैर्य हा एक अमोलिक गुण आहे. या गुणास वाखाणावें तितकें थोडेंच. शारीरिक धैर्य व मानसिक धैर्य असे धैर्याचे

दोन प्रकार आहेत. पहिलें धैर्य जरी अवश्य आहे तरी दुसऱ्या धैर्याचें महत्त्व पहिल्यापेक्षां अधिक आहे. शारीरिक धैर्यामध्यें मनुष्याची बरोबरी किंवा त्यावर ताणही एखाद्या प्रचंड पशूला सुद्धा करतां येईल. पण तेवढ्यावरूनच तो आपल्या जातींत शहाणा गणला जात नाहीं. परंतु मानसिकधैर्याची गोष्ट निराळी. याची थोरवी वेगळीच आहे. कोणत्याही गोष्टीची लालसा मनांत न धरितां व कशाही बऱ्या वाईट प्रसंगास न भितां कर्तव्यकर्म म्हणून सत्याकरितां रात्रंदिवस झटणें–सारखा यत्न सुरू ठेवणें—तसेंच जीवावर येऊन बेतली तरीही सन्मार्ग न सोडणें–व लोकापवादाकडे लक्ष न देतां सदसद्विवेकबुद्धीस जागणें–इत्यादि महत्त्वाच्या गोष्टी करण्याचें सामर्थ्य ज्यांच्यांत असतें, अशीं मानवरत्नेंच या जगतीतलास केवळ भूषणभूत होतात. अशा प्रकारचें लोकोत्तर मानसिक धैर्य लूथरानें त्या त्या प्रसंगीं कसें दाखविलें हें स्पष्ट झालेंच आहे, व त्याच्या आंगचा हा गुण फारच अनुकरणीय आहे.

जगाच्या इतिहासांत ज्या कांहीं सुधारणा दृष्टीस पडतात व त्यांपासून मोठमोठीं इष्ट कार्यें घडलेलीं दिसतात त्या सुधारणा व तीं कार्यें अशा मनोनिग्रही धैर्यशाली महात्म्यांच्या कर्तींचीं फळें होत. हें सर्व या चरित्रनायकाच्या जीवनवृत्तांतावरून चांगलें लक्षांत येण्यासारखें आहे.

या थोर महात्म्यानें धर्मसंबंधीं जी चळवळ सुरू केली होती, तीपासून परिणाम फार चांगला झाला; जसा व्हावयास पाहिजे होता तसाच झाला. इष्टकार्य तेंच घडून आलें. परंपरागत

घालत आलेल्या प्रूढ आचारविचारांचा जर्मन लोकांवर–नव्हे, यूरोपांतील बहुतेक राष्ट्रांवर–जो जारीनें अम्मल चालू होता, व विचारशून्यतेमुळें ज्यांचा गैरशिस्तपणा त्यांस कळत नव्हता, तो बऱ्याच अंशीं कमी झाला. धर्माध्यक्ष सांगतात तेंच खरें, त्यांच्या मध्यस्थीवांचून मुक्ति मिळणें शक्य नाहीं, त्यांना अधिकार परमेश्वरानें दिला आहे, चूक ह्मणून त्यांच्याकडून व्हावयाचीच नाहीं,–इत्यादि लोकांचे जे नानाप्रकारचे चुकीचे ग्रह होऊन बसले होते ते जाऊन, खऱ्याखोट्याचा निवाडा करण्याची–स्वतःची विचारशक्ति उपयोगांत आणण्याची–बुद्धि त्यांच्यांत उत्पन्न झाली, हेंच होणें अत्यंत इष्ट व हितप्रद आहे. खरोखर पाहतां, ज्या मुख्य बंधनांनीं बाल्यावस्थेंत बालकांचें संरक्षण होऊन त्यांस योग्य वळण लागतें, त्याच बंधनांचा अंमल मनुष्य वयानें मोठा झाल्यावरही कायम असला तर त्यांपासून फायदा न होतां अनिष्ट परिणाम घडण्याचा संभव जास्त असतो. मनुष्याच्या मनाची वाढ होत असतां, ती प्रगल्भदशेस आणण्यासाठीं उपाय ह्मणून ज्या गोष्टी उपयोगीं पडतात, त्याच गोष्टींनीं, त्या मनास पुढची स्थिति प्राप्त झाल्यावर, ह्मणजे जास्त पोक्तपणा आल्यावर, अपाय मात्र होतो. ‘ व्यक्ति व समाज या उभयतांच्या कालक्रमाध्यें अशी एक वेळ असते कीं त्या वेळेस दुसऱ्यानें केलेला उपदेश व सांगितलेल्या गोष्टी खऱ्या व हितप्रद असतात, ह्मणून त्या शिरसावंद्य मानून तदनुरूप वर्तन ठेवणें हें

श्लाघ्य व श्रेयस्कर असतें.' परंतु हा काल उलटून गेल्यावर व त्याच्या पुढची स्थिति प्राप्त झाल्यावर सुद्धा तसेंच वर्तन—त्यांत विचाराची भर न टाकितां—अंधपरंपरेनें पुढें चालविलें असतां त्यांतला उत्तमपणा जाऊन तें दोषार्ह ठरतें. केवळ भोळवट अजागळ वृत्तीस मात्र तें साजण्यासारखें होतें. वाडवडिलांनीं केलेल्या उपदेशाप्रमाणें वर्तणाऱ्या व त्यांनीं घालून दिलेला कित्ता बरोबर रीतीनें गिरवणाऱ्या मुलाचा भरामर सुधारत जाण्याचा संभव असतो. परंतु आपल्यापेक्षां जास्ती विचारी नाहींत अशा लोकांच्या वचनास नसतें महत्त्व देऊन एकाद्या विचारशून्य पोराप्रमाणें तदनुसार तंतोतंत वर्तन प्रौढ व परिणतबुद्धीचा मनुष्य ठेवील, तर तो अगदीं तिरस्करणीय होईल. समाजाची गोष्टही अशीच आहे. समाजाच्या प्रथमावस्थेंत ज्यांची बुद्धिमत्ता श्रेष्ठ अशा लोकांचा त्यावर अंमल चालतो. व असें होणें साहजिक आहे. कारण, समाजाची बाल्यावस्था असतां समाज अज्ञानांधकारांत निमग्न असतो. अशा वेळीं ज्यांना थोडें बहुत ज्यास्त कळतें, ज्यांच्या दृष्टीचा पल्ला जरा पुढें गेलेला असतो, त्यांच्याकडे धुरीणत्व येतें. त्यांचें वर्चस्व इतरांवर पडून त्यांस सर्वत्र मान मिळतो. व अशांच्या अंगीं कितीही दोष असले तरी, त्यांच्या हातीं अधिकाराचें सूत्र असणें हेंच हितावह असतें. केवळ निरक्षर व अडाणी माणसांच्या हातांत अधिकार आला तर त्यापासून कोणाचेंही हित न होतां उलटा त्रास मात्र होतो. परंतु समाजाची ही बाल्यावस्था संपून त्यास पुढची स्थिति जेव्हां येते, ज्ञानरवीचा उदय

होऊन त्याच्या किरणांच्या प्रभेनें समाजास आपल्या सभोंवता-लची वस्तुस्थिति जेव्हां स्पष्ट दिसूं लागते, तेव्हां खऱ्याखोट्या-ची छान करण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं येतें. अशा वेळीं पिढ्या-नपिढ्या अधिकाराचा यथेच्छ उपभोग घेणाऱ्यांच्या फाजील व अमर्यादित वर्तनाचा साहजिक वीट येऊन त्याचें जूं फेकून देण्याचा यत्न समाजाकडून होतो. हें या चरित्रनायकानें घड-वून आणलेल्या धर्मसुधारणेवरून स्पष्ट दिसतें.

'सुधारणा' शब्दास जास्ती विस्तृत अर्थ देऊन विचार केला असतां असें कळून येतें कीं, आपल्या देशांतील समाजस्थिति असावी तशी नाहीं, तींत बदल होणें अत्यंत इष्ट आहे, असें कोणत्या समंजस मनुष्यास वाटत नाहीं? लोकांतील मृत्यूचें मान कमी होऊन त्यांचें आरोग्य वाढणें; कोट्यावधि लोकांची दारिद्र्यामुळें दैना उडून ते अन्नास मोताद झाले आहेत, त्यांचे हाल कमी करणें; लग्नासंबंधीं व इतर ज्या अनेक घातुक चाली-रीतींनीं लोक दुःखांत बुडून अगदीं रसातळास जात आहेत त्यांत फेरफार करून त्या सुधारणें; लोकसंख्येच्या मानानें लोकां-त शिक्षणाचा प्रसार व्हावा तितका झाला नाहीं तो करणें; व विशेषेंकरून ज्यांच्या शहाणपणावर व बुद्धिमत्तेवर संसाराची बरी वाईट स्थिति, भावी संततीचें कल्याण व नाश, व एकंदर सुख किंवा दुःख जास्ती अवलंबून आहे, त्या स्त्रीवर्गाला सुशि-क्षित करण्याची खटपट करून त्यांच्या शिक्षणाचा प्रसार करण्या-बद्दल यत्न करणें; तसेंच खरा साधु कोणास म्हणावें, सत्पात्रीं

दान कोणतें, धर्माचें स्वरूप देऊन भोंदू लोक भोळ्या लोकांस कसे नाडितात; सारांश, धर्माचें शुद्ध स्वरूप न कळल्यामुळें लोक धर्म करण्याची व धर्माप्रमाणें वागण्याची खरी बुद्धि असतांही भलत्याच मार्गास लागून विपत्तींत पडतात, हा प्रकार कमी करून या बाबतींत सुधारणा करणें; व ज्या हजारो, लाखो, अनिष्ट व अज्ञानमूलक कल्पना व विचार लोकांच्या अंगीं खिळून गेल्यामुळें ते एका देशांतले, एका राष्ट्रांतले, असूनही एकमेकांस परकीयांप्रमाणें वाटतात, त्या घातुक कल्पनांचें व विचारांचें निर्दालन करून स्वदेशबंधुत्वाचें निकट नातें स्पष्ट करून परस्परप्रेमभाव उत्पन्न करणें; इत्यादि सर्व सुधारणा अत्यंत महत्त्वाच्या व अत्यंत इष्ट आहेत, असें कोण ह्मणणार नाहीं ? जो विचारी आहे, ज्याला म्हणून कांहीं समजतें आहे, तो या सुधारणा नको असें कधींच ह्मणावयाचा नाहीं.

पण या सुधारणा घडवून आणावयाच्या कशा ? साधारण लोक तर रूढीनें आंखून दिलेल्या प्रांताच्या यत्किंचित् बाहेर जाण्याचा यत्न झाल्याबरोबर तो करणाऱ्याच्या मार्गांत नसतील ते अडथळे आणून त्याचा छळ करण्यास प्रवृत्त होतात. मग लोककल्याणार्थ त्याचे कळकळीचे प्रयत्न असले तरी त्याबद्दल कृतज्ञता वाटणें तर एकीकडेच ! परंतु प्रस्तुत चरित्रावरून काय स्पष्ट होतें ? इतकेंच कीं, मोठमोठ्या सुधारणांस आरंभ अगदीं थोडक्या लोकांपासूनच होतो. किंबहुना एकाच मनुष्यापासून होतो. अशा लोकांस अडथळे येतातच. नानातऱ्हेच्या विघ्नांशीं त्यांना झुंजावें लागतें. पण त्यांच्यांत जोम व मानसिक धैर्य अस-

त्यामुळेंच आपला यत्न ते सारखा सुरू ठेवितात व आपलें अंगीकृत कार्य तडीस नेतात. असल्या कामांत नानाप्रकारचे अडथळे येणें हें अगदीं साहजिक आहे. ज्या फार दिवसांच्या लागलेल्या संवयी दीर्घकालपर्यंत सारख्या टिकल्यामुळें केवळ प्रतिस्वभाव होऊन बसतात, त्यांविरुद्ध वर्तन करणाऱ्याबद्दल रोष उत्पन्न व्हावयाचाच. परंतु ज्या महात्म्यांनीं मोठमोठ्या सुधारणा घडवून आणिल्या ते अशा प्रकारच्या रोषाला व अडचणीला भ्याले असते, व सर्व लोकांना स्वतः विचार करण्याची ताकद आली ह्मणजे सर्व इष्ट सुधारणा आपोआप घडून येतील असा मंत्र जपत बसले असते, तर त्यांच्याकडून कांहींच झालें नसतें. पुढें पडून, येईल त्या प्रसंगास तोंड देण्यास ते तयार झाले, विचार व आचार यांच्यांमध्यें त्यांनीं मेळ ठेविला, आपलें उदाहरण लोकांच्या नजरेस आणून दिलें, तेव्हांच त्यांच्या हातून कांहीं झालें. याचा खुलासा या चरित्रावरून स्पष्ट झालाच आहे.

परंतु यावर कित्येकांचें असें ह्मणणें आहे कीं, 'अशा स्वार्थत्यागी व जिवावर उदार झालेल्या माणसाचें चित्र पुढें ठेवून आह्मांस काय करावयाचें आहे? आमच्या मागें संसार आहे. चारचौघांप्रमाणें आह्मांस वागलें पाहिजे, नाहीं तर, आमचें चालावयाचेंच नाहीं असें जर आहे तर मग ज्या आचारविचारांप्रमाणें वागलें असतां आमची फटफजिती होणार, त्या आचारविचारांचा कित्ता पुढें ठेवण्याची आह्मांस काय जरूर आहे?' खऱ्या सुधारणांस जे अडथळे येतात त्याचें इंगित यांतच आहे.

अशा प्रकारच्या अडचणी नवीन प्रचार सुरू करणाऱ्या कोणत्या मनुष्यास येत नाहींत? बहुतेकांस येतातच. ज्यांच्या दृष्टीच

पाँच पुढें गेलेला, पण परिस्थिति ज्यांस अगदीं प्रतिकूल आहे, अशा लोकांस त्रास व जाच सोसण्याची ताकद नसली तर चुकलेल्या मतांचा अंगीकार करून वर्तन ठेवावें लागतें. हे चुकीचे मार्ग सोडून सत्य स्थापण्यास जे प्रवृत्त होतात, त्यांस जाच सोसावा लागतो. अमूक एकामकारचें श्रेष्ठ वर्तन इष्ट आहे, असें मन सांगत असतां, केवळ लोकापवादास भिऊन क्षुद्र वर्तनाकडेच धाव घेतली तर इष्ट कधींच घडून येण्याचा संभव नाहीं. केवळ सुखांत, चैनींत, व ऐषआरामांत राहून स्वतःची व इतरांची सुधारणा ज्यांनीं केली असे कोण आहेत ?

सोळाव्या शतकांत यूरोपांत या प्रचंड धर्मक्रांतीची चळवळ सुरु झाली, त्याच वेळेच्या सुमारास इकडे महाराष्ट्रांत होऊन गेलेल्या साधुसंतांनींही स्वतःच्या पवित्र आचरणानें, सरळ व शुद्ध मराठी लेखांनीं, व उच्च तऱ्हेच्या पण सुबोध अशा उपदेशानें लोकांस धर्माचें खरें रहस्य शिकविण्याची खटपट चालविली होती. त्या चळवळींत व या खटपटींत चमत्कारिक साम्य दिसून येण्याजोगें आहे. मरणोत्तर मनुष्याला मुक्ति मिळण्याला आमची मध्यस्थी पाहिजे, ती वांचून मुक्ति मिळणार नाहीं—आमच्यापासून मुक्तिलेख विकत घेतले पाहिजेत—आह्मीं सांगितलेले संस्कार केलेच पाहिजेत, नाहींतर लोकांची दाद ईश्वराजवळ लागावयाचीच नाहीं;—अशा तऱ्हेचा समज लोकांमध्यें पोप व इतर धर्मोपदेशक यांनीं उत्पन्न करून त्यांनीं लोकांच्या भोळवटपणाचा फायदा पूर्णपणें कसा घेतला हें मागें दाखविण्यांत आलेंच आहे. अशा प्रकारच्या भुलथापांची त्यांनीं परमावधि करून सोडिली होती. या वेळेच्या सुमारास **लूथर** उदयास येऊन लोकांच्या

डोळ्यांत धूळ टाकणाऱ्या पोपाचे डोळ्यांत त्यानें कसें अंजन घातलें ह्याचें वर्णन करण्यांत आलेंच आहे. बहुतेक असाच प्रकार इकडे महाराष्ट्रांतही घडून आला. इकडे धर्माचा सर्व अधिकार **पोपा**सारख्या एका व्यक्तींत एकवटला नव्हता, तरी सर्व ब्राह्मण-वर्गानें श्रेष्ठत्वाचा जो मक्ता घेऊन टाकिला होता, त्याच्या विरुद्ध या संतमंडळीनें चळवळ सुरु केली. या जातिविशिष्ट श्रेष्ठत्वाविरुद्ध उठून ही संतमंडळी प्रतिपादूं लागली कीं, मानवी आत्म्याच्या उन्नतीसाठीं अमुक जातींत किंवा अमुक कुलांत जन्म झाला पाहिजे असें नाहीं. मनुष्य कोणत्याही जातींत किंवा कोणत्याही कुलांत जन्मला तरी त्याला सदाचरणानें व ईश्वरभक्तीनें आपापल्या आत्म्याची उन्नति करून घेतां येईल.

अशा प्रकारच्या उपदेशाप्रमाणें स्वतः आचरण ठेवून कित्येक हीन कुलांत व हलक्या जातींत जन्मलेल्या **तुकारामासारख्या** साधुवर्यांनीं स्वतःच्या अनुकरणीय सदाचरणानें केवळ दुर-भिमानामुळें उत्पन्न झालेल्या अडथळ्यांस झुगारून देऊन आपली स्वतःची उन्नति साधून लोकांचें कल्याण करण्यास कशी खटपट केली हें सर्वांस ठाऊकच आहे.

ज्याप्रमाणें **यूरोपीय** धर्मसुधारकांनीं **लाटिन** व **ग्रीक** भाषांत सांठवलेलें ज्ञानभांडार देशीभाषांत धर्मपुस्तकाचीं भाषांतरें करून सामान्य लोकांस खुलें करून दिलें व ज्ञानाचा मार्ग सोपा करून दिला त्याचप्रमाणें इकडेही खटपट झाली. **ज्ञानदेव, एकनाथ, रामदास, वामनपंडित, मुक्तेश्वर,** श्रीधर व **मोरोपंत** प्रभृति मंडळीनें **संस्कृत** भाषेंत सांठवलेल्या ज्ञानोदकाचे पाट प्राकृत भाषेच्या रूपानें निरनिराळ्या दिशांनीं काढून दिल्यामुळें सर्व ज्ञाने-

बी. ग्रं. ५८

च्छु लोकांना त्यांचें यथेच्छ प्राशन करण्यास साधन मिळून आ-पली ज्ञानार्जनाची इच्छा पूर्ण करून घेतां येऊं लागली. ह्या कामांत अडथळे आले नाहींत असें नाहीं. या बाबतींत **एकनाथ** महाराजांवर एक कठीण प्रसंग येऊन बेतला.

खरें तत्व शोधून काढून व कांहीं नवा प्रघात पाडून ज्यांनीं तद्द्वारें लोकांचा भ्रम नाहींसा करण्याचा यत्न केला आहे, त्यांना छळ व लोकापवाद इत्यादि भयंकर गोष्टींच्या मुशींतून तावून सुलाखून बाहेर येऊनच आपलें शुद्ध स्वरूप दाखवावें लागलें आहे. **लूथरावर** आलेल्या बिकट संकटांप्रमाणेंच एकनाथावर संकट येऊन बेतलें होतें. या नरवीरद्वयाच्या मनोनिग्रहांत व एकंदर जोरदार वर्तनांत बरेंच साम्य आहे,ह्मणून या महापुरुषावर येऊन बेतलेल्या संकटाची येथें थोडी हकीगत देतों. **भागवत** संस्कृतांत असल्यामुळें त्यांतील अमोलिक ज्ञानाचा लाभ फक्त संस्कृत जाणणाऱ्या थोड्या लोकांस होतो, इतर त्या लाभास अगदींच आंचवतात हें बरें नाहीं, असें **एकनाथ महाराजांच्या** मनांत येऊन या महात्म्यानें भागवताचा मराठी भाषेंत तरजुमा करण्याची सुरवात केली. दोन अध्यायांच्या तरजुम्याचें काम झालें. तों एका रसिक व जिज्ञासु ब्राह्मणाची गांठ पडून त्यानें तें प्राकृत भाषांतर उतरून घेतलें, व मुखोद्गत केलें. हा ब्राह्मण काशी क्षेत्रीं गंगातटाकीं स्नान करून मोठ्या भक्तीनें या दोन अध्यायांचें पारायण करीत असे. पांच अध्यायांची टीका पैठणास झाली. ही गोष्ट इतर ब्राह्मणांस कळली. त्या ब्राह्मणांस तें कर्म अगदीं नापसंत झालें. " भागवतासारख्या

ग्रंथाचा मराठींत अर्थ होणें ह्मणजे मोठा अनर्थ; गीर्वाण भाषेची ही मोठीच पायमल्ली; या ग्रंथांतलें रहस्य प्राकृत भाषेंत येऊन तोंडातोंडीं झालें, तर मोठमोठ्या शास्त्र्यांस व पंडितांस कोण विचारतो ?" इत्यादि कल्पना त्यांच्या डोक्यांत शिरून त्यांनीं त्या क्षेत्रांत एक महाविख्यात स्वामी होते, त्यांच्याकडे जाऊन ही हकीकत त्यांस विदित केली. या स्वामीमहाराजांसारखा विद्वान् संन्यासी काशीपासून रामेश्वरापर्यंत कोठेंच नाहीं अशी प्रख्याति झाली होती. स्वामींनीं त्या ब्राह्मणास लागलीच बोलावून आणून त्यानें उतरून घेतलेले दोन्ही अध्याय वाचून मुळाशीं ताडून पाहिले. तेव्हां भाषांतरकर्त्याच्या मार्मिकतेबद्दल स्वामींची पूर्ण खात्री झाली. परंतु त्याच्या मनांत आलें कीं, संस्कृत ग्रंथांतील रहस्य प्राकृत भाषेंत आणण्याचा असा प्रघात सुरू झाला, तर त्याचें ज्ञान अन्य जातींतील लोकांस होईल, व असें झालें ह्मणजे ब्राह्मणांचें वर्चस्व कमी होईल. असा कोता विचार मनांत येतांच बिचाऱ्या ग्रंथकर्त्यास त्याच्या ग्रंथासह पकडून यतिवर्यासमोर आणण्याचा हुकुम सुटला. नाथमहाराजांस आज्ञेप्रमाणें यतींच्या शिष्यांनीं काशीस खेचून नेऊन यतिमहाराजांपुढें उभें केलें. त्यांस पाहतांच स्वामींनीं त्यांजवर शिव्यांची लाखोली वाहून त्यांची फारच विटंबना केली. हें पाहून तेथें जमलेल्या शास्त्री पुराणिकांस पराकाष्टेचा आनंद होऊन त्यांच्या मुखश्रीवर विजयाची प्रभा स्पष्ट दिसूं लागली. एवढा भडिमार नाथमहाराजांवर झाला, तरी त्या महात्म्यास त्याचें कांहींच वाटलें नाहीं. आपण याची इतकी निर्भत्सना केली असूनही हा एक चकार शब्द सुद्धां तोंडावाटे न काढितां शांतपणें उभा आहे असें पाहून हा कोणी लोको-

त्तर नरवीर आहे असें यति महाराजांस वाटलें. त्या यतीची क्रोधानें लाल भडक झालेली मुखचर्या कोणीकडे व नाथमहाराजांची प्रशांत चित्तवृत्ति कोणीकडे ? स्वामींचा पूर्ण भडकलेला क्रोधाग्नि शांत झाल्यावर एकनाथानें प्रत्युत्तर ह्मणून कोटिक्रमास सुरुवात केली. या प्रसंगीं एकनाथानें आपल्या रसवती वाणीनें व सर्वांस समजेल अशा कोटिक्रमानें त्या यतिश्रेष्ठाचें ह्मणणें साद्यंत खोडून काढण्यांत जें अनुपम चातुर्य दाखविलें, त्यानें तेथें जमलेल्या विद्वान्मंडळीवर त्याची पूर्ण छाप बसली. बिचारा यतिमहाराज तर नाथमहाराजाच्या विद्वद्दीपिकेनें दिपून जाऊन फिका पडला. सर्वत्र एकनाथाबद्दल जी तिरस्कारबुद्धि उत्पन्न झाली होती, ती पार लयास जाऊन त्याजबद्दल आदर वाटूं लागला. तात्पर्य, खरी गोष्ट असली तरी लोकभ्रमामुळें तिला खोटयाचें स्वरूप येतें; पण ती प्रचारांत आणणारा ज्या मानानें धिम्मा व दृढनिश्चयी असतो, त्या मानानें तिचें खरें स्वरूप लवकर किंवा उशिरां प्रगट होतें. रूढीचा धोपट मार्ग सोडून ज्यांनीं ज्यांनीं नवीन मार्ग स्वीकारिला, त्या बहुतेकांस निंदा व लोकापवाद सोसावा लागतो, हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. सॉक्रेतीस रूढीचा दास न बनतां आपल्या लोकोत्तर विचारसरणीनें लोकांचें अज्ञान व धर्मभोळेपणा घालविण्याचा मोठया कळकळीनें यत्न करूं लागला. त्या काळचे बहुतेक लोक त्याची योग्यता समजण्यास असमर्थ असल्यामुळें, त्यांच्या दुरभिमानास व दुराग्रहास केवळ धक्का बसल्यासारखें वाटून त्यांनीं त्याचा छळ केला; इतकेंच नाहीं

तर शेवटीं त्यास विष पाजून यमसदनास सुद्धा धाडिलें! **गालिलिआन** आपला सर्व जन्म सृष्टिशास्त्राच्या अध्ययनांत चालविला व पृथ्वी सूर्याभोंवती फिरतें हें खरें तत्व अतिश्रमानें शोधून लोकांस सांगितलें; तेव्हां त्यांनीं 'हा नास्तिक, हा धर्मभ्रष्ट' ह्मणून त्यास कसा जाच केला हें जगजाहीर आहेच. **कोपर्निकस** व त्याच्या मागून झालेला **केपूर** यांनीं महाप्रयासानें तारागणासंबंधीं शोध लाविले, परंतु आरंभीं या त्यांच्या सत्कृत्यांबद्दल त्यांची चहा तर झाली नाहींच, पण उलट नास्तिकपणाबद्दल त्यांचा दांडोरा पिटला गेला. फार लांब कशाला? **बंगाल्यांत** ज्या **राममोहनरायानें हीब्रू** व **आरबी** भाषांचें अध्ययन करून **कुराणांतल्या** रहस्याचें चांगलें ज्ञान संपादिलें आणि **संस्कृत**भाषेंतही चांगलाच पारंगत होऊन वेदासारख्या व उपनिषदासारख्या गहन विषयांतील अत्युच्च तत्वांचें आकलन करून तद्वारें आपल्या देशबांधवांचे धर्मसंबंधीं भलभलते ग्रह नाहींसे करण्याचा प्रयत्न केला; आणि तसेंच आपले देशबांधव आपल्या आयाबहिणीं व सुना यांस त्यांच्या मृतपतींच्या चितेवर जिवंत जाळण्याचें अधमाधम कृत्य करितात असें पाहून ही अत्यंत दुष्ट व अत्यंत लाजिरवाणी चाल बंद करण्याकरितां ज्यानें नानाविध यत्न केले, त्याची सुद्धा लोकांनीं टवाळी केली नाहीं काय? तात्पर्य हें कीं, स्वकर्तव्याच्या अत्युच्च कल्पनेनें प्रेरित होऊन ज्यांनीं ज्यांनीं धोपट रस्ता सोडून शास्त्रसंबंधीं ह्मणा, किंवा धर्मसंबंधीं ह्मणा, कांहीं नवीन वाट काढिली, त्या त्या महात्म्यांनीं लोकापवादास व छळास भिऊन आपल्या उच्च-

त्यास कमीपणा आणिला नाहीं. अशा प्रकारच्या विभूतींला लोकांनीं छळिलें, बहिष्कार घातला, किंवा त्यांचा अगदीं नाश केला, तरी त्यांचें उदाहरण व त्यांनीं दाखविलेली दिशा व त्यांची कीर्ति यांचें स्मरण लोकांस निरंतर रहातेंच राहतें.

सारांश, धर्मोन्नति ही अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. समाज-सुधारणेला ती अत्यावश्य असून तिचा केवळ ती पायाच आहे असें ह्मटलें पाहिजे. ह्मणून, आपापल्या धर्माचें खरें स्वरूप ओळखण्याची जिज्ञासा प्रत्येकांत उत्पन्न झाली पाहिजे. मनुष्य-मात्राबद्दल अनुकंपा वाटून त्यास योग्य सन्मान देणें, हेंच कोण-त्याही धर्माचें मुख्य तत्त्व आहे. ‘ आपल्या शेजाऱ्या पाजाऱ्यावर स्वतःवरच्या प्रेमाप्रमाणें आपण प्रेम केलें पाहिजे ’ अशा अर्थाची अत्युच्च उक्ति जर एका धर्मांत सांगितली आहे, तर ‘ आपला शेजारी व आपण भिन्न नसून एकच आहोंत ’ ( तत्वमसि ) ’ अशी महोक्ति दुसऱ्या धर्मांत आढळून येते. अशीं महतत्त्वें सदासर्वकाळ दृष्टीपुढें ठेवून वर्तनक्रम ठेवणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. कोणी मनुष्यानें विचाराअंतीं धर्मसंबंधानें इतरांपेक्षां कांहीं भिन्नमतें बसविलीं असतील; तर त्याचें ह्मणणें व विचार शांतपणें ऐकून न घेतां केवळ त्याचीं मतें आपल्यापेक्षां भिन्न ह्मणूनच त्याचा तिरस्कार करणें, हें कधींच बरोबर होणार नाहीं.

दुराचरणापासून मनुष्यास पराङ्मुख करून सदाचरणाकडे त्याच्या मनाची प्रवृत्ति करणें हाच मुख्य हेतु प्रत्येक धर्माचा असला पाहिजे, व तो आहेही. वर्तुळाच्या परिघापासून मध्यापर्यंत

जशा निरनिराळ्या त्रिज्या, व त्यांपैकीं कोणत्याही त्रिज्येनें गेलें असतां जसें मध्यावांचून दुसऱ्या ठिकाणीं जातां येतच नाहीं, तसेंच निरनिराळे धर्म हे एकाच वर्तुळाच्या निरनिराळ्या त्रिज्यां प्रमाणें असून त्यांपैकीं कोणत्याही त्रिज्येनें–धर्मानें–गेलें असतां, परमेश्वररूपी मध्याकडे वळल्यावांचून दुसरा मार्गच नाहीं. परंतु ही खरी गोष्ट एकीकडेच राहून लोकांचे धर्मसंबंधी ग्रह भलभलेतच होतात व त्यामुळें फार हानि होण्याचा संभव असतो. ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे कीं, निरनिराळ्या लोकांचा ईश्वर निरनिराळा नाहीं. सर्व लोक एकाच ईश्वरानें निर्माण केले आहेत, व निरनिराळे धर्म हे परमेश्वराकडे जाऊन पोहोंचण्याचे फक्त निरनिराळे मार्ग आहेत.

आपापल्या धर्माचें खरें स्वरूप होतां होईल तों ओळखण्याची जिज्ञासा प्रत्येकास असणें व तें ओळखण्याचा यथाशक्ति यत्न प्रत्येकाकडून होणें या गोष्टी अत्यंत इष्ट आहेत ह्मणून वर सांगण्यांत आलेंच आहे. परंतु असा प्रकार फार कमी आढळून येतो. धर्माचें अत्यंत शुद्ध स्वरूप एकीकडेच राहतें व भलभलत्या बनलेल्या ग्रहांमुळें व कशातरी झालेल्या समजुतीमुळें त्याचें जें खरें स्वरूप नाहीं तेंच खरें स्वरूप आहे असें लोकांस भासूं लागतें. एकाद्या अमोलिक वृक्षाचें रोप भावी फलप्राप्तीच्या आशेनें आस्थापूर्वक लावून त्याच्या संरक्षणार्थ कुंपण घातलें असतां, त्या कुंपणासभोंवतीं कांहीं इतर झाडें झुडपेंही वाढतात; त्या झाडाझुडपांच्या पलीकडे दृष्टि न पोहोंचवितां त्यांसच बहुमोलाचीं रोपें सम-

ऊन भ्रमानें त्यांस वाखाणूं लागावें व खरें रोप कोणाच्या दृष्टीसही डूं नये, असाच बहुतेक प्रकार धर्मसंबंधीं बाबतींत होऊं लागतो. अत्यंत खेदजनक गोष्ट आहे. अज्ञानामुळें धर्माचें खरें स्वरूप .पणास न कळून भलभलत्या व केवळ रूढीमुळें धर्माचें सोंग त्वलेल्या आचाराविचारांसच जर आपण धर्म समजत गेलों खरा धर्म नष्ट झाल्यासारखें होऊन धर्मनष्टतेमुळें ओढवणारीं अकटें आपणावर आलीं, तर त्यांत नवल तें कोणतें ? सारांश, दया क्षमा, शांति, सत्य, मनोनिग्रह; कोणाच्याही मनास किंवा शरीरास पीडा न देण्याचा दृढ-निश्चय व तसें करण्याचा सतत उद्योग; ज्ञानार्जनाची उत्कंठा; स्वकर्तव्य अतिपवित्र समजून त्यांत दक्षता, व पापाचरणापासून दूर ठेवणारीं कृत्यें; ह्या व अशाच प्रकारच्या इतर गोष्टी, ह्याच धर्माचीं मुख्य अंगें आहेत असें सतत मनांत बाळगून, व तसेंच 'समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः' अशी सर्वांबद्दल सारखी बुद्धि ठेवणाऱ्या सच्चिदानंद **परमेश्वरास** भक्तिपुरःसर शरण जाऊन वर्तन झालें असतां इहलोकींची यात्रा सुखावह होईल. इतकेंच नाहीं तर पारलौकिक सुखाचाही पूर्ण आस्वाद मिळाल्यावांचून राहणार नाहीं.

REFBK-0000014